**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**प्रश्नोत्तरे**

**सभापती** :प्रश्नोत्तराच्या तासात हरकतीच्या मुद्यांना परवानगी द्यावयाची नाही असे मी ठरविले आहे. त्याचे कारण असे की, प्रश्नोत्तराच्या तासात दररोज फक्त पाच ते सहा प्रश्न चर्चेला येतात आणि किमान 20 हरकतीचे मुद्दे उपस्थित केले जातात. आणि मग हरकतीच्या मुद्यांवरच प्रश्न विचारले जातात. म्हणून मी हा निर्णय घेतलेला आहे.तारांकित प्रश्न क्रमांक 1752.

**मुंडजाव-सिरसोली (जि.अजोला) या रस्त्याचे बांधजाम**

**(1) * 1752 श्री. वसंतराव जोटरे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. व्हि. यू. डायजव्हाजे , श्री. -ाा-ाासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अै-ाापूरे , प्रा. शरद पाटील : दि-ाांज 16 डिसेंबर,2004 रोजी सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आलेल्या अतारांजित प्रश्-ाोत्तरांच्या चौदाव्या यादीतील प्रश्-ा ज्रमांज 41879 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** स-मा-ा-ीय सार्वजनिज बांधजाम (सार्वजनिज उपज्रम वजळू-ा) मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) मुंडजाव-सिरसोली या भाजातील रस्त्याची अर्थसंजल्पात समाविष्ट असलेली ती-ा जामे व हुडजो अंतर्जत घेज्यात आलेली दो-ा जामे अशा एजूज 5 जामांच्या प्रजतीची सद्यस्थिती जाय आहे,

(2) या एजूज 5 जामांची एजूज अंदाजित रज्जम जिती आहे,

(3) या पाचही जामावर आतापावेतो एजूज जिती जर्च झालेला आहे,

(4) सदर रस्त्याचे जाम जिती जालावधीत पूर्ज जरज्यात येजार आहे ?

**श्री. रविशेट पाटील, श्री. छज-ा भुजबळ यांच्या करिता** (1) हुडजो अंतर्जत दो-ा जामापैजी एज जाम पुर्ज झाले असू-ा उर्वरित एज जाम दि. 17-4-05 पर्यंत पुर्ज होजे अपेजित आहे.

अर्थसंजल्पात समाविष्ट असलेली ती-ा जामे पुरेशा तरतुदी अभावी सुरु जरज्यात आलेली -ााही.

(2) या पाच जामाची अंदाजित जिंमत रु.104.50 लज आहे.

(3) पाच जामापैजी हुडजो अंतर्जत दो-ा जामावर रु.27.51 लज जर्च झालेला आहे. उर्वरीत 3 अर्थसंजल्पीय जामांवर जर्च निरंज आहे.

(4) अर्थसंजल्पातील ती-ा जामे निधीचे उपलब्धते-ुसार पूर्ज जरज्याचे प्रयत्-ा राहतील.

श्री. रविशेट पाटील : सभापती महोदय, उत्तरात थोडीशी दुरुस्ती आहे. उत्तर क्रमांक 2 मध्ये या पाच कामाची अंदाजित किंमत रु.104.50 लक्ष आहे असे म्हटले आहे. त्या ऐवजी 131.60 लक्ष असे वाचावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1752...

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या रस्त्याची अतिशय करुण कहाणी आहे. महाराष्ट्रात एकमेव रस्ता असा आहे की, 1985 साली या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली.आज तागायत 2005 साला पर्यंत या रस्त्याचे खडीकरण आणि डांबरीकरण झालेले नाही. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मुंडगाव आकोट तालुक्यात आहे आणि सिरसोली तेल्लारी तालुक्यात आहे. हा फक्त सहा कि.मी. चा रस्ता आहे. मुंडगावची लोकसंख्या दहा हजार आहे आणि सिरसोलीची लोकसंख्या सहा हजार आहे. याच्या पलिकडे लहान खेडे आहेत. त्या लहान खेडयातून अकोला या जिल्हयाच्या ठिकाणी येण्यासाठी हा रस्ता जवळचा मार्ग आहे. हा अतिशय सोयीचा मार्ग आहे. खारपान भागातील हा रस्ता आहे. अनुशेष असलेल्या जिल्हयातील हा रस्ता आहे. या रस्त्याची अद्यापपर्यंत सुधारणा झालेली नाही ही एक मोठी शोकांतिका आहे. मुंडगाव-सिरसोली या रस्त्याच्या बांधकामावर आतापर्यंत किती खर्च झाला आहे? आणि या वर्षी या रस्त्याच्या बांधकामासाठी किती तरतूद केली आहे?

श्री. रविशेट पाटील :सभापती महोदय, मुंडगाव-सिरसोली हा रस्ता जिल्हापरिषदेच्या अखत्यारीत येतो. हा रस्ता फक्त 6 कि.मी. लांबीचा आहे. सदर रस्त्यावर 30 लाख रुपये अर्थसंकल्पात मंजूर झाले. पण प्रत्यक्षात 1 लाख 21 हजार रुपयाची तरतूद झाली. हा हेड जिल्हा परिषदेचा हेड असल्या कारणाने त्याला जवळ जवळ दीड कोटी रुपयांची तरतूद हवी आहे. परंतु ही तरतूद नसल्या कारणाने बजेटमध्ये ही तरतूद मंजूर करुन घेत आहोत. वित्त विभागाकडे जास्तीत जास्त निधी उपलब्ध होण्यासाठी मागणी करणार आहोत.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, उत्तरामध्ये पाच रस्त्याचे उत्तर दिलेले आहे. त्यातील फक्त एका रस्त्या विषयी मी प्रश्न विचारतो. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी दीड कोटीचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे गडबड होईल. मुंडगाव-सिरसोली या पाच कामातील हे एक काम आहे. त्यातील एका कामा विषयी मी प्रश्न विचारतो. त्यामुळे हा दीड कोटी रुपयाचा घोटाळा टळू शकेल. मुंडगाव-सिरसोली हया रस्त्याचे 1985-86 मध्ये मातीचे काम, भरावाचे काम रोजगार हमी योजनेंतर्गत झाले. 3.73 लक्ष रुपये त्यावर खर्च झाले. सार्वजनिक बांधकाम विभागाने जलनि:सारणाचे काम केले.त्यावर जवळ जवळ सहा ते सात लाख रुपये 1994-95 मध्ये खर्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

ता.प्र.क्र.1752...

प्रा. बी. टी. देशमुख...

केला. 1985 मध्ये सुरु झालेले काम आहे अजून ते पूर्णत्वास गेले नाही. त्यापैकी एक गाव दहा-बारा हजार लोकसंख्येचे आहे आणि एक गाव सहा-सात हजार लोकसंख्येचे आहे. म्हणून एका रस्त्या विषयी माझा प्रश्न आहे. मुंडगाव-सिरसोली या पाच कामापैकी हे एक काम आहे. या कामाच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदय, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील हे त्यावेळी मंत्री होते. त्यावेळी त्यांनी सन 2003 च्या चौथ्या अधिवेशनातील अतारांकित प्रश्नौत्तराच्या नव्या यादीमधील ता.प्र.क्र.34143 ला असे उत्तर दिलेले आहे की, "अकोला जिल्हयातील मुंडगाव-सिरसोली या ग्रामीण भागातील रस्त्याच्या कामाला एक दशकापूर्वी सुरुवात केल्या नंतर केवळ रस्ते व पुलाची कामे पूर्ण करुन रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण ही कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत काय?याला उत्तर देतांना "होय" म्हटलेले आहे. माझे म्हणणे असे आहे की, मालेगाव, मालठाण, अकोली, उपराव या चार-पाच गावांना अतिशय सोयीचा असा हा रस्ता आहे.

यानंतर श्री. बरवड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1752 ......... प्रा. बी. टी. देशमुख .....

बाकीच्या पाच कामांपैकी मुंडगाव-सिरसोली या रस्त्याचे खडीकरण केव्हा पूर्ण करण्यात येईल आणि डांबरीकरण केव्हा पूर्ण करण्यात येईल ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात ते खरे आहे की, निधी अभावी कामे व्हावयाची राहिलेली आहेत. याच्या अगोदरच्या प्रश्नामध्ये त्या विभागातील रस्त्यांची माहिती विचारली होती म्हणून 5 रस्त्यांची माहिती द्यावी लागली. त्याप्रमाणे उत्तरामध्ये माहिती दिलेली आहे. यातील दोन कामे हुडकोकडून घेतली. उरलेल्या तीन रस्त्यांचा प्रश्न आहे. त्यासाठी पुरेशा निधीची तरतूद नव्हती म्हणून तेवढी कामे रखडलेली आहेत. त्यातल्या त्यात सन्माननीय सदस्यांनी जो रस्ता सांगितला तो मुंडगाव-सिरसोली हा महत्वाचा रस्ता आहे. त्या रस्त्याच्या बाबतीत लवकरात लवकर पहिल्या टप्प्यामध्ये खडीकरणाचे काम सुरु करु आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये त्याचे डांबरीकरण करु.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी पहिल्या टप्प्यामध्ये खडीकरण आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये डांबरीकरण करु असे सांगितले त्याबाबतीत काही म्हणणे नाही. आपण सांगितल्याप्रमाणे खडीकरणाच्या बाबतीत दोन दोन महिने, चार महिने, सहा महिने असा रिझ़नेबल कालावधी सांगितला तरच डिपार्टमेंट कामाला लागेल. त्यामुळे त्यासंदर्भात आपण सांगितले तर योग्य होईल. खडीकरण साधारणपणे किती महिन्यामध्ये करणार आणि डांबरीकरणाच्या बाबतीत काय वेळापत्रक ठरविलेले आहे ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी या ठिकाणी येण्यापूर्वी यासंदर्भामध्ये अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, ज्या हेडखाली हे करण्याची मान्यता आहे त्यामध्ये पैसे दिलेले नाहीत. ही अडचण असली तरी आपण हे खडीकरणाचे काम प्रायोरिटीने सुरु करु आणि मी स्वत: त्यामध्ये लक्ष घालीन. हे काम किती महिन्यामध्ये होईल हे ताबडतोब सांगता येणार नाही परंतु या कामाच्या बाबतीत आपली तक्रार राहणार नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी उत्तर दिले. पावसाळयाच्या अगोदर जर खडीकरण झाले तर आपल्याला एक पावसाळा मिळतो आणि डांबरीकरणाचा कार्यक्रम पावसाळयानंतर दोन तीन महिन्याने घ्यावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1752 .....

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी जी सूचना केलेली आहे ती मी ग्राहय धरतो. त्याप्रमाणे काम करण्यात येईल.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

**हिंगोली जिल्हयातील हट्टा पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी**
**एका व्यक्तीस जिवंत जाळण्याची घडलेली घटना**

**(२) * २९७८ श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील , श्री. विनायकराव मेटे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. श्रीकांत जोशी , श्रीमती कांता नलावडे , डॉ. अशोक मोडज , श्री. मधुकर चव्हाण , श्री. अनंत तरे , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्री. सदाशिवराव पोळ :** सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील हट्टा पोलीस ठाण्याच्या जवाळे बाजार दूरक्षेत्रातील पोलिसांनी सय्यद ईस्माईल या व्यक्तीस जिवंत जाळण्याची घटना दि.२४-१२-२००४ रोजी वा त्या सुमारास घडली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) मयताच्या दिनांक २४.१२.२००४ च्या मृत्यूपूर्व जबाबानुसार अशी घटना घडली आहे.

(२) व (३) होय, याप्रकरणी केलेल्या चौकशीत सदर घटना ही जवळा बाजार येथील अवैध धंदे बंद करण्याच्या तसेच मयताच्या मित्राच्या ताब्यातील वाहनाबाबत पोलीसांनी केलेल्या हस्तक्षेपावरुन झ ाालेल्या वादविवादामुळे घडलेली असल्याचे दिसून येते. सदर घटनेतील तीनही फरार आरोपी पोलीस कर्मचाऱ्यांविरुध्द पोलीस हट्टा ठाणे, येथे गु.र.क्र.१७४/०४ कलम ३०७, ३४ भा.दं.वि. प्रमाजे दाजल करण्यात आलेला असून दिनांक २.२.२००५ रोजी त्यांना निलंबित करण्यात आले आहे. सदर गुन्हयाची पुढील चौकशी चालू आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, हिंगोली जिल्हयामधील हट्टा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये जवळा बाजार हे महत्वाचे गाव आहे आणि या हट्टा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये येणाऱ्या गावामध्ये श्री. सय्यद इस्माईल या व्यक्तीला जिवंत जाळण्याची घटना 24.12.2004 ला घडली. ही बाब शासनाच्या गृह विभागाने मान्य केली आहे. मयत श्री. सय्यद इस्माईल याला जिवंत जाळण्यात आले आणि त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. ज्या पोलिसांनी हे कृत्य केले त्या पोलिसांना अद्यापपर्यन्त अटक करण्यात आलेली नाही. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या पोलिसांना संरक्षण देण्याचा प्रयत्न गृह विभाग करणार आहे काय ?

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

ता. प्र. क्र. 2978 ....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री. सय्यद इस्माईल यांचा पोलीस स्टेशनमध्ये जाळून घेऊन मृत्यू झालेला आहे. त्या ठिकाणी उपस्थित असलेले तरुण भारत दैनिकाचे पत्रकार श्री. भालेराव यांची सी.आर.पी.सी. च्या कलम 164 प्रमाणे न्यायालयासमोर जबानी नोंदविली. त्या पत्रकाराने सांगितले की, पोलिसांनी त्याला जाळलेले नाही. त्याने स्वत: जाळून घेतलेले आहे. असे असूनही पोलीस घाबरुन फरार झाले. तरीही गुन्हा दाखल केलेला आहे. जे संबंधित पोलीस पळून गेले त्यांना सस्पेंड करुन फरारी घोषित केलेले आहे. त्यांच्यावर खुनाच्या गुन्हयाचे कलम लावलेले आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर घटना आहे. एखादा माणूस मृत्युपूर्व जबानीमध्ये पोलिसांचे नाव घेतो आणि आपण सांगितले की, एका माणसाने सी. आर. पी. सी. च्या कलम 164 खाली कोर्टात जाऊन सांगितले की, हे खरे नाही. पोलीस कोणाचीही जबानी कशी काय घेतात ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/ श्री.बरवडनंतर 12:10

ता.प्र.क्र.2978.... श्री.जितेंद्र आव्हाड....

आपण दररोज पेपर वाचा, या महाराष्ट्रामध्ये कन्व्हेंशनचा रेट किती आहे ते पहावे. जर पोलीस एवढे स्वच्छ प्रतिमेचे असते तर सगळेच कन्व्हीक्ट झाले असते. हे उत्तर खरे नाही. त्यांनी सीआरपीसीखाली गुन्हा नोंदविला आहे. सीआरपीसीखाली खाली त्यांची जबानी नोंदविली आहे. कोर्टामध्ये जे होईल ते होईल. परंतु त्याच्यापूर्वी त्यांची बाजू घेण्याची आवश्यकता नाही. याप्रकरणात एका माणसाचा मृत्यू झालेला आहे, माणूस जळून मेलेला आहे, त्याने मृत्यूपूर्वी जबानीमध्ये सांगितलेले आहे. मग आपण सीआरपीसीच्या कलम 302 खाली गुन्हा का दाखल केला नाही ? आणि आतापर्यंत त्यांना अटक करण्यासाठी कोणते प्रयत्न केले आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : याप्रकरणी संबंधितांवर सीआरपीसीचे कलम 302 लावण्यात आलेले आहे. ते दोघे त्या दिवसापासून फरार झाले आहेत त्यामुळे ते कोठे आहेत त्याची तपासणी केली आहे.

**सभापती** : आपण लेखी उत्तरामध्ये यापूर्वी दुरुस्ती करणे आवश्यक होती.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय, दुरुस्ती केली पाहिजे होती.

श्री.जितेंद्र आव्हाड : तरुण भारत हा कोणाचा पेपर आहे, त्याची कारणे तपासली पाहिजेत, सय्यद अली कोण आहे काय आहे हे तपासणे आवश्यक आहे. सय्यद अलीविरुध्द तरुण भारतचा संपादक कोर्टामध्ये सांगतो आणि ते आपण या सार्वभौम सभागृहात सांगत आहात. याप्रकरणी एक माणूस मेला आहे. मृत्यूपूर्वीची जबानी सुप्रीम कोर्टामध्ये महत्वाची मानली जाते. आपण त्याच्या मृत्यूपूर्वीची जबानी ग्राहय धरुन त्याबाबत आग्रही भूमिका घेणार काय आणि पोलिसांवर नोंदविलेला गुन्हा कायम ठेवून कायद्याच्या कचाटयामध्ये अडकविणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्यशासनाने दिनांक 10 मार्च, 2005 रोजी सदर गुन्हा सीआयडीकडे वर्ग केला आहे आणि आता सीआयडीचा तपास चालू आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये हा गुन्हा घडला आहे. ज्यावेळी तो स्वत:ला जाळून घेत होता तेव्हा पोलीस त्याठिकाणी काय करीत होते ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, त्याचप्रमाणे त्यांना निलंबित केल्याचे म्हटले आहे. त्या पोलिसांना निलंबित

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्याची ऑर्डर त्यांच्या हातामध्ये दिली असेल त्यावेळी त्यांना अटक का केली नाही ? या हट्टा पोलीस स्टेशनमध्ये पोलीस इन्सपेक्टर कोण होते आणि त्यांना त्याच्यामध्ये गुन्हेगार म्हणून का नोंदविले नाही ? या राज्यामध्ये भर पोलीस स्टेशनमध्ये पोलीस जर कोणाला जाळायला लागले, संरक्षण मागणा-याला संरक्षण देणारे कायदा हातात घेऊ लागले तर ही गंभीर बाब आहे आणि मंत्रिमहोदय लाईटली उत्तर देत आहेत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ज्यावेळी पोलीस स्टेशनमध्ये जाळून घेतले त्यावेळी त्या पोलीस स्टेशनचे इन्चार्ज श्री.महंमद गफरोद्दीन, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हे होते. त्यांनाही त्याच्यामध्ये आरोपी करण्यात आले आहे आणि त्यांना कोर्टाने अंतरिम जामीन दिलेला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण सुरुवातीलाच हरकतीचा मुद्यासंबंधी मा.सदस्यांना सूचना केली आहे की, प्रश्नोत्तराच्या तासात हरकतीचे मुद्दे उपस्थित करु नयेत. आम्ही आपल्या आदेशाचा आदर करतो. परंतु हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रसंग मा.मंत्रिमहोदयांकडून जी उत्तरे येतात त्याच्यातून निर्माण होतो.

**सभापती** : एखादी शंका किंवा उत्तरामध्ये अपूर्णता राहिली तर मी उपप्रश्न विचारण्याची संधी देईन. परंतु हरकतीच्या मुद्याच्या नावाखाली दुर्दैवाने 20-20 वेळा मुद्दे मांडले जातात त्यावेळी या प्रश्नोत्तराच्या तासाचे गांभीर्य कमी होण्याची शक्यता असते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनीही अभ्यास करुन उत्तर दिले पाहिजे.

**सभापती** : सर्व बारकावे लक्षात घेऊन मंत्रिमहोदयांनी अचूक उत्तर दिले पाहिजे. त्याप्रमाणे उत्तर आले नाही तर मी एखादा पूरक प्रश्न विचारण्याची संधी देईन.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरामुळे खूप आश्चर्य वाटते. हे उत्तर काळजीपूर्वक तपासले तर लक्षात येईल. त्याचा मृत्यू जळण्यामुळे झाला आहे असे म्हटले आहे. आता त्याला जाळले की त्याने स्वत:हून जाळून घेतले हा प्रश्न निर्माण होतो. मा.राज्यमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार त्याने स्वत:ला जाळून घेतले आहे. मग 3 पोलिसांवर गुन्हा का दाखल केला ? हा प्रश्न उपस्थित होतो.

नंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प.क्र. 2978... (श्री. मधुकर सरपोतदार पुढे सुरु...)

याप्रकरणी 307कलमाखाली गुन्हा दाखल केला याचा अर्थ पोलिसांनी त्याला मारण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे जर सत्य असेल तर 307 कलमाखालीच गुन्हा दाखल का करण्यात आला ? 302 कलमाखाली गुन्हा का दाखल करण्यात आला नाही? या सदनामध्ये वस्तुस्थितीवर आधारित उत्तर मिळाले पाहिजे. मृत्यूपूर्वी त्या व्यक्तीने जबानी दिलेली आहे की, त्याला पोलिसांनीच जाळले. आता ते पोलीस फरार आहेत. ते पोलीस सापडले की नाहीत हे माहीत नाही. म्हणून या प्रकरणी योग्य न्याय मिळवा यासाठी संबंधित पोलिसांवर 302 कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : डायिंग डिक्लरेशन वरुन 302चा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : उत्तरामध्ये तशी दुरुस्ती करणे आवश्यक होते.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : 302 कलमाखाली गुन्हा दाखल केलेला आहे. 302 कलमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये सांगितलेले आहे की, ज्या पोलीस कर्मचा-यांनी सय्यद ईस्माईल या व्यक्तीस जिवंत जाळले त्या आरोपी पोलीस कर्मचा-यांना निलंबित केलेले आहे. त्या पोलीस स्टेशनचे जे फौजदार आहेत त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई केलेली आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जेव्हा पोलिसांना गुन्हेगार सापडत नाहीत अशा वेळी गुन्हेगाराच्या आई-वडिलांना, जवळच्या नातेवाईकाना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून त्यांना तेथे ठेवले जाते. या पोलीस कर्मचा-यांनी एका माणसाला जिवंत जाळले असताना केवळ त्यांना निलंबित केलेले आहे. त्यांना अटक का केली नाही ? हे काय गौडबंगाल आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मी मघाशी सांगितले की, घटना घडल्यानंतर संबंधित पोलीस फरार झालेले आहेत. ते फरार झाल्यानंतर त्यांना निलंबित घोषित केलेले आहे. त्या पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. महमद गफारोद्दीन यास अटक केलेली असून कोर्टाने त्यास इंटेरिम जामीन दिलेला आहे.

श्री. प्रमोद नवलकर : कलम 307 अन्वये गुन्हा कोणत्या दिवशी दाखल करण्यात आला?

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प.क्र. 2978...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : घटनेची तारीख 23.12.2004 असून वेळ 7.30च्या सुमारास अशी आहे. गुन्हा दि. 24.12.2004 रोजी 9.00 वाजता दाखल करण्यात आला.

श्री. प्रमोद नवलकर : त्यांना नंतर निलंबित केले काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : गुन्हा घडल्यानंतर सय्यद ईस्माईल यास दवाखान्यात नेले असता त्याने मृत्यूपूर्व जबानीत पोलिसांनी जाळले असे सांगितले. मृत्यूपूर्व जबानी अशा प्रकारे दिलेली आहे हे समजतात पोलीस फरार झाले.

श्री. प्रमोद नवलकर : पोलिसांना निलंबित करताना ते त्यावेळी समोर होते काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ते फरार झाल्यानंतर त्यांना निलंबित घोषित केलेले आहे. तेथील सहाय्यक पोलीस उप निरीक्षकावरही कारवाई केलेली आहे. त्याला कोर्टाने जामीन दिलेला आहे.

श्री. प्रमोद नवलकर : पोलिसांना पोलीसच सापडत नाहीत तर मग पोलिसांना आरोपी कसे सापडणार ?

(उत्तर नाही)

श्री. विनायक मेटे : ज्यांनी जनतेला संरक्षण द्यायचे अशा पोलिसांनी एका व्यक्तीला जीवंत जाळण्याची घटना घडलेली आहे. त्या व्यक्तीने तहसिलदारासमोर मृत्यूपूर्व जबानीत आरोपींची नावे घेऊन त्यांनी रॉकेल टाकून जाळले असे सांगितलेलेले आहे. ही घटना दि. 24.12.2004ला घडली. आज 8 एप्रिल 2005 ही तारीख आहे. म्हणजे गेले साडेतीन महिले पोलीस फरार आहेत. पोलीस त्या आरोपी-पोलिसांना अटक करु शकलेले नाहीत. आरोपी-पोलिसांना दि.2.2.2005रोजी निलंबित करण्यात आलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 12:20

ता.प्र.क्र,2978...

श्री.विनायक मेटे...

म्हणजे त्या पोलिसांना दीड महिन्यानंतर निलंबीत केलेले आहे. ही त्या पोलिसांवर कसली मेहरबानी चालली आहे. जे लोक जनतेचे संरक्षण करीत आहेत तेच लोक जीवंत जाळता आहेत आणि आपण बघ्याची भूमिका घेतो आहे, त्यासंदर्भात आपण छापील उत्तर देता आहात. त्याबाबतीत आपल्याला काहीही वाटत नाही. या प्रकरणाचे जे पोलीस चौकशी करणार आहेत ते याप्रकरणामध्ये सहभागी आहेत काय ? ते दोषी आहेत काय ? ते दोषी असतील तर त्यांच्या विरुध्द काय कारवाई करणार ? या फरारी आरोपींना कधी अटक करणार ?

श्री. सिध्दाराम म्हत्रे : सभापती महोदय, या प्रकरणी संबंधित पोलिसांना दीड महिन्यानंतर निलंबीत करण्यात आलेले आहे. अजूनही या प्रकरणातील आरोपी फरार आहेत. म्हणून सदर प्रकरण चौकशीसाठी सी.आय.डी. विभागाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. सी.आय.डी. विभागामार्फत या प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, प्रश्न असा आहे की, अशा प्रकारचा निर्घृण गुन्हा घडला आहे. त्यामध्ये एक बाब प्रकर्षाने दिसते ती अशी की, पोलिस स्टेशनमध्ये एका व्यक्तीला पेटविले जाते असा त्याचा मृत्यूपूर्व जबाब आहे. ती आग विझविण्याचा प्रयत्न केला असा मात्र या उत्तरात कुठेही उल्लेख केलेला दिसत नाही. त्या व्यक्तीने जाळून घेतल्यानंतर ती विझविण्याचा प्रयत्न केला आणि त्यात दोन-तीन पोलिसांना आग विझविताना काही जखमा झाल्या अशी माहिती या उत्तरात स्पष्टपणे आलेली दिसत नाही. ही एक अत्यंत गंभीर दु:खद बाब आहे. आपण सदर आरोपी पोलिसांना दीड महिन्यानंतर निलंबीत केले. दीड महिन्यानंतर त्यांना सस्पेंड करणे हे देखील चुकीचे आहे. आरोपी गुन्हा घडला त्या दिवशी उपस्थित होते. म्हणून या सर्व गोष्टीची देखील चौकशी झाली पाहिजे. आपण सदर प्रकरण चौकशीसाठी सी.आय.डी.विभागाकडे दिलेले आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करा. कोणाचाही मुलाहिजा न ठेवता संबंधित आरोपींना अटक झाली पाहिजे अशी सभागृहाची अपेक्षा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात एक महत्वाचा भाग दडलेला आहे त्याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. आपण या उत्तरात असे म्हटले आहे की, जवळा बाजार येथील अवैध धंदे बंद करण्याच्या तसेच मयताच्या मित्राच्या ताब्यातील वाहनाबाबत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र,2978...

श्री.दिवाकर रावते..

पोलिसांनी केलेल्या हस्तक्षेपावरुन झालेल्या वादविवादामुळे घटना घडलेली असल्याचे दिसून येते. हे अवैध धंदे कोणते ? मयताचा जो मित्र आहे त्याचे वाहन कशासाठी ताब्यात घेण्यात आले होते ? जो मयत झालेला आहे त्याचे कोणते धंदे होते की ज्यामुळे पोलीस एवढे तीव्र होऊन त्याला जाळण्यास निघाले ?

श्री. सिध्दाराम म्हत्रे : सभापती महोदय, श्री. सैयद इस्माइल हा पोलीस मित्र म्हणून काम करीत होता. पोलीस मित्र म्हणजे खब-याचे काम करावयाचा. त्याचे श्री.बाळाशंकर आणि श्री.जयप्रकाश राठी असे दोन मित्र होते. श्री. जयप्रकाश राठी याने श्री. बाळशंकर याचेकडून पैसे घेतले होते. श्री. बाळशंकर याचे पैसे श्री. जयप्रकाश राठी याने परत दिले नाही म्हणून श्री.सैयद इस्माईल व श्री. बाळशंकर हे श्री.जयप्रकाश राठीकडे गेले आणि त्याची मोटार सायकल घेऊन आले. मोटार सायकल घेऊन आल्यानंतर श्री. जयप्रकाश राठी याने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन सांगितले की, यांनी माझी मोटार सायकल हिसकावून घेतली. पोलिसांनी श्री.राठी यांना विचारले की, सदर मोटार सायकल ही तुमचीच आहे हे कशावरुन सांगता आहात ? त्याने मोटार सायकलीची कागदपत्रे दाखविली. सदर मोटार सायकलीची कागदपत्रे श्री.राठी यांच्या नावावर होती. त्यानंतर पोलीस स्टेशनमधील कॉन्स्टेबलने श्री. सैयद यांच्याकडून मोटार सायकल काढून घेऊन ती श्री. राठी यांना परत दिली. मग श्री. सैय्यद यांना राग आला आणि तो पोलीस स्टेशनमध्ये गेला आणि त्याने सांगितले की, मी तुमच्या एवढा जवळचा असताना माझा तुम्ही अपमान केला. माझ्या मित्राचे पैसे त्याच्याकडून घ्यावयाचे आहे. तुम्ही मोटार सायकल कशाला परत दिली. त्यावरुन हा प्रकार घडलेला आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 307 खाली गुन्हा सायंकाळी दाखल केला. 307 खाली दाखल करण्यात आलेला गुन्हा दुस-या दिवशी कोर्टात पाठविला असेल. त्यानंतर संबंधित पोलिसांना दीड महिन्यानंतर निलंबीत केले. 307 खाली गुन्हा दाखल झाला त्यावेळी ते पोलीस कुठे होते ? 307 नंतर आरोपींना लागलीच अटक करावयास पाहिजे. कारण हा गुन्हा अजामीनपात्र आहे. दुसरी गोष्ट अशी की, ती व्यक्ती कधी मृत झाली ? त्याचे रुपांतर कलम 302 खाली कधी केले ? जर 302 अन्वये गुन्हा दाखल केला असेल आणि

3...



ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र,2978...

श्री.जितेंद्र आव्हाड...

संबंधित पोलिसांना दीड महिन्यांनी निलंबीत केले असेल तर या प्रकरणी वरिष्ठ अधिकारी सुध्दा दोषी आहेत. दीड महिना निलंबीत करण्यासाठी का लागला ? या आरोपींना ताबडतोब निलंबीत करावयास पाहिजे होते. 307 खाली गुन्हा रजिस्टर झाला असेल, पोलीस फरार झाले असतील तर त्या पोलिसांना 48 तासानंतर निलंबीत करावयास पाहिजे होते. कारण ते सेवेत नाही. ते निलंबीत झालेले होते. असे असताना वरिष्ठ अधिका-यांनी त्यांच्यावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला असेल त्या वरिष्ठां विरुध्द आपण काय कारवाई करणार आहे ? 302 खाली गुन्हा दाखल करुन सदर प्रकरण दुसरी दिवशी कोर्टापुढे न्यावयास पाहिजे होते. त्या व्यक्तीचा मृत्यू झाला कधी ? 302 चा गुन्हा कोर्टात कधी गेला ? ज्या वरिष्ठांनी या प्रकरणावरय पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला आहे त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,ज्या दिवशी ही घटना घडली त्याच्या दुस-या दिवशीच त्या व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे. धटना 23.12.05 रोजी घडलेली आहे. 24.12.05 रोजी त्या व्यक्तीचा सायंकाळी 7.30 वाजता मृत्यू झालेला आहे.त्यानंतर लगेल 302 कलमाखाली गुन्हा दाखल केलेला आहे. संबंधित पोलिसांना निलंबीत करण्यास उशीर झालेला आहे असा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला गेलेला आहे. उशीर करण्यास वरिष्ठ अधिकारी जबाबदार असतील तर त्यांचे विरुध्द जरुर कारवाई करण्यात येईल.

----------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**-नेरळ-कळंब (ता.कर्जत,जि.रायगड ) रस्त्याची तत्परतेने करावयाची दुरुस्ती**

**(३) * १८७४ श्री. जयंत पाटील :** सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) -नेरळ-कळंब (ता.कर्जत,जि.रायगड ) रस्त्याची दुरुस्ती १० दिवसात करण्याचे आश्वासन देऊनही जिल्हा प्रशासनाने अद्यापही या रस्त्यांची दुरुस्ती केली नाही हे खरे आहे काय,

(२) तसेच या रस्त्याची दुरुस्ती त्वरित व्हावी या मागणीसाठी तेथील नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले होते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नेरळ येथे माथेरान हे पर्यटन स्थळ आहे हे विचारात घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीचे काम त्वरित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहे ?

**श्री. रविशेट पाटील , श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे.
खड्डे भरुन रस्ता दुरुस्त केला आहे.

(२) होय.

(३) खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात आला आहे.

--------

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, नेरळ-कळंब या रस्त्याचे काम नोव्हेंबर 2003 मध्ये झाल्यानंतर लगेचच दीड महिन्यामध्ये रस्त्याला पूर्णपणे खड्डे पडले आहेत. खड्डे पडले आहेत हे उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, रस्त्याचे काम करीत असताना जे कोणी अधिकारी आणि कर्मचारी या कामावर देखरेख करीत होते त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री. रविशेट पाटील : सभापती महोदय, नेरळ-कळंब रस्ता हा 440 मिटर लांबीचा रस्ता आहे. या रस्ता आहे त्याठिकाणी पाण्याचा निचरा मोठया प्रमाणावर होतो आणि खोलगट भाग असल्यामुळे ट्रॅफिकमुळे खड्डे पडतात. आता खड्डे भरण्याचे काम पूर्ण केलेले आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रस्त्याचे काम करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी निचरा न होणारे पाणी,ट्रफिक याचा विचार एस्टीमेट तयार करताना अधिका-यांनी घेतला किंवा नाही ? रस्त्याचे काम झाल्यावर एक महिन्यामध्ये खड्डे पडतात म्हणून संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे. रस्त्याच्या कामावर देखरेख करणा-या अधिका-यांवर शासन कारवाई करणार आहे काय?

....2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1874 पुढे सुरु ...

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या रस्त्याचे काम 25.5.03 रोजी पूर्ण झाले. सिडकोचे काम नोव्हेंबर 03 मध्ये पूर्ण झाले. रस्त्याच्या कामासंबंधात जे आंदोलन केले ते 22 डिसेंबर 2004 म्हणजे एक वर्षांनी केले. रिक्षा संघटनेने जे पत्र दिले ते एक वर्षानंतर दिले. खड्डे पडल्यानंतर ठेकेदाराच्या अनामत रकमेतून काम करुन घेण्यात आले. असे जरी असले तरी राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे रस्त्यामध्ये पाण्याचा निचरा होतो तसेच बाजूला गटारे नसल्यामुळे तो सतत नादुरुस्त होतो. आता पूर्ण रस्त्याच्या मजबुतीकरणाचे आणि साईडला गटारे बांधण्याचे काम यावर्षी करुन घेऊ.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात आला आहे. आजही जर आपण पाहिले तर खड्डे पडलेले आहेत. पॅचवर्क केलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, पावसाळा येण्यापूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण आणि मजबुतीकरण शासन करणार आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, रिक्षा चालक-मालक संघटनेला आंदोलनानंतर जे आश्वासन देण्यात आले होते त्यानंतर या संघटनेने विभागाला पत्र देऊन धन्यवाद व्यक्त केले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, रस्त्याचे काम केले त्याबद्दल धन्यवाद. 10.01.2005 रोजी त्यांनी विभागास अशा प्रकारचे पत्र दिले आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1874 श्री.छगन भुजबळ ...

सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, या रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात यावे. त्या संदर्भात मी मघाशीच खुलासा केलेला आहे की,या रस्त्याच्या बाजूला गटाराचे काम करावयाचे आहे त्या रस्त्यावरील पाण्याचा निचरा चांगल्या प्रकारे व्हावा याकरता रस्त्याचे काम करावयाचे असून मजबुतीकरण देखील करावयाचे आहे. हे काम या वर्षी पूर्ण करण्यात येईल. हा रस्ता महत्वाचा आहे हे मला मान्य आहे व त्या दृष्टीने या रस्त्याचे काम चागले करण्यात येईल.

श्री.प्रमोद नवलकर : हा रस्ता पुन्हा पुन्हा दुरुस्त करुन सुध्दा या रस्त्यावर खड्डे पडतात तेव्हा हे खड्डे करण्याचे कॉन्ट्रॅक्ट कोणाला दिलेले आहे ?

श्री.छगन भुजबळ : खड्डे भरण्याचे कॉन्ट्रॅक्ट कोणालाही दिलेले नाही.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बारामती शहर पोलिसांनी दलित तरुणांना केलेली अमानुष मारहाण**

**(४) * ३४५६ श्री. शांताराम करमळकर , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्रीमती कांता नलावडे , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे** : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती शहर पोलिसांनी दिनांक ४ जानेवारी, २००५ रोजी तपासाचे निमित्त करुन दलित समाजातील तरुणांना खोटया गुन्हयामध्ये अडकवून अटक केली व अमानुष मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मारहाणीच्या निषेधार्थ समस्त बौध्द समाजाच्या वतीने दिनांक ६ जानेवारी, २००५ रोजी प्रांताधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या मोर्चाचे वेळी अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांवर आठ दिवसात कारवाई करण्याची मागणी केली होती व कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला होता, परंतु शासनाने काहीही कारवाई न केल्याने बौध्द समाजाच्या वतीने दिनांक १८.१.२००५ पासून चक्री उपोषणास सुरुवात केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता**: (१),(२) व (३) बारामती शहर पोलीस स्टेशन येथे दि.१-१-२००५ रोजी प्राप्त फिर्यादीवरुन गु.र.नं २/२००५ भा.द.वि.३२६,३२३,५०४,५०६,३४ अन्वये गुन्हा दाखल करुन गुन्हयात ४ आरोपींना दि.२-१-२००५ रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपींनी तक्रारदारास केलेल्या मारहाणीच्या गुन्हयात वापरलेली हत्यारे त्यांच्या रहात्या घरातून काढून दिली आहेत. पोलीसांनी आरोपीविरुध्द खोटा गुन्हा दाखल केला तसेच आरोपींना मारहाण केली हे खरे नाही. तथापि, या प्रकरणी बौध्द समाजाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता. तसेच चक्री उपोषण करण्यात आले होते हे खरे आहे.

(४) या प्रकरणात कोणाविरुध्दही खोटा गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. उपोषणकर्त्यांनी त्यांच्या तक्रारीबाबत त्यांचे काहीही म्हणणे नसल्याचे कळवून दि.२-२-२००५ पासून उपोषण मागे घेतले आहे. हे पहाता या प्रकरणी कोणाविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.शांताराम करमळकर : या प्रश्नाच्या उत्तरामध्ये विसंगती दिसून येत आहे. उत्तरामध्ये सुरुवातीला असे म्हटलेले आहे की, "आरोपींनी तक्रारदारास केलेल्या मारहाणीच्या गुन्हयात वापरलेली हत्यारे त्यांच्या रहात्या घरातून काढून दिली आहेत ." त्यानंतर उत्तराच्या शेवटी असे म्हटलेले आहे की, "या प्रकरणी कोणाविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही" तेव्हा या दोन्ही उत्तरामध्ये विसंगती आहे असे मंत्रिमहोदयांना वाटत नाही काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, मारहाण करण्यात आली यासबंधी तक्रार करण्यात आली होती. श्री.मांढरे यांना श्री.वाघमारे आणि इतर व्यक्तींनी मारहाण केली होती. ..



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

तेव्हा त्यांच्याविरुध्द आणि इतर चौघांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. जे उपोषण कर्ते होते आणि ज्यांनी मोर्चे काढले होते त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा काही प्रश्न उदभवत नाही. लेखी उत्तरात शेवटचे वाक्य हे उपोषणकर्त्या सबंधीचे आहे

श्रीमती कांता नलावडे :सभापती महोदय, तपासाचे निमित्त करुन दलित तरुणांना अटक करण्यात आली होती व अमानुष मारहाण करण्यात आली होती. उत्तरात असे म्हटलेले आहे की "असे काही झालेले नाही" परंतु त्यांच्या विरोधात 1 जानेवारीला फिर्याद दाखल करण्यात आली होती.तेव्हा त्यांना अटक कशासाठी करण्यात आली होती ? हे फिर्यादी कोण होते ? या घटनेतील आरोपींची नावे काय आहेत ? केलेल्या मारहाणीत वापरलेली हत्यारे त्यांच्या घरात मिळालेली आहेत असे उत्तरामध्ये सांगण्यात आलेले आहे .तेव्हा हत्याराने जर मारहाण केली असेल तर त्या व्यक्तीवर प्राणघातक हल्ला झाला असेल तेव्हा ज्याच्यावर हल्ला झाला त्याची प्रकृती आता कशी आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : श्रीमती शोभा भाऊ मांढरे हे या प्रकरणातील फिर्यादी आहेत. त्यांचे वय 40 वर्षाचे असून आंबेडकर वसाहत, बारामती पुणे येथे त्या राहत आहेत. त्यांच्या दिराला सर्व आरोपीनी मारहाण केली होती. या आरोपीची नावे अशी आहेत 1) श्री.संतोष विठ्ठल वाघमारे 2)वाल्मीकी बापू रणदिवे 3)संतोष बबन यादव 4)नितीन विश्वनाथ खरात या चोघांनी मिळून त्या व्यक्तीला मारहाण केली होती व या संदर्भात श्रीमती शोभा मांढरे यांनी तक्रार केली होती त्यानंतर या चौधांना अटक केली गेली व ज्या ज्या हत्यारांनी त्यांनी मारहाण केली होती ती हत्यार काढून देतो असे त्यांनी जाबजबाबात सागितले होते त्याप्रमाणे त्यांच्या घरातून ती हत्यारे जप्त करण्यात आली होती.

श्रीमती संजीवनी रायकर : या लोकांनी मोर्चे काढले होते आणि उपोषण केले होते त्यानंतर हे उपोषण मागे घेण्याची त्यांना एकदम उपरती कशी झाली ? या तक्रार करणा-यांवर कोणी तरी दबाव आणला होता म्हणूनच त्यांनी तक्रार मागे घेतली होती असे माझे ठाम मत आहे तेव्हा या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना काय म्हणावयाचे आहे ?

4...



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : कोणी कोणावरही दबाव आणलेला नाही. संबंधित व्यक्तींविरुध्द कारवाई केल्यानंतर त्यांचे समाधान झालेले असेल किंवा ज्या प्रश्नासाठी त्यांनी उपोषण केलेले असेल तो प्रश्न मिटल्यामुळे त्यांनी उपोषण मागे घेतलेले असेल.

श्री.जोगेन्द्र कवाडे : बारामती शहरात घडलेली ही घटना संपूर्ण देशात गाजलेली आहे.चार दलित बौध्द तरुणांना केवळ तपासासाठी पोलीस स्टेशनला नेले जाते व त्या ठिकाणी अमानुषपणे मारहाण केली जाते ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. बारामती पोलीस स्टेशनमधील अधिकारी वर्गाने केवळ जातीय आकसातून. या दलित बौध्द तरुणांना तेथे मारहाण केली होती हे खरे आहे काय ?

नतर श्री.सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 12:35

प्रा.कवाडे (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 3456 ...

अध्यक्ष महाराज, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, यामध्ये या बौद्ध समाजाने या पोलीस अधिकाऱ्यांच्या विरूद्ध आंदोलन केले, निदर्शने केली, मोर्चा काढला, उपोषण केले. असे असतानाही यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला असा त्यांचा आरोप होता हे खरे आहे का ? कारण पोलीस मंडळी ही आपली बाजू मांडण्यासाठी खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करण्यात किती वाकबगार असतात याची आपणा सर्वांनाच कल्पना आहे. म्हणून हा जो प्रकार घडला आहे त्याबद्दल बौद्ध समाजाने मोर्चा काढला, आंदोलन केले, उपोषण केले आणि तरीही या ठिकाणी म्हटलेले आहे की, कोणाही विरूद्ध खोटा गुन्हा दाखल केलेला नाही. तर मग कलम 326, 323, 504, 506 आणि 34 अन्वये जो गुन्हा दाखल करण्यात आला आहे तो कोणाविरूद्ध दाखल करण्यात आला ? पहिल्यापासूनच या पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांची मानसिकता जातीय, दलितविरोधी आहे, असे आहे का ? असे असेल तर खोटा गुन्हा दाखल करून, त्यांना बेदम मारहाण केलेली आहे काय ? त्यांच्या घरातून शस्त्रे अवगत झालेली आहेत असे म्हटले आहे तर अशा प्रकारे कोणाकडून शस्त्रे वगैरे अवगत करण्याची कला पोलिसांगकडे आहे याचीही आपणास कल्पना आहे. पोलीस मंडळी बळजबरीने मारहाण वगैरे करून कोठूनही ही शस्त्रे आणून आरोपीच्या हातामध्ये देतात आणि मग त्याचेकडे शस्त्रे सापडली असल्याचे चित्र उभे केले जाते तर असा काही प्रकार यामध्ये झालेला आहे काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, ज्या व्यक्तीला मारहाण करण्यात आलेली आहे ती व्यक्तीही दलित समाजातीलच आहे. म्हणजेच मारहाण करणारे आणि ज्याला मारहाण झालेली आहे ते दोन्हीही दलित समाजातीलच आहेत त्यामुळे ते बौद्ध होते वा दलित होते म्हणून पोलीसांनी केस केली असे नाही आणि यामध्ये पोलिसांनी कोणालाही मारहाण केलेली नाही. दुसरे असे की, हे जे आरोपी आहेत ते रेकॉर्डवरील आरोपी आहेत. त्यांच्या यापूर्वीच्या 2-2, 3-3 केसेस आहेत म्हणजेच ते सराईत गुन्हेगार आहेत आणि त्यांनी स्वत:हून जबाबद दिलेला आहे त्यावरूनच त्यांच्या घरातून ती शस्त्रे जप्त पोलिसांनी केलेली आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : अध्यक्ष महाराज, हे फिर्यादी आणि आरोपी हे दोघेही एकाच म्हणजे दलित समाजातील असतील तर त्यांनी अशा प्रकारे एक दुसऱ्याला मारहाण करण्याचे कारण काय? म्हणजे त्यांच्यामध्येही दोन गट होते का .. एक आठवले गटाचे आणि दुसरा अन्य गटाचे असे आहेत का ?

..... एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3456 ...

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, त्याचे कारण असे आहे की, यातील जो वाघमारे म्हणून आहे तो रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहे, इतरही जे आरोपी आहेत तेही रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत आणि ते अवैध धंदे करीत होते. त्यांना पोलिसांनी रेड टाकून पकडले तेव्हा या माणसाने त्याबाबत खबर दिली असा त्यांना संशय असावा म्हणून.

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महाराज, आता येथे माननीय गृह राज्यमंत्री उत्तर देत आहेत की, ते आरोपींचे पाठीमागील रेकॉर्ड हे गुन्हेगारीचे आहे. अध्यक्ष महाराज, खरे तर सदनाला ही खरी माहिती अगोदरच मिळाली पाहिजे होती. आपण या लेखी उत्तरातच ही माहिती द्यायला पाहिजे होती की, या प्रकरणी संबंधितांवर ते नवबौद्ध वा दलित होते म्हणून कारवाई केलेली नाही तर ते रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार होते आणि त्यांनी असा असा प्रकार केला म्हणून त्यांचेवर कारवाई केलेली आहे. अन्यथा आपण जे काही उत्तर येथे लेखी उत्तरात दिले आहे त्यावरून जाणुनबुजून नवबौद्धावर अन्याय करण्यासाठी पोलिसांनी मारहाण केलेली आहे असा समज होतो. मुळात जे आरोपी आहेत त्यांच्याबाबतची माहिती मूळ उत्तरात येण्याची आवश्यकता आहे, तो खरा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. नाही तर सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे म्हणाले ते बरोबर आहे. तुम्ही असे उत्तर दिले तर त्यातून समज असाच होईल की, ते नवबौद्ध आहेत म्हणूनच पोलिसांनी असे केले. तेव्हा आपण अशा प्रकारे उत्तर देऊन हा मराठा, समाजाचा, हा दलित समाजाचा वगैरे वर्णन केले तर त्यातून पुन्हा जातीपातीचे गट निर्माण आपणच करता असे होईल. तेव्हा आपला जो काही मूळ खुलासा आहे तसा आपण येथे स्पष्ट करणार काय ?

( यानंतर श्री. जागडे .... आय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3456......

श्री. मधुकर सरपोतदार ......

ते जर गुन्हेगार असतील तर त्यांनी कोणते गुन्हे केले आहेत, ते सदनाला समजण्याची आवश्यकता आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे उत्तरामध्ये सुधारणा करण्यात यावी. श्री. संतोष विठ्ठल वाघमारे यांच्या विरुध्द कलम 182,143,148,307,205 आणि 324 अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच श्री. रणदिवे यांच्या विरुध्द कलम 182,143,148,307 तसेच गुन्हा रजिस्टर क्र. 151/2004 अन्वये कलम 182,143,148,149,427 आणि गुन्हा रजिस्टर क्र. 2/2005 अन्वये कलम 326 नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सभापती महोदय, सदरहू व्यक्ति नवबौध्द होत्या म्हणून त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केलेला नाही. ते रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्य सुरक्षारक्षक मंडळातील भरतीत**

**लाखो रुपयांचा झालेला जैरव्यवहार**

**(५) * २०१५ श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. नातिकोद्दीन खतिब , श्री. मुझफ्फर हुसे सय्यद , श्री. सुधाज र जणगणे , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्री. वसंतराव चव्हाण** : सन्माननीय कामगार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील ज़ाय :-

(१) महाराष्ट्र राज्य सुरक्षारक्षक मंडळाने रक्षकांच्या भरतीत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी लाखो रुपयांचा गैरप्रकार केल्याचे माहे डिसेंबर, २००४,जानेवारी, २००५ या कालावधीत अथवा त्यादरम्यान आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. रविशेठ पाटील**, **श्री.गणेश नाईक यांच्याकरिता** : (१) -ाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : डिसेंबर 2004 ते जानेवारी 2005 या कालावधीत महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळाने रक्षकांच्या भरतीत मंडळाच्या अधिका-यांनी लाखो रुपयाचा गैरप्रकार केल्याचे त्यावेळचे मंत्री श्री. नवाब मलिक यांनी कबूल केले आहे. त्याप्रमाणे तेथील अधिका-यांना निलंबित करण्याची घोषणा केली होती. त्या बाबतचे सर्व रेकॉर्ड आता माझ्याकडे उपलब्ध आहे. सभापती महोदय, त्या ठिकाणी नोकरीत असलेल्या कर्मचा-यांच्या नावावर 30 ते 40 हजार रुपये कर्ज घेतलेले आहे. त्यामुळे या ठिकाणी काम करणा-या कोणत्याही सुरक्षा रक्षकास आज कोणतेही संरक्षण नाही. म्हणून सुरक्षा रक्षकांच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन त्या ठिकाणी जे दोषी आहेत, त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2015......

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, 2000-2001 मध्ये नियमबाह्य भरती या सुरक्षा मंडळात झालेल्या आहेत. त्यामुळे श्री. जाधव यांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे. बेकायदेशीर भरती केल्यामुळे श्री. वैराट यांना निलंबित करण्यात आले आहे. शासनाने दि. 15 एप्रिल 2003 रोजी....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे....

**सभापती** : मी माननीय सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिलेली नाही. माननीय मंत्रिहोदयांचे उत्तर संपल्यानंतर माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, या सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत एक समिती नेमण्यात आली. दि. 15 एप्रिल 2003 पासून या समितीने काम केले आहे. या सुरक्षा रक्षक समितीमध्ये अध्यक्ष, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळ, प्रधान सचिव ( कामगार ), पोलीस आयुक्त ( मुंबई ), कामगार आयुक्त ( मुंबई ), संचालक ( सेवायोजन ) अप्पर आयुक्त ( ठाणे ), समाज कल्याण अधिकारी ( ठाणे ) व सचिव, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळ हे सदस्य आहेत. सुरक्षा रक्षकांची भरती करीत असताना वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविले जातात. त्यानंतर मैदानी परीक्षा, तोंडी परीक्षा तसेच इतर आवश्यक त्या सर्व परीक्षा घेतल्या जातात. त्यामुळे 2003 सालानंतर या सुरक्षा रक्षक मंडळामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2015...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एवढे सर्व भ्रष्टाचाराचे रामायण वाचल्यानंतर शासनाने नाही असे उत्तर दिले आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपण ही कमिटी जाहीर केली. तर मग वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देऊन उमेदवार कां मागविले? सेवा योजन कार्यालयातून उमेदवार कां मागविले नाहीत? शासनाने सेवायोजन कार्यालय उघडले आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांवर लाखो-करोडो रुपये खर्च होतात. आपल्याला नोकरीचा कॉल मिळाला पाहिजे या अपेक्षेने तरुण मुले उन्हा-तान्हात उभे रहातात. माननीय श्री. नवलकर साहेबांनी त्यांच्या आमदार फंडामधून त्या ठिकाणी शेड बांधून दिली आहे...

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, भरती करीत असतांना त्याठिकाणी समाज कल्याण अधिकारी उपस्थित असतो. तसेच, त्या कमिटीमध्ये सुध्दा आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, भरती करण्याचे सर्वसाधारण नियम आहेत. त्याप्रमाणे सेवायोजन कार्यालय, समाज कल्याण विभाग यांचेकडून उमेदवारांची यादी मागविली जाते. असे अन्य प्रकारचे नियम आहेत त्यांचा अवलंब केला पाहिजे. असे असतांना जाहिरात देऊन उमेदवार मागविण्याऐवजी आपण सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवार कां मागविले नाहीत?

श्री. रविशेठ पाटील : सुप्रिम कोर्टाच्या निदेशानुसार जाहिरात दिली आहे.

श्री. दिवाकर रावते : माझा प्रश्न असा आहे की, सुप्रिम कोर्टाने सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवार घ्यायचे नाहीत, जाहिरात देऊन उमेदवारांना बोलावले पाहिजे असे सांगितले आहे काय?

श्री. रविशेठ पाटील : याबाबत नंतर विचार करु.

श्री. दिवाकर रावते : त्यावेळी विचार कां केला नाही?

श्री. रविशेठ पाटील : सुप्रिम कोर्टाने निदेश दिल्याप्रमाणे आपण केले आहे.

श्री. दिवाकर रावते : सुप्रिम कोर्टाने जाहिरात देऊन उमेदवार मागवा, त्यासाठी जाहिरात देण्याची आवश्यकता नाही असे निदेश दिले आहेत कां?

श्री. रविशेठ पाटील : असे नाही, त्यांनी निदेश दिल्याप्रमाणे सुरक्षा रक्षक मंडळाच्या भरतीसाठी कमिटी नेमली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2015...

श्री. दिवाकर रावते : सुप्रिम कोर्टाने काय निदेश दिले?

श्री. रविशेठ पाटील : त्यांनी सेवायोजन कार्यालयातून माणसे घ्या असे सुध्दा सांगितले नाही.

श्री. दिवाकर रावते : आपण मला जर अधिकृत उत्तर दिले नाही तर मी आपणाविरुध्द हक्कभंग आणीन.

**सभापती** : मंत्रिमहोदय, प्रश्न अगदी सरळ आहे. सेवायोजन कार्यालयाकडून, समाज कल्याण कार्यालयाकडून उमेदवारांची यादी मागविण्याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे सेवायोजन कार्यालय, समाजकल्याण कार्यालय यांचेप्रमाणेच जाहिरात देऊन उमेदवारांना बोलवा अशा प्रकारच्या सूचना सुप्रिम कोर्टाने दिल्या आहेत काय?

श्री रविशेठ पाटील : याबाबत आम्ही ताबडतोब विचार करुन निर्णय घेऊ.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, हा गंभीर विषय आहे. या महाराष्ट्र सरकारमध्ये परप्रांतियांचा भरणा होत आहे. कोर्टाचे निदेश सांगून मंत्रिमहोदय आणि शासनाचे अधिकारी बनवा बनवी करीत आहेत. सुप्रिम कोर्टाने निदेश दिले असले तरी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन उमेदवार घेण्याचे आपल्यावर बंधनकारक नाही. वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यासाठी प्रचंड खर्च येतो, निधीची उपलब्धता नसल्यामुळे सेवायोजन कार्यालयाकडून, समाजकल्याण कार्यालयाकडून उमेदवार घेण्याबाबत शासनाच्या स्पष्ट सूचना आहेत असे आपण अधिकृतरित्या सांगता. मंत्रिमहोदय, आपण भविष्यामध्ये काय करणार आहात यापेक्षा सेवायोजन कार्यालयाकडून यादी कां मागविली नाही याचा आपण अधिकाऱ्यांना जाब विचारला पाहिजे....

श्री. रविशेठ पाटील : माननीय सदस्यांनी सेवायोजन कार्यालयामार्फत भरती करण्यासंबधीचा मुद्दा मांडला असला तरी संबंधित जी युनियन आहे ती सुप्रिम कोर्टामध्ये गेली होती. त्या युनियनने याचिका दाखल केली होती.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी पहिल्यांदा सांगितले की, सुप्रिम कोर्टाने निदेश दिले. प्रश्न असा आहे की, अशा पध्दतीने भरती करावी असे सुप्रिम कोर्टाने निदेश दिले आहेत कां? नसेल तर ही जाहिरात आपण कशासाठी दिली? स्थानिक लोकांना नोकरीची संधी प्राप्त व्हावी याकरिता शासनाने सेवा योजन कार्यालय सुरु केले आहे. अशाप्रकारच्या याचिका हजारो येतात, त्यांना महत्व नाही. (यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2015 . . . .

श्री.नितीन गडकरी . . . .

याबाबतीत सुप्रीम कोर्टाने निर्णय घेऊन तुम्हाला डायरेक्शन्स् दिलेल्या आहेत का ? जर अशा डायरेक्शन्स् दिलेल्या असतील तर तसे सांगा.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, मी याचिका वाचून दाखवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला याचिका नको, तर निर्णय सांगा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाबद्दल फक्त चर्चा करीत आहोत.

**सभापती** : याठिकाणी सातत्याने एक प्रश्न विचारला जात आहे. माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात असे सांगितले की, सुप्रीम कोर्टाने एक निदेश दिला आहे. त्या अनुषंगाने हे निदेश कोणते आहेत ? हा पहिला प्रश्न . दुसरे म्हणजे याबाबतीत एम्प्लॉयमेंट एक्सचेंज, समाजकल्याण विभाग या गोष्टी देखील महत्वाच्या आहेत. सुप्रीम कोर्टाने डायरेक्शन दिल्या असतील तर त्याप्रमाणे जाहिरात जरुर काढा. पण एम्प्लॉयमेंट एक्सचेंज आणि समाज कल्याण विभाग यांच्याकडूनही उमेदवारांची यादी जरुर मागवावी अशी सन्माननीय सदस्यांची भावना आहे आणि ती योग्य आहे. त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांचे उत्तर येणे गरजेचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. आपण आता जे सांगितले, त्यामध्ये तथ्य आहे. दुर्दैवाने मी आज यासंबंधातील कागदपत्रे आणलेली नाहीत. आपण मला एक संधी द्या. मी सुप्रीम कोर्टाचा निर्णय आणि महाराष्ट्र शासनाच्या विधी विभागाने दिलेले निर्देश, त्यांनी याचा लावलेला अर्थ इत्यादी. सर्व बाबी सदनासमोर ठेवावयाची माझी इच्छा आहे. कोणतीही भरती असली तरी जाहिरात दिली जाते आणि एम्प्लॉयमेंट एक्सचेंजला डावलले जाते. त्यामुळे येथील तरुणांना संधी मिळत नाही, हा अत्यंत मुलभूत विषय आहे. त्यामुळे या प्रश्नाच्या निमित्ताने या विषयावर चर्चा व्हावी अशी इच्छा आहे. तेव्हा हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा आणि या विषयावरील चर्चेसाठी संधी उपलब्ध करुन द्यावी आणि म्हणजे त्यातून आम्हाला घटनात्मक बाजू मांडण्याची संधी मिळेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी मला एक विनंती करावयाची आहे. याठिकाणी एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमार्फत उमेदवार मागवून भरती झाली तर त्यामुळे

. . . .के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2015 . . . .

श्री.नितीन गडकरी . . . .

स्थानिक युवकांना प्राधान्य मिळणार आहे. ज्यावेळी जाहिरात दिली जाते, तेव्हा बाहेरचे लोक अर्ज करतात. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डर्स् आहेत. जर सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डर्स् असतील तर त्या काय आहेत ? ते त्यांनी सांगावे. जर सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डर्स् माहिती नसतील तर येथील स्थानिक भूमीपूत्रांना न्याय मिळावा म्हणून हा निर्णय तपासून माननीय मंत्री महोदयांनी नंतर उत्तर द्यावे आणि तोपर्यंत हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सुरक्षा रक्षकांच्या भरतीमध्ये भ्रष्टाचार होतो हे जगजाहीर आहे. याबाबतीत वेगळे सांगण्याची गरज नाही. सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला, त्यामध्यें केवळ जाहिरातीव्दारे सुरक्षा रक्षकांची भरती करावी असे आहे का ? जर तसे नसेल तर जाहिरातीसोबत एम्प्लॉयमेंट एक्सचेंजव्दारा, जेथे बेरोजगारांची नावे नोंदविलेली असतात, त्यांच्याकडून आणि समाजकल्याण विभागाचे देखील एम्प्लॉयमेंट एक्सचेंज असते, त्यांच्याकडून देखील उमेदवारांना बोलाविण्यामध्ये या शासनाला कोणती हरकत आहे ?

**सभापती** : सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे, त्याची माहिती माननीय मंत्री महोदयांकडे आहे का ?

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : आम्हाला वेळ द्या. नंतर चर्चा करु.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, ही चर्चा नंतर करु.

**सभापती** : सदरहू प्रश्न मी राखून ठेवतो. माननीय मंत्री महोदयांनी पुन्हा तयारी करावी, त्यानंतर हा प्रश्न घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, भूमीपूत्रांच्या विषयासंबंधात आपण न्याय दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

-----

. . . .के-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोरीवली (मुंबई) येथे देवीपाडा भाजात जवाहिऱ्याच्या
-ाोजराची हत्या जरु-ा दरोडा घातल्याबाबत

(6) * 4590 श्री. जोविंदराव आदिज , श्री. संजय दत्त : स-मा-ा-ीय उप मुज्य मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) बोरीवली (मुंबई) येथील देवीपाडा भाजात जवाहिऱ्याच्या -ाोजराची दि-ाांज 12 ऑजस्ट, 2004 रोजी हत्या जरु-ा भीषज दरोडा घालज्यात आल्याच्या घट-ोचा पोलीसांमार्फत चालू असलेला तपास पूर्ज झाला आहे जाय,

(2) असल्यास, तपासात जाय -िाष्पन झाले व पुढे जोजती जारवाई जरज्यात आली वा येत आहे,

(3) अद्याप याप्रजरजी जोजतीही जारवाई झाली -ासल्यास होत असलेल्या विलंबाची जारजे जाय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) -ाही.

(2) व (3) सदर जु-हा हा चोरी जरज्याच्या उद्देशा-ो जरज्यात आला असू-ा जु-ह्याचा तपास जसोशि-ो जरज्यात आला. परंतु महत्वाचे धाजेदोरे मिळाले -ाहीत. जु-ह्याचा शोध -ा लाजल्या-ो जु-ह्याचा तपास तात्पुरता बंद जरु-ा जु-हा -िारंतर तपासावर ठेवज्यात आला आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ता.प्र.क्र.4590.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, छापल्याप्रमाणे. पण पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील प्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

"दिनांक 12-8-2004 रोजी देवीपाडा भागातील जवाहि-याच्या नोकराची हत्या व घरफोडी-चोरी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मात्र त्याचा तपास पूर्ण झालेला नाही." असे वाचावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, यासंबंधात माझे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा की, पोलिसांनी या गुन्हयाचा तपास कोणत्या पध्दतीने केलेला आहे ? यामध्ये विलंब का झ ाालेला आहे ? याठिकाणी दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "गुन्हयाचा शोध न लागल्याने गुन्हयाचा तपास तात्पुरता बंद करुन गुन्हा निरंतर तपासावर ठेवण्यात आला आहे." तर 2004 मध्ये मुंबईमध्ये पडलेल्या किती दरोडयांच्या प्रकरणांचा तपास लागलेला नाही ? याची माहिती माननीय मंत्री महोदय देतील का ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4590 (पुढे चालू...

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : देवीपाडा भागामध्ये विकास ज्वेलर्स येथील नोकराची हत्त्या झालेली आहे. त्याची हत्त्या झाल्यानंतर पोलीसांनी तो मालक राजस्थानचा रहाणारा आहे, त्या ठिकाणी जाऊन तपास करण्याचा प्रयत्न केला. त्याची कोणाशी दुष्मनी आहे काय, याचाही पूर्ण तपास केलेला आहे. त्याचबरोबर श्वान पथकाला बोलावून चौकशी केलेली आहे. इतरत्र पडलेल्या दरोड्यामध्ये आरोपींची ठसे मिळाले त्या ठशावरून ट्रेस करण्याचा प्रयत्न केला परंतु ट्रेस झाले नाही. या दृष्टीने पोलिसांनी तपास केलेला आहे. आतापर्यन्त 2004 मध्ये ज्वेलरीवर दोनवेळा दरोडे पडलेले होते. त्यापैकी एक डिटेक्ट झालेला आहे. 2005 मध्ये तीन दरोडे पडले त्यामधील एकाचा तपास लागलेला आहे.

श्री.मधुकर चव्हाण : मध्यंतरी या गुन्ह्याच्या संदर्भामध्ये पोलीस आयुक्तांचे वक्तव्य आलेले होते काय ? आपण येथे असे म्हटलेले आहे की, "सदर गुन्हा हा चोरी करण्याच्या उद्देशाने करण्यात आला होता वगैरे.".. परंतु महत्वाचे धागेदोरे मिळाले नाहीत. "गुन्ह्याचा शोध न लागल्याने गुन्ह्याचा तपास तात्पुरता बंद करून गुन्हा निरंतर तपासावर ठेवण्यात आला आहे." याचा अर्थ काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, साधरणपणे गेल्या वर्षभरात भीषण दरोडे घातले गेले, त्यामध्ये नुसते दागिने आणि संपत्ती लुटली नाही तर घरातील वृध्द लोकांचे अमानुषपणे, निर्दयपणे खून केले गेले. मुंबई शहरामध्ये साधारणत: पोलीस एखादा गुन्हा करण्याच्या मोडस ऑप्रेंटीमुळे तो गुन्हा शोधतात. शासनाला असे वाटते काय की, हे गुन्हेगार परप्रांतातून येथे येतात, गुन्हे करतात आणि तशा गुन्ह्येगारांच्या हाताचे ठसे, गुन्हा करण्याची प्रवृत्ती माहीत नसल्यामुळे या गुन्ह्याचा शोध लागत नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या गुन्ह्याची सर्व बाजूंनी चौकशी केल्यानंतर देखील धागे-दोरे पोलिसांना आतापर्यन्त सापडले नाहीत. म्हणून त्यांनी तात्पुरता गुन्हा स्थगित केलेला आहे. पुढे केव्हातरी दुसऱ्या गुन्ह्यामध्ये आरोपी सापडले तर या गुन्ह्याचा तपास करता यावा, म्हणून तात्पुरता गुन्हा स्थगित करण्यात आलेला आहे. चोरी-दरोड्याचे जे प्रकार होतात, त्यातील तीन-चार दरोड्यापैकी एखाद्या दरोडयातील आरोपी सापडल्यानंतर सगळीकडील माल त्याच्याकडून रिकव्हरी करुन घेतो. त्याचा तपास केला जातो. पुढे केव्हाही त्याचा तपास करता यावा, या दृष्टीकोनातून तपास तात्पुरता स्थगित केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4590 पुढे चालू..

डॉ.दीपक सावंत : गेल्या सहा महिन्याचा ट्रॅक रेकॉर्ड पाहिला तर मुंबई शहरामध्ये भयानक दरोडे पडले. मुंबई शहराच्या बाहेरही दरोडे पडलेले आहेत. या दृष्टीने ठाणे शहरामध्ये ज्या पध्दतीने आपण कमांडोचे पथक तयार केलेले आहे त्या प्रमाणे त्याच धर्तीवर मुंबईमध्ये देखील दुपारच्या वेळेस दरोडे पडतात, त्यावेळेस अशाप्रकारचे कमांडो पथक तयार करणार आहात काय ? तशी शासनाकडे योजना आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी फार चांगली सूचना केली . त्याचा निश्चितपण् विचार केला जाईल, तशी कार्यवाही करण्यात येईल.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/

**कोल्हापूर येथील संगणक प्रशिक्षण संस्थेकडून**
**विद्यार्थ्याची झालेली फसवणूक**

**(7) * 2103 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर शहरातील एका संगणक प्रशिक्षण संस्थेकडून सुमारे दिडशे विद्यार्थ्यांना टेलिमार्केटींगद्वारे भुरळ घालून लाखो रुपयांना फसविल्याची तक्रार काही विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी दिनांक 14/1/2004 रोजी वा त्या दरम्यान उप विभागीय पोलीस अधिकारी कोल्हापूर यांचेकडे केलेली आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांचेकरिता** : (1) कोल्हापूर शहरातील एका संगणक प्रशिक्षण संस्थेकडून सुमारे दिडशे विद्यार्थ्यांना टेलीमार्केटींगद्वारे भुरळ घालून लाखो रुपयांस फसविल्यासंदर्भात विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून दिनांक 14.1.2004 रोजी वा त्या दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी,कोल्हापूर यांच्याकडे कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.शरद पाटील : उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी अशाप्रकारची तक्रार उप विभागीय पोलीस अधिकाऱ्याकडे गुन्हा नोंदविला गेलेला नाही असे उत्तर दिलेले आहे. हा प्रश्न विचारण्यामागचे कारण तेथील अनेक पालकांनी तक्रारी केलेल्या होत्या आणि अनेक वर्तमानपत्रांमधून बातम्या आलेल्या होत्या. अशाप्रकारची फसवणूक कोल्हापूर शहरामध्ये घडलेली होती, त्या संदर्भात तक्रारी केल्यानंतरच हा प्रश्न विचारण्यात आलेला आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार... 13:00

ता. प्र.क्र.2103...

प्रा. शरद पाटील..

जरी या उपविभागीय पोलीस अधिका-याकडे तक्रार नोंदविली गेली नसली तरी देखील अशा प्रकारचा गुन्हा घडला आहे की नाही याचा तपास पोलीस खात्याने हा प्रश्न विचारल्या नंतर केलेला आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्या नंतर प्रश्नाची पूर्ण माहिती घेत असताना चौकशी केलेली आहे. अशा प्रकारचा गुन्हा कोल्हापूर जिल्हयात घडलेला नाही.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तर देण्याच्या शैली विषयी विचारावयाचे आहे.कोणकणती विशेषणे ब्युरोक्रॅट्स लावू शकतात याचे ज्ञान आम्हाला होत आहे. मंत्रिमहोदय, आपण मघाच्या उत्तरात म्हणलात की,"निरंतर तपासावर ठेवण्यात आले आहे".प्रश्न क्रमांक 20 ला उत्तर देत असतांना आपण म्हणालात की "सर्वतोपरी तपास चालू आहे." त्यानंतर आता आपण म्हणालात की, "तक्रारच दाखल झालेली नाही." आणि आता उत्तर सुधारुन देत असतांना म्हणालात की, "गुन्हाच घडला नाही." आता आम्ही हे कसे समजून घ्यायचे. "तक्रार येवो अथवा न येवो आम्ही त्याचा छडा लावीत आहोत आणि सगळा तपास झाल्या नंतर लक्षात आलेले आहे की, गुन्हा घडलेला नाही." असे उत्तर आपल्याकडून यावयास पाहिजे होते. म्हणून माझ ा प्रश्न असा आहे की, छापील उत्तर आणि आता येथे मंत्रिमहोदय जे दत्तर देत आहेत याच्यात जर संगती लागत नसेल तर आम्ही काय बोध घ्यायचा?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,प्रश्न कर्त्यांनी कोल्हापूर शहरातील एका संगणक संस्थेकडून सुमारे 150 विद्यार्थ्यांना टेलिमार्केटींगद्वारे भुरळ घालून लाखो रुपयांना फसविण्याची तक्रार दिनांक 14.1.2004 रोजी वा त्या दरम्यान उप विभागीय पोलीस अधिकारी कोल्हापूर यांचेकडे केलेली आहे हे खरे आहे काय? असे विचारले आहे. त्याचे ते उत्तर आहे. कोल्हापूर मध्ये ही घटना घडलेली नाही. ही घटना कराडमध्ये घडलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील :गुन्हा दखल केलेला नाही. पण अशी तक्रार विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशनला दाखल केली होती. पण प्रत्यक्षात पोलीस स्टेशनने गुन्हा दाखल करुन घेतलेला नाही.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : प्रश्न कर्त्यांनी कराड ऐवजी कोल्हापूर असे म्हटलेले आहे म्हणून उत्तर देतांना "नाही" असे उत्तर दिलेले आहे.ही घटना कराडला घडलेली आहे.

**सभापती** :प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाला प्रश्नोत्तरे छापून येतात आणि त्याच्यासमोर त्या प्रश्नाचे उत्तर कोण देणा-या मंत्र्यांचे नांव देखील छापून येते. ते मंत्री महोदय अनुपस्थित असले तरी त्या विभागाचे राज्यमंत्री उत्तर देतात. उद्योग खात्याच्या वतीने श्री. गणेश नाईक यांचे नाव छापलेले होते. त्याप्रमाणे श्री. गणेश नाईक यांनी उत्तर द्यावयास पाहिजे होते. पण सन्माननीय मंत्री महोदय, श्री. रविशेट ठाकूर ता.प्र.क्र.2015 ला उत्तर देण्याकरिता उभे राहिले आणि ते उत्तर देत होते. त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम, वने, पर्यावरण, आदिवासी विकास ही खाती आहेत. उद्योग खात्याचा त्यांच्याशी काही संबंध नाही. तरी ते उभे राहिले आणि उत्तर देत होते. त्या प्रश्नावर 15 मिनिटे चर्चा झाली. "आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते"अशा प्रकारची सरकारची अवस्था झालेली आहे.कोणीही मंत्री येतो, कोणीही उत्तर देतो. कोणीही काहीही सांगतो. सभापती महोदय, मला आश्चर्य वाटले, दालनात बसलेल्या अधिका-यांनी ज्यांनी त्यांना ब्रिफिंग करावयाचे आहे त्यांच्याही दुस-या खात्याचे मंत्री उत्तर देत आहेत हे लक्षात आलेले नाही.सभापती महोदय, ही गंभीर घटना आहे.

**सभापती** :विधानपरिषदेमध्ये त्या त्या विभागाचे संबंधित मंत्री आणि राज्यमंत्री उत्तरे देतात. पण एखादा अपवाद असेल तर दुस-या खात्याच्या एखाद्या राज्यमंत्र्यांनी किंवा मंत्र्यांनी उत्तर दिले तर ते अयोग्य नाही फक्त, ते अचूक असावे अशी आपली अपेक्षा आहे. उत्तर अचूक असावे यादृष्टीने आपण तो प्रश्न तहकूब केलेला आहे.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, आपण म्हणालात ते बरोबर आहे. एकाच खात्याचे मंत्री आणि राज्यमंत्री मिळून उत्तर देण्याची एक सामुहिक जबाबदारी आहे. पण या ठिकाणी वेगळाच प्रकार घडला आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. रविशेट पाटील यांना माहीत नव्हते की, ते खाते आपल्याकडे नाही आणि त्यांनी उत्तर दिले. आणि उत्तर दिल्या नंतर त्यांना कळले की, ते खाते आपल्याकडे नाही.

---x---

यानंतर श्री. बरवड ....

अध्यक्षीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2002-2003 चा पाचवा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : तापी पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2002-2003 चा पाचवा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2004-2005 चे अर्थ विवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन 2003-2004 चे सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2004-2005 चे अर्थ विवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन 2003-2004 चे सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. माननीय गृह राज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे साहेबांचा आज वाढदिवस आहे. आपणा सगळयांच्या वतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा देऊ या.

**सभापती** : सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे यांना आमच्या सर्वांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देतो. त्याचप्रमाणे सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांचाही आज वाढदिवस आहे. त्यांनाही सर्वांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. आपण औचित्याच्या मुद्दयावर काही बंधने आणलेली आहेत तसेच हरकतीच्या मुद्दयांच्या बाबतीत ....

**सभापती** : हरकतीच्या मुद्दयाच्या बाबतीत बंधन आणलेले नाही. फक्त प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीच्या मुद्दयाच्या बाबतीत बंधन आणलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, दोन तीन दिवसांपूर्वी 5 तारखेला सोलापूर मधील श्री. पंडित देशमुख नावाच्या शिवसेनेच्या तरुणाचा दुपारी खून झाला. विधानसभेमध्ये यासंदर्भात संबंधित लोकांना अटक करु अशा प्रकारची माहिती दिली गेली. आज तीन दिवस उलटून गेले तरी संबंधित लोकांविरुध्द कारवाई केलेली नाही. यात जे गुन्हेगार आहेत त्यांची नावे रेकॉर्डवर आहेत. त्यांना पकडले जात नाही. अशा प्रकारची परिस्थिती महाराष्ट्रामध्ये वाढत चाललेली आहे. ही भयानक परिस्थिती आहे. राज्यात कायद्याचे राज्य नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. श्री. पंडित देशमुख यांचे जे कोणी मारेकरी असतील त्यांना ताबडतोब पकडण्याच्या संदर्भात महाराष्ट्र शासन किंवा गृह मंत्रालय काही पावले उचलणार आहे काय ? याबाबतीत सभागृहामध्ये माहिती मिळाली तर बरे होईल.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदय श्री. भुजबळ साहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. मी या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय श्री. भुजबळ साहेबांना आणि गृह राज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे साहेबांना सांगेन की, हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. या अनुषंगाने विधानसभेमध्ये चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत गृह विभागाने गांभीर्याने कार्यवाही करावयाची आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. ही पहिलीच घटना नाही. तेथील लोकसभेचे जे उमेद्‌वार होते त्यांना मारण्याची धमकी मिळाली होती त्यावेळी मी स्वत: शासनाकडे चार वेळा पत्रव्यवहार केला. त्या ठिकाणी खून होणार आहे, मोहोळमध्ये अशी घटना घडेल असे मी पत्रात लिहिले होते. हे कोणत्या पक्षाचे आहेत हा महत्वाचा प्रश्न नाही. या लोकशाहीमध्ये अशा प्रकारे हे चालणार नाही. मोहोळची घटना गंभीर आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्वांना दिलासा देणे सरकारचे काम आहे. त्यांची ती जबाबदारी आहे. या गंभीर घटनेच्या बाबतीत सरकारने निवेदन करावे. लोकशाहीच्या दृष्टीने काळजी घेतली पाहिजे. तेथील लोकांच्या मनामध्ये भीती आहे.

**सभापती** : मोहोळ येथील घटनेच्या अनुषंगाने या सभागृहामध्ये गृह विभागाने निवेदन करावे. त्याचबरोबर जे आरोपी आहेत त्यांच्यावर अत्यंत कठोर कारवाई करावी आणि त्यादृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी स्वत: पहावे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, आपल्या आदेशाचे अनुपालन करण्यात येईल.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेले चार दिवस आम्हाला चारचौघांमध्ये वावरणे अशक्य झालेले आहे. वर्तमानपत्रामध्ये सारख्या चौकटी येत आहे. व्यंगचित्रे येत आहेत. आज अग्रलेख आलेला आहे. आम्ही सर्व सदस्य लॉबीमध्ये बसून सिगारेट ओढतो, पान खाऊन पचापचा थुंकतो तसेच ज्या ठिकाणी बसतो त्या ठिकाणी सुध्दा थुंकतो असे छापून आलेले आहे. आम्ही असे केलेले नाही. आम्ही पान खात नाही, पचापचा थुंकत नाही तसेच लॉबीमध्ये बसून सिगारेट ओढत नाही तरीही अशी बातमी आल्यानंतर समाजाचा आमच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. आम्ही शिस्तप्रिय लोक आहोत. अशा प्रकारचे बेशिस्त वर्तन आम्ही सभागृहामध्ये कधीही केलेले नाही. आपण आमच्या वतीने लोकांना सांगावे की, आमचे सर्व आमदार शिस्तप्रिय आहेत.

**सभापती** : या सभागृहाचे सर्व लोकप्रतिनिधी या अनुषंगाने असणारी जी पथ्ये आहेत ती पूर्ण पथ्ये लॉबीमध्ये पाळण्याचा प्रयत्न करतात....

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, आम्ही ते पाळतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो. मी गेल्या 11 वर्षापासून या सभागृहाचा सदस्य आहे. मी या परिसरामध्ये कोणत्याही सदस्याला, मग तो कोणत्याही पक्षाचा असेल, त्यांना थुंकतांना, सिगारेट ओढताना पाहिलेले नाही. सन्माननीय सदस्य असा प्रयत्न करतात असे नाही तर आम्ही कोणीही असे वागलेलो नाही. असे कधीही घडलेले नाही.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

म्हणून आपल्याला विनंती आहे की, मा.सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. आम्हाला देखील लोक विचारतात की, तुम्ही सभागृहात थुंकता काय ? सभागृहात सिगारेट ओढता काय ? त्यामुळे आम्हालाही खटकते.

**सभापती** : या सभागृहातील लोकप्रतिनिधी लॉबी असो किंवा अन्य ठिकाण असो ते अशा कोणत्याही पध्दतीचा अवलंब करीत नाहीत आणि करणार नाहीत आणि ज्यांनी कोणी याबाबतीत नोंद घ्यावयाची आहे त्यांनी सुध्दा बातमी देताना याची नोंद गांभीर्याने घ्यावी ही माझी अपेक्षा आहे.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्र शासनाची डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले समग्र ग्रंथ प्रकाशन समिती आहे. परंतु या समितीची मुदत दिनांक 31 डिसेंबर, 2004 रोजी संपली आहे. दरवर्षी या समितीला मुदतवाढ दिली जाते. श्री.सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असताना ही समिती कायम करण्यात येईल अशाप्रकारचे आश्वासन, अभिवचन दिले होते. या समितीसाठी लागणारा जो फंड आहे त्याची पुरेशी व्यवस्था होत नाही. पुरेसा कर्मचारी द्यावयास पाहिजे त्याची व्यवस्था होत नाही. या समितीची अवस्था दयनीय आहे. त्यामुळे या समितीलाच अस्पृश्य ठरविले जात नाही ना अशी शंका निर्माण होते. म्हणून शासनाला विनंती करावयाची आहे की या समितीचे योग्य कामकाज होण्यासाठी या समितीला निधी व कर्मचारी देण्यात यावा. या महान नेत्यांनी अजरामर साहित्य, पुरोगामी महाराष्ट्र घडविणारे साहित्य निर्माण केले आहे, महाराष्ट्राला कार्यक्षम व बळकळ करण्यासाठी आपण शासनाला निदेश द्यावेत अशी माझ ी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले समग्र ग्रंथ प्रकाशन समितीची मुदत संपलेली आहे असे मा.सदस्यांनी सांगितलेले आहे. ही समिती कायम स्वरुपात असावी या समितीच्या एकूण कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत चांगली आर्थिक तरतूद असावी यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे, निर्णय घेणे आवश्यक आहे. यासंबंधी ज्येष्ठ मंत्र्यांनी पुढाकार घेऊन नियम होणे किंवा निर्णय होण्यासाठी प्रयत्न करावा.

श्री.छगन भुजबळ : होय.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 च्या सूचनांसंबंधी**</u>

**सभापती** : आज काही नियम 93 च्या सूचना माझ्याकडे आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "वसमत, जि.हिंगोली येथील पूर्णा पाटबंधारे विभागात निविदा मंजूर नसताना खोटी कागदपत्रे व अभिलेखे तयार करुन 1 कोटी, 30 लाख रुपयांचा करण्यात आलेला अपहार" यासंबंधी नियम 93 ची सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने यासंबंधी निवेदन करावे असा निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व इतर वि.प.स.यांनी "नरखेड, जि.नागपूर येथील तीव्र पाणीटंचाई दूर करण्यासाठी वाढीव नळ पाणीपुरवठा योजनेतील पाईप लाईनचे काम युध्द पातळीवर करणे" यासंबंधी नियम 93 ची सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने यासंबंधी निवेदन करावे असा निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी राज्यात व्हॅट लागू झाल्यानंतर मच्छिमारांच्या भवितव्यासाठी डिझेलवरील सवलत कायम ठेवणे" यासंबंधी नियम 93 ची सूचना दिलेली आहे. हा विषय नियम 93 चा होत नाही. शासनाने यासंबंधी निवेदन करावे असा निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, खालचे सभागृह या विषयावर तहकूब झाले आहे. या राज्याला 720 कि.मी.समुद्र किनारा आहे, त्याठिकाणच्या मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली आहे. या प्रश्नावर खालचे सदन तहकूब झाले आहे त्यामुळे तेथे निवेदन होणार आहे. त्याठिकाणी जे निवेदन होईल ते आज या सभागृहातही होण्याची आवश्यकता आहे.

**सभापती** : या विषयावर आवश्यकता वाटली तर लक्षवेधी सूचना घेऊ. या विषयासंबंधी सोमवारी निवेदन येईल तेव्हा मा.सदस्यांना प्रश्न विचारता येतील.

श्री.अनंत तरे : खालच्या सभागृहात स्थगन प्रस्तावावर निवेदन होणार आहे, ते सभागृह तहकूब झालेले आहे. त्यामुळे तेथे जे निवेदन होणार आहे ते आज येथेही व्हावे.

**सभापती** : आज निवेदन करणे शक्य असेल तर त्यादृष्टीने विचार करावा नाही तर सोमवारी निवेदन करावे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: वैधानिक विकास मडळांना मुदतवाढ देण्यासंबंधी

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. वैधानिक विकास मंडळांची मुदत 30 एप्रिल 2005 रोजी संपत असल्यामुळे त्यांना मुदतवाढ देण्यासंबंधी आपण शासनाला दोन वेळा आदेश दिलेले आहेत. या वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्यासंबंधी खालच्या सभागृहामध्ये आश्वासन दिलेले आहे.

**सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे यासंबंधीचे निवेदन सभागृहामध्ये झालेले आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : अशासकीय विधेयकावर चर्चा करीत असताना माननीय राज्यमंत्र्यांनी अशा प्रकारचे आश्वासन दिलेले होते. हा धोरणात्मक निर्णय आहे. म्हणून कॅबिनेट मंत्र्यांनी याबाबतीत निवेदन करावे.

**सभापती** : वैधानिक विकास मंडळांच्या संदर्भात या सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्र्यांनी लवकरात लवकर निवेदन करावे असे मा.सदस्यांचे म्हणणे आहे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी माझे म्हणणे ऐकून घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे. जेव्हा दोन्ही सभागृहांचे अधिवेशन सुरु असते त्यावेळी कोणत्याही प्रकारचे निवेदन कोणत्याही सभागृहात केले असेल तर ते निवेदन 24 तासाच्या आत दुस-या सभागृहामध्ये करावे अशा प्रकारचे संकेत आहेत. मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी याठिकाणी महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे. सभापती महोदय, आपण विशाल हृदयाचे आहात. उदार अंत:करणाने आपण आम्हाला माफ करावे. वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्यासंबंधीचे निवेदन मा. राज्यमंत्र्यांनी खालच्या सभागृहामध्ये कोणत्याही चर्चेच्या निमित्ताने केले असेल तर तशा प्रकारचे निवेदन या सभागृहामध्ये त्यांनी करायला पाहिजे. या विषयावर एकदा सभागृहामध्ये चर्चा झालेली असून त्यावेळी शासनाने निवेदन करण्यासंबंधीचे आदेश आपण दिलेले आहेत. मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्या प्रमाणे या सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्र्यांनीच निवेदन करावे अशा प्रकारचा आग्रह मी धरणार नाही. राज्यमंत्री देखील ते निवेदन करु शकतात आणि त्यांना देखील तेवढाच अधिकार आहे. माझा मुद्दा एवढाच आहे की, खालच्या सभागृहामध्ये जी माहिती दिलेली आहे ती माहिती या सभागृहालाही देणे शासनाचे कर्तव्य आहे. अद्यापपर्यन्त

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

वैधानिक विकास मंडळांच्या संदर्भात माहिती दिलेली नाही. वर्तमानपत्रातील प्रसिध्दीमुळे ही बाब आम्हाला समजलेली आहे.तेव्हा वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्यासंदर्भातील माहिती या सभागृहामध्ये आजच्या आज द्यावी अशा प्रकारचे निर्देश आपण शासनाला द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे. सभागृहाच्या प्रतिष्ठेकरिता असे निर्देश देणे आवश्यक आहे.

**सभापती** : या संदर्भात सभागृहामध्ये निवेदन झालेले आहे अशी माझी माहिती आहे.

श्री. नितीन गडकरी : या विषयी शासनाने निवेदन केले असेल तर मी माझे शब्द मागे घेतो.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री. मुधकर सरपोतदार यांनी "नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनतेला मतदानासाठी धमकावण्याचे सुरु असलेले प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93चा विषय होऊ शकत नाही. शासनाने निवेदन करावे...

श्री. मधुकर सरपोतदार : हे निवेदन सोमवारी होईल. आजच निवेदन व्हावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : या विषयी आज सभागृह संपेपर्यन्त निवेदन व्हावे. या सभागृहामध्ये मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री हजर आहेत. त्यांनी या विषयाची नोंद घ्यावी आणि मा. मुख्यमंत्री आणि मा. उप मुख्यमंत्री यांना या विषयी कल्पना द्यावी. तसेच त्याठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था चांगल्या पध्दतीने राहील अशी व्यवस्था करावी.

श्री. छगन भुजबळ : होय.

श्री. मधुकर सरपोतदार : धन्यवाद.

**सभापती** : आज नियम 93च्या सूचनेवरील दोन निवेदने प्राप्त झालेली आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, निवेदने या ठिकाणी वितरीत होतात. काल माझी दोन निवेदने आली. माननीय मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित होते. ते बाहेर जाणार म्हणून सांगितले म्हणून त्यावर चर्चा झाली नाही. माझ्या माहिती प्रमाणे ते काल या ठिकाणी उपस्थित होते. निवदने आल्यानंतर चर्चा चर्चा होत नसेल आम्ही सूचना देऊन काही उपयोग नाही. शासनाकडून असे अभिप्रेत होते की, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सर्व निवेदनांचा एकत्रित गठ्ठा सदस्यांना वितरीत करावयाचा. यामध्ये आमची अनेक महत्वाची निवेदने आहेत त्यावर चर्चा झाली पाहिजे....

**सभापती** : सोमवार पासून काळजी घेण्यात येणार आहे...

श्री. जयंत प्र.पाटील : काल एका निवेदनावर आज चर्चा होईल अशा प्रकारचे आपणाकडून निदेश दिले गेलेले आहेत. परंतु ते निवेदन आज दाखविले गेलेले दिसत नाही..

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, जो कार्यक्रम आपण निश्चित करतो तो पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण सर्वच प्रयत्न करीत असतो. शासन सुध्दा त्याप्रमाणे करीत असते. जर मंत्री महोदयांना तात्कालीक अडचण आली तर नकळत आपण एखाद्या निवेदनावरील चर्चा पुढे ढकलतो. सोमवार पासून अशी काळजी घेण्यात येईल की, शेवटच्या दिवशी एकही निवेदन रहाणार नाही अशा प्रकारचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सोमवार ते शुक्रवार पर्यन्त निवेदने केली तर शेवटच्या दिवशी निवेदने येण्याचा प्रश्न उपस्थित होणार नाही.

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दहिवली (ता.मुरबाड,जि.ठाणे) येथील काळू नदीत जिवंत स्फोटकांचा साठा सापडणे.

**मु. शी.** :दहिवली (ता.मुरबाड,जि.ठाणे) येथील काळू नदीत जिवंत स्फोटकांचा साठा सापडणे याबाबत सन्माननीय सदस्य श्रीमती कांता नलावडे,श्री.विनोद तावडे,श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती कांता नलावडे,श्री. विनोद तावडे,श्री.मधुकर चव्हाण यांनी "दहिवली (ता.मुरबाड,जि.ठाणे)येथील काळू नदीत जिवंत स्फोटकांचा साठा सापडणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, निवेदन वाचल्यानंतर शासनाने हे प्रकरण अतिशय लाईटली घेतलेले दिसते. हा अतिशय गंभीर विषय आहे. या नदीमध्ये या ठिकाणी विधानसभेच्या निवडणूकीच्या आधीच्या दिवशी सुध्दा स्फोटकांचा साठा सापडला होता याची शासनाला कल्पना आहे काय ? या ठिकाणी स्फोटकांचा जिवंत साठा सापडलेला आहे परंतु त्याचा कुठेही उल्लेख झालेला दिसत नाही. याबाबतीतील माहिती माननीय मंत्री महोदय सांगू शकतील काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दहिवली, ता. मुरबाड, जि.ठाणे येथील काळू नदीच्या पात्रात मॉटर बॉम्ब,रॉकेट हेड, रॉकेट पार्टस्, रॉकेट पॉईंट, बॉम्ब फ्युज, सिलेंडर्स, रॉकेट पिन, ॲन्टी एरक्राफ्टच्या निकामी पुंगळया, पॅराशूट बॉम्ब इत्यादि स्फोटकजन्य साठा भंगारात सापडलेला आहे. या संपूर्ण स्फोटकात 2423 स्फोटके आढळून आलेली आहेत. 160 स्फोटके अंशत: जिवंत असल्याचे पुणे स्फोटक पथक, खडकी, पुणे यांच्याकडून तपासणी करण्यात आलेली आहे. तसेच ती स्फोटके धोकादायक नाहीत असा अभिप्राय त्यांनी दिलेला आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 13:25

( **सभापतीस्थानी मा. उपसभापती** )

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, 18 तारखेपासून जर तपासणी करण्यात येत होती तर 4 एप्रिलला पुन्हा भंगार कसे आले ? भारत सरकारने 18.10.04 च्या परिपत्रकानुसार परदेशातून भारतात आयात करण्यात येणा-या भंगार सामानाची 100 टक्के तपासणी करण्याचे आदेश काढले आहेत. 4.4.05 रोजी अशा प्रकारची स्फोटक ांचे भंगार मिळाले. हा शासनाचा गलथानपणा नाही काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 12.10.04 रोजी स्फोटके मिळाली. त्यावेळी नदीला भरपूर पाणी होते. त्यानंतर पाणी ओसरल्यावर स्फोटके मिळाली.

डॉ. अशोक मोडक :सभापती महोदय, भारताच्या किना-यापासून काळू नदीपर्यंत भंगार सामान का आले ? युध्दात वापरले जाणारे सामान भंगार म्हणून काही कंपन्या आणतात त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही ? भारत सरकारची 100 टक्के तपासणी मोहीम असताना भंगार कसे येते ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय , 12.10.04 रोजी स्फोटके सापडली. ऑक्टोबर महिन्यात नदीला भरपूर पाणी होते. पाणी कमी झाल्यानंतर काही वस्तू असल्यास कळवावे असे सरपंचांना सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे पोलीस स्टेशनला सरपंचांनी येऊन सांगितले.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, काळू नदीच्या पात्रात ही स्फोटके सापडली हा अत्यंत गंभीर प्रकार आहे आणि शासनाने याची कोणत्याही प्रकारचे गंभीरतेने दखल घेतली नाही. स्फोटके आढळून आल्यावर ती कोठून आली आणि कोणी आणली याची शासनाने चौकशी केली आहे काय ? तपासणी चौक्या असतात तेथील कर्मचारी काय करतात ? तपासणीमध्ये आढळून आलेल्या वस्तूंच्या संदर्भात त्या कोठून आल्या आणि कोणी आणल्या याची शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, स्फोटके कुठून आणि कोणी आणली याची तपासणी चालूच आहे. पोलीस तपास चालू आहे. अगोदर 12.10.04 रोजी स्फोटके सापडली आणि त्यानंतर नदीच्या पात्रातील पाणी कमी झाल्यावर 4.4.05 रोजी स्फोटके सापडली.

----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**.:बुलढाणा जिल्हयातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत

**मु.शी**.: बुलढाणा जिल्हयातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत करण्याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता, नितीन गडकरी,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

राणा श्री. जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) :सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता,नितीन गडकरी,वि.प.स. यांनी बुलढाणा जिल्हयातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयामध्ये खरीप हंगामात झालेल्या अत्यल्प पावसामुळे तेथील शेतक-यांचे पीक उध्वस्त झालेले आहे. महाराष्ट्र शासनाने संकटात सापडलेल्या शेतक-यांना मदत करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय मागील वर्षाच्या ऑगस्ट महिन्यात घेतला. 24 ऑगस्ट 2004 रोजी महसूल आणि वन विभागाने निर्णय घेतला की एक हजार रु. प्रती हेक्टर जास्तीत जास्त 2 हेक्टरपर्यंत मदत करण्याचे जाहीर केले. महसूल व वन विभागाने 8 डिसेंबर 2004 रोजी कृषी विभागाला या निर्णयाबद्दल अधिनस्त केले. कृषी खात्याने 23 डिसेंबर 2004 च्या निर्णयानुसार महाराष्ट्रातील 11 लाख 42 हजार 539 शेतक-यांना 83 कोटी रुपयांची मदत जाहीर केली. त्यापैकी बुलढाणा जिल्हयामध्ये 4 कोटी 82 लाख 54 हजा रुपयांची मदत जाहीर केलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

त्यापैकी देऊळगावराजा तालुक्यासाठी 39 लाख 3हजार रुपये,लोणार तालुक्याला 53 लाख 40 हजार रुपये ,नांदुरा तालुक्याला 83 लाख 12 हजार रुपये,खामगाव तालुक्याला 57 लाख 35 हजार रुपये, शेगाव तालुक्याला 1 कोटी 35 लाख रुपये,संग्रामपूर तालुक्याला 94लाख 61 हजार रुपये एवढी मदत देण्यात यावयाची आहे.अशा प्रकारे एवढी मदत देण्याचे तालुकावार जाहीर करण्यात आले होते.परंतु माझी अशी माहिती आहे की, या तालुक्यांना मदतीचे वाटप झालेले नाही.ज्या ठिकाणी मदतीचे वाटप झालेले आहे ते सुध्दा अत्यंत तोडके आहे.लोणार तालुक्याला 53 लाख 40 हजार रुपये मंजूर केलेले असतांना आतपर्यन्त एक लाख 5 हजार 730 रुपये वाटले आहेत.संग्रामपूर तालुक्यात 3 लाख 83 हजार रुपयांचे वाटप केलेले आहे, शेगाव तालुक्यात 5 लाख 1 हजार रुपयांचे वाटप केलेले आहे,.खामगाव तालुक्यात 2 लाख 92 हजार रुपयांचे वाटप केलेले आहे, देऊळगाव राजा तालुक्याला 6 लाख 10 हजार रुपयांचे वाटप केलेले आहे आणि नांदुरा तालुक्याला 1 लाख 39 हजार रुपयांचे वाटप केलेले आहे. 4 कोटी 82 लाख रुपयाची मदत आपण जाहीर केलेली आहे व त्यापैकी फक्त काही लाख रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहेत. हे पैसे बॅन्कांकडे वळते करण्यात आलेले आहेत.परंतु बॅन्केचे अधिकारी या शेतक-यांना असे सांगतात की,जोपर्यन्त तुम्ही बॅन्केत खाते उघडणार नाही तोपर्यन्त तुम्हाला पैसे मिळणार नाहीत. या शेतक-याला तालुक्याच्या ठिकाणी जाऊन बॅन्केत खाते उघडावयाचे असेल तर त्याला 100 रुपये भाडयाला लागतात.बॅन्केत खाते उघडण्यासाठी 500 रुपये लागतात आणि त्या

शेतक-याला 400 रुपयांचा चेक मिळतो आणि त्याला 600 रुपये खर्च करावे लागतात म्हणजे या मध्ये त्याचे 200 रुपयांचे नुकसान होत असाते. या बाबतीत मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की,शासनाने मदत जाहीर केलेली आहे व पैसे बॅन्केकडे वळते केलेले आहेत तेव्हा शेतक-यानी बॅन्केत खाते न उधडता त्याच्या गावात जाऊन त्याला या चेकचे वाटप करण्यात येणार आहे काय ? आणि 4 कोटी 82 लाख रुपयांचे वाटप किती दिवसात करण्यात येणार आहे?

श्री.राणा जगजितसिंह पाटील :4 कोटी 82 लाख रुपयापैकी साधारणपणे 91 लाख रुपये सहा तारखेपर्यन्त वाटण्यात आलेले आहेत.या संबंधी जो शासन निर्णय आहे तो मी आपल्याला वाचून दाखवतो. त्यात असे म्हटलेले आहे की,ज्या शेतक-यांची बॅन्केत खाती नसतील अशा

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील...

शेतक-यांना त्यांच्या पर्यायानुसार  द्यावयाची रोख स्वरुपातील मदत सहकारी बॅन्केमार्फत बेअरर धनादेशाव्दारे देण्यात यावी मात्र बेअरर धनादेश देतांना तालुका स्तरावरील वरिष्ठ अधिकारी , प्रतिष्ठीत लोकांच्या समक्ष सदर बेअरर धनादेश देण्यात यावेत ." त्याचप्रमाणे उरलेली जी रक्कम आहे ती येत्या महिना अखेरपर्यन्त बेअरर धनादेशाव्दारे देण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, एका गंभीर प्रश्नाकडे मी माननीय मंत्रिमहोदयांचे लक्षवेधू इच्छितो. निवेदनात असे म्हटलेले आहे की, 11 लाख 42 हजार 549 आपदग्रस्त शेतक-यांना मदत देण्यासाठी 83. 82 कोटी एवढा निधी महसूल व वन विभागाने दिनांक 8 डिसेंबर 2004 च्या निर्णयान्वये कृषि विभागाच्या अधिनस्त सुपूर्द केला होता. कृषि विभागाच्या दिनांक 23 डिसेंबर 2004 च्या शासन निर्णयानुसार आपदग्रस्त अल्प व अत्यल्प भूधारक 11 लाख 42 हजार 549 शेतक-यांना 83.82 कोटी रकमेचे वाटप करण्यासाठी आयुक्त (कृषि) यांना वितरित करुन वाटप करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.डिसेंबर महिन्यात हे आदेश  देण्यात आलेले असून आता एप्रिल महिना सुरु आहे.अडचणीत सापडलेल्या शेतक-यांना मदत करण्यासाठी सरकारने हा निधी उपलब्ध करुन दिला आहे. परंतु अजूनही त्याचे वाटप झालेले नाही. मागच्या वर्षीच्या खरीप हंगामात कमी पावसामुळे या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे परंतु अजूनही त्यांना मदत मिळाली नाही. म्हणजे एखादी व्यक्ती मृत झाल्या नंतर तिला दवाखान्यात नेण्यातला हा प्रकार आहे किंवा आग विझल्यानंतर फायर ब्रिगेडला बोलाविण्यातला हा प्रकार आहे. शेतक-यांना मदतीचे वाटप करण्यामध्ये विलंब झाला आहे हे यावरुन दिसत आहे. मला असे विचारावयाचे आहे की, 11 लाख 42 हजार 549 शेतक-यांना 83.82 कोटी रुपयांची मदत किती दिवसात देण्यात येणार आहे? आणि या मदतीच्या  वाटपात जो विलंब झालेला आहे त्याबाबतीत चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राण जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, ही जी रक्कम आहे ती फेब्रुवारीमध्ये बँकेकडे जमा करण्यात आलेली होती. 8 डिसेंबरला महसूल विभागाकडून कृषी विभ्ंागाकडे पैसे आलेले होते. ..

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, मी माननीय राज्यमंत्री महोदयांना उत्तर देण्यास मदत होईल म्हणून सांगू इच्छितो की, 24 ऑगस्टला याबाबत शासनाने निर्णय घेतला. 8 डिसेंबरला आपल्या कृषी विभागाला 83.82 कोटी रुपये मिळाले आणि हा शेतकरी एवढ्या मोठ्या संकटात असतानाही आजच्या तारखेपर्यंत या पूर्ण पैशाचे वाटप आपण, आपले अधिकारी करीत नाही हे योग्य प्रशासन आहे काय ? याला जबाबदार कोण आहेत ? पैसे जवळ असूनही ते 4-4 महिने वाटले का जात नाहीत ? त्यामध्ये कोण झारीतील शुक्राचार्य आहेत ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, 8 डिसेंबरला हे पैसे महसूल विभागाकडून कृषी विभागाला मिळाले आहेत ही गोष्ट खरी आहे. तेथून ते कलेक्टरेटकडे पाठविण्यात आले. आता इतके दिवस होऊनही ती संपूर्ण रक्कम वितरित का होऊ शकली नाही याबद्दल चौकशी करण्यात येईल आणि यामध्ये जे कोणी जबाबदार आढळतील त्यांचेवर त्याबद्दल कारवाई करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, या सरकारकडे पैशाची अडचण आहे. पण तरीही आपण निर्णय ऑगस्टमध्ये जाहीर केला आणि त्यानंतर 5 महिन्यांनी हा निधी आयुक्तालयाकडे दिलेला आहे. म्हणजे पैसे बँकेमध्ये तयार आहेत पण शेतकऱ्यांना दिले जात नाहीत म्हणजे आपण त्यावरील व्याज खाता काय ? गरीब शेतकऱ्यांच्या पैशावरील व्याज आपण घेता आहात का ? या पैशाचे वाटप ताबडतोबीने आपले प्रशासन का करीत नाही ? योग्य वेळी मदत दिली गेली तरच तिचा फायदा होत असतो हे आपणास माहीत नाही का ? योग्य वेळी हे पैसे शेतकऱ्याला मिळाले असते तर त्यातून तो बियाणे, खते घेण्यासाठी खर्च करू शकला असता, त्या पैशाचा त्याला उपयोग झाला असता. आता उन्हाळ्यामध्ये पैसे देऊन काय उपयोग आहे ? आग लागल्यावर ताबडतोब ती विझविण्यामध्ये अर्थ आहे, आग विझल्यानंतर ती विझविण्यासाठी धावण्यात काय मतलब आहे ? तेव्हा हे पैसे वाटण्यामध्ये जो डिले झालेला आहे त्याबाबत आपण चौकशी करावी आणि येत्या 15 दिवसात या सगळ्या पैशाचे वाटप आपण करणार का ?

..... टी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, या महिना अखेर पर्यंत हे पैसे सगळे वाटण्यात येतील. दुसरी गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांना हे पैसे रोख स्वरूपात पाहिजे की, बी-बियाणे व खते या स्वरूपात पाहिजे असा पर्याय आपण दिला होता. ते कळविण्यात हा डिले झाला असावा. पण तरीही याबाबत चौकशी केली जाईल आणि जे कोणी दोषी आढळेल त्याचेवर कारवाई करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, या एक महिन्याच्या आत हे पैसे वाटून त्याचा हिशोब पूर्ण केला जाईल काय ? आम्ही तसे गृहीत धरायचे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, आता जी रक्कम वितरित करावयाची राहिली आहे ती 61 कोटी 48 लाख इतकी आहे ...

श्री. नितीन गडकरी : हा महिना संपण्यापूर्वी ही सगळी रक्कम वाटप करण्यात येईल असे आपण म्हटले होते म्हणून मी पुन्हा स्पेसिफिकली विचारले की, हे खरे आहे का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : होय, या महिन्यामध्ये ही सगळी रक्कम वाटण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मग त्याबाबतचा अहवाल पुढील अधिवेशनात पटलावर ठेवाल का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : होय.

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, हे जे वाटप करण्यात येत आहे., ज्या पध्दतीने करण्यात येत आहे त्याबद्दल मी विचारले आहे की, त्यासाठी शेतकऱ्याला आधी बँकेमध्ये खाते उघडून त्याचे पासबुक दाखवावे लागते आणि ते पाहिल्याशिवाय त्याला चेक दिला जात नाही. पण तो चेक असतो 3-400 रुपयांचा आणि त्यासाठी त्याला बँकेमध्ये खाते उघडण्याकरिता 500 रुपये आणि गावावरून येण्या-जाण्यासाठी 100 रुपये खर्च करावे लागतात असे मिळून जवळपास 600-700 रुपये त्याचे खर्च होतात आणि त्यातून मिळणारी रक्कम ही केवळ 300-400 रुपये असते. म्हणजे त्याला त्या सर्वातून 200-300 रुपयांचा तोटाच होत असतो. तर एवढा तोटा घेऊन तो आपले हे उपकार कशासाठी घेणार ? म्हणून त्याला त्या रकमेचा बेअरर चेक आपण देणार का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, यासाठी किमान रक्कम निश्चित करून मग त्यावरील रक्कम निश्चितपणे बेअरर चेकच्या स्वरूपात देण्यात येईल.

**उपसभापती** : या निवेदनावरील चर्चा आता संपली आहे. यानंतर पुढील विषय घेण्यात येईल.

*****

.... टी 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत** .....

श्री. अनंत तरे : अध्यक्ष महाराज, मला येथे एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. काल या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 'महानंद डेअरीचे सर्वेसर्वा श्री.तळेकर यांना मिळालेल्या जामिनासंबंधात' मुद्दा उपस्थित केला असता त्यावर आज संध्याकाळ पर्यंत निवेदन करण्यास शासनाला निदेश दिलेले होते. तर ते निवेदन किती वाजता होणार आहे हे आम्हाला समजू शकेल काय ? ....

( यानंतर श्री. जागडे ....यू 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ KGS/ MAP/ 13:40

श्री. अनंत तरे...

त्या ठिकाणी श्री. राजीव नावांचे अधिकारी आहेत. त्यांना आता धमकीचे फोन येत आहेत. तसेच त्यांना मारण्यासाठी गुंड पाठविले जात आहेत. हा अतिशय गंभीर प्रकार आहे. म्हणून या बाबत शासनाने निवेदन आजच केले पाहिजे. तसेच श्री. राजीव यांना पोलीस संरक्षण दिले पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. परवा वर्तमानपत्रात मला गंभीर गोष्ट वाचावयाला मिळाली आहे. या राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांनी लेडीज बार बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय अतिशय चांगला आहे. मी त्याचे स्वागत करतो. एका व्यक्तीने असा आरोप करण्यात आला आहे की आमच्याकडे 12 कोटी मागण्यात आले आहेत. मला या बाबत काही लोक भेटले होते. त्यांच्याकडून मला अशी माहिती मिळाली आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसचे या ठिकाणी ऑफीस आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. विलास साटम आहेत. विलास साटम यांचे ऑफीस कंत्राटदार श्री. परेश मेहता यांनी बांधले आहे. या दोघानी अमरजितसिंग बरोबर चर्चा केली आहे. या बाबतचे सर्व पुरावे अमरजितसिंग यांच्याजवळ आहेत. या दोघांनी प्रथम साडेतीन कोटी रुपये त्यांच्याकडे मागितले. नंतर पाच कोटीचा सौदा ठरला. श्री.अमरजिसिंग हे श्री. आर. आर. पाटील यांच्या ऑफिसमध्ये आले. तेथे चहा पिऊन अमरजितसिंगना हे लोक घेऊन गेले. त्याप्रमाणे 12 कोटी रुपये द्याल तर आम्ही हे काम करु. त्यानंतर श्री.साटम यांनी एक कोटी रुपये त्यांच्याकडे वेगळे मागितले. अर्थात श्री. आर. आर. पाटील यांच्याविरुध्द मी कोणत्याही प्रकारचे आरोप करीत नाही. परंतु ही जी घटना घडली आहे, या बाबत जी चर्चा आहे, या बाबत वर्तमानपत्रात जी बातमी आली आहे, ती लक्षात घेता हे विलास साटम कोण आहेत ? मला आता कळले आहे की, त्यांना दोनच दिवसापूर्वी उपाध्यक्ष पदावरुन काढून टाकण्यात आले आहे. श्री. परेश मेहता यांनी अमरजिसिंग यांच्याबरोबर चर्चा केली आहे, आता हे चर्चा करणारे कोण ? ....

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यानी या बाबत रितसर नोटीस द्यावी. नोटीस दिल्यानंतर मी त्यांना बोलण्यास परवानगी देईन.

श्री. नितीन गडकरी : आर. आर. पाटील यांनी खुलासा केला तर बरे होईल.

( गोंधळ )

श्री. नितीन गडकरी : मी श्री. आर. आर. पाटील यांच्यावर आरोप केलेले नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

श्री. जितेंद्र आव्हाड : पेट्रोलपंपाच्या भानगडीत म.मा. वैद्य यांची सून सापडली होती.

( गोंधळ )

श्री. नितीन गडकरी : माननीय सदस्यांनी कोणाचेही नाव घेऊ नये. कोणाचीही सून कोठेही सापडली नाही. माननीय सदस्य श्री. आव्हाड जर असे म्हणत असतील तर मी संपूर्ण कॅसेट या ठिकाणी वाजवून दाखवितो. श्री. आव्हाड यांनी माझ्या नादी लागू नये. मी असे म्हटले आहे की, मला या बाबतीत कोणावरही आरोप करावयाचे नाहीत. सन्माननीय गृहमंत्र्यांच्या बाबत मला कोणत्याही प्रकारचा संशय नाही. परंतु या बाबत वर्तमानपत्रातून छापून आले आहे. बाहेर चर्चा चालू आहे. राष्ट्रवादीच्या उपाध्यक्षांना काढून टाकण्यात आले आहे. म्हणून या बाबत काय सत्य आहे, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांचा हा प्रश्न आहे. खालच्या सदनात त्यांच्याविरुध्द हक्कभंग आणला आहे. ते आमच्या सभागृहाचे नेते आहेत. म्हणून या बाबत जे काही सत्य आहे, त्याचा खुलासा झाला पाहिजे. मी त्यांच्याविरुध्द कोणतेही आरोप करीत नाही.

( गोंधळ )

**उपसभापती** : मी याबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांना नोटीस देण्यास सांगितली आहे. त्यांनी ते मान्य केले आहे. त्यामुळे आता कोणतीही टिपणी करणे योग्य नाही. मा. विरोधी पक्षनेत्यांनी हेही सांगितले आहे की, मी मा. उपमुख्यमंत्र्यांवर कोणत्याही प्रकारचे आरोप करीत नाही. मी त्यांना सांगितले आहे की, या बाबत तशा प्रकारचे पत्र द्या. नंतर मी परवानगी देईन. त्यामुळे हा जो भाग आहे तो रेकॉर्डवर येणार नाही. त्यामुळे या बाबत कोणतीही टिपणी करणे योग्य नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहात एखादा विषय मांडण्याचा माझा अधिकार आहे. मी या विषयाच्या माध्यमातून श्री. आर. आर. पाटील यांच्यावर कोणत्याही प्रकारचा हेत्वारोप केलेला नाही. मला त्यांच्याबद्दल काही म्हणावयाचे नाही. या बाबत वर्तमानपत्रातून बातमी छापून आली आहे. खालच्या सभागृहात त्यांच्याविरुध्द हक्कभंग प्रस्ताव दिला आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री या सभागृहाचे नेते आहेत. म्हणून त्यांच्या बाबतीत कोणतीही बदनामी होऊ नये. या

..3..





श्री. नितीन गडकरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबतचा योग्य तो खुलासा व्हावा. हे मांडीत असताना मी आर.आर.पाटील यांच्यावर कोणत्याही प्रकारचा हेत्वारोप केलेला नाही. माननीय सभापतींनी सांगितल्याप्रमाणे हा विषय मी दुस-या मार्गाने सभागृहात उपस्थित करेन.

( यानंतर श्री. सरफरे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेसंबंधी.</u>**

**उपसभापती** : सभागृहाच्या कामकाज पत्रिकेमधील क्रमांक 1 व 2 वरील दोन्ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पहिल्या लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती सदस्यांच्या पिजन होलमध्ये टाकण्यात आल्या होत्या त्या नंतर बाहेर काढून नेण्यात आल्या, हे काय चालले आहे?

श्री. जितेंद्र आव्हाड (बसून बोलतात) : मला निवेदन मिळाले आहे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला निवेदन मिळाले नाही तर माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना निवेदन कसे मिळाले? ही बाब आक्षेपार्ह आहे. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना निवेदनाची प्रत मिळते तर आम्हाला कां मिळत नाही?

**उपसभापती** : माननीय सदस्यांना मला एकच विनंती करावयाची आहे की, मंत्रिमहोदयांनी माननीय सभापतींना दिलेले व माननीय सभापतींनी मान्य केलेले पत्र आपणास वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "जलसंधारण विभागाचा तारांकित प्रश्न खालच्या सभागृहामध्ये असल्यामुळे लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी". त्याप्रमाणे माननीय सभापतींनी त्यांची विनंती मान्य केली आहे. सदर लक्षवेधी सूचना पुढील आठवडयात सोमवारी किंवा मंगळवारी घेण्यात येतील.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी पत्रान्वये दिलेले कारण दुसऱ्या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत असावे असे मला वाटते. सदरहू लक्षवेधी सूचना सोमवार ऐवजी मंगळवारी घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे, मंगळवारी ठेवण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना निवेदन मिळाले परंतु आम्हाला मिळाले नाही हा भेदभाव कां? हे बरोबर आहे कां? मा. सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड हे मा. सभापतींचे लाडके आहेत कां?

श्री. जितेद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण सभागृहामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड....

निर्णय देतांना शासनाकडून निवेदन आले नाही म्हणून लक्षवेधी सूचना पुढे ढकलली असे कुठेही म्हटलेले नाही. विभागाचे कर्मचारी पिजन होलमध्ये निवेदने व्यवस्थित टाकीत असतात, परंतु माननीय विरोधी पक्षनेत्यांचे पी.ए. ती निवेदने घेण्यासाठी वेळेवर जात नाहीत...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या समोर विधानमंडळाच्या कर्मचाऱ्यांनी पिजन होलमध्ये टाकलेली निवेदने परत काढून नेली हे मी स्वत: पाहिले आहे. आमच्याकडे एक म्हण आहे ती मी सभागृहामध्ये सांगत नाही...

**उपसभापती** : आपण मला ती खाजगीत सांगा...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण उदार अंत:करणाचे आहात. आपण सांगितल्यानंतर आम्ही ऐकतो. सभागृहातील कुणाही मा. सदस्यांकडे निवेदनाची प्रत नसतांना मा.सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्याकडे ही प्रत कशी आली? याचा खुलासा झाला पाहिजे. त्यांनी संबंधित विभागाच्या कार्यालयामध्ये जाऊन ती प्रत आणली आहे. हे सभागृह सार्वभौम आहे, सर्वांना समान अधिकार आहेत. आपण याबाबत मा.सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना ताकीद दिली पाहिजे. त्यांचे अशाप्रकारचे वागणे बरोबर नाही...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मा. विरोधी पक्षनेत्यांनी आता सांगितले की, लक्षवेधी सूचनेचे निवेदन पिजन होलमध्ये टाकल्यानंतर ते पुन्हा काढून घेण्यात आले. मा. सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या बाबतीत सांगतो की, त्यांचे स्वीय सहाय्यक दर दिवशी पिजन होलमध्ये टाकण्यात आलेले सर्व पेपर फाईलमध्ये टाकून त्यांना आणून देतात. त्यामुळे त्यांच्या बाबतीत लक्षवेधी सूचनेचे निवेदन किंवा पेपर उशिरा मिळणे हा प्रकार होत नाही.

**उपसभापती** ठीक आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बीड जिल्हयातील मौजे पालवण येथील रोजगार हमी योजनेच्या कामावर लाखो रुपयांचा झालेला भ्रष्टाचार.

**मु.शी.**: बीड जिल्हयातील मौजे पालवण येथील रोजगार हमी योजनेच्या कामावर लाखो रुपयांच्या झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी श्री.विनायकराव मेटे, श्रीमती मंदा म्हात्रे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनायकराव मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. व याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"बीड जिल्ह्यातील व-ा जात्यांतर्जत रोजजार हमी योज-ोतू-ा मौजे पालवज ता.जि.बीड येथे स-ा 2004 मध्ये ज्रोडो रुपयांची शेततळे, माती-ााला बंडींज,दज्डी -ााला बंडींज व सी.सी.टी.ची घेज्यात आलेली ज्ामे, सदरील ज्ामे प्रत्यज्ञात -ा ज्रता, ज्ाही जु-ीच ज्ामे जे्ल्याचे -ाव्या-ो दाजविजे, मजूर ज्ामावर -ासता-ाा ते असल्याचे दाजविजे, मजूरां-ाा देज्यात येजारे धा-य -ा देजे, यामध्ये श्री. जज्झाप (जिल्हा व-ा परिजेत्र अधिज्ारी) व श्री. मिसाळ (व-ा परिजेत्र अधिज्ारी) यां-ाी पालवज येथील ज्ामामध्ये लाजो रुपयांचा जे्लेला भ्रष्टाचार -ाुज्ताच उघडज्ीस येजे, तसेच संपूर्ज जिल्ह्यात व-ा जात्यामधू-ा रोजजार हमी योज-ोतील ज्ामामध्ये ज्रोडो रुपयांचा होत असलेला भ्रष्टाचार, याबाबत शास-ाा-ो तातडी-ो ज्रावयाची ज्ारवाई व शास-ााची प्रतिज्रि्या."

श्री. राणा जगजितसिंह पाटील (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात दिलेले उत्तर हे सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये विचारण्यात आलेल्या मुद्दयांपैकी अर्धे उत्तर देण्यात आले आहे. उत्तरामध्ये पालवण गावामध्ये सुरु असलेल्या रोजगार हमी योजनेवरील माती नालाबांधाच्या कामासंबंधीची माहिती देण्यात आली आहे. सूचनेमध्ये संपूर्ण जिल्हयाची माहिती विचारली होती. परंतु संपूर्ण जिल्हयाचे उत्तर अजिबात आले नाही. रोजगार हमी योजनेच्या कामावर झालेला भ्रष्टाचार याबाबत माहिती विचारली होती. परंतु निवेदनामध्ये कामे झाली आहेत, त्या कामावर पैसे खर्च झाले आहेत हे मान्य केले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . . .

सभापती महोदय, माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत, एवढेच नाहीतर सर्व कागदपत्रांचा गठ्ठा आहे आणि त्यामध्ये प्रत्येक गोष्टींचे पुरावे आहेत, कामाची ऑर्डर वगैरे सर्व बाबी आहेत. बीड जिल्हयातील पालवण तालुक्यात मी स्वत: जाऊन भेट दिली आहे आणि तेथे प्रत्यक्षात पाहणी केली आहे. तेथे जवळपास 18 कामे आहेत. त्यातील फक्त काही कामे झालेली आहे, बाकीची अर्धी कामे अजिबात झालेली नाहीत. जी कामे झालेली आहेत असे दाखविलेले आहे, ती जुनी कामे आहेत आणि तीच कामे झालेली आहेत असे दाखविण्यात आले आहे. काही कामे तर हरवलेली आहेत, कारण ती कामे कुठेच दिसत नाहीत. ही सर्व मिळून 40 लाखाची कामे एका वर्षातील, एका गावातील आहेत. त्या कामावर असलेल्या मजूरांच्या बाबतीत जी स्थिती आहे, ती ऐकल्यावर आपल्याला आश्चर्य वाटेल. ई.जी.एस.चे धोरण आहे की, त्या गावातील मजूरांना काम द्यावे. पण प्रत्यक्षात तेथील कामावर त्या गावातील मजूर नाहीत, त्या तालुक्यातील नाहीत, जिल्हयातील नाहीत. तर नगर जिल्हयातील मजूरांचा हजेरीपट आहे. काही मजूरांची यादी लातूर जिल्हयातील आहे. तेव्हा हे सर्व रेकॉर्ड बोगस आहे, अंगठे बोगस आहेत. त्या रेकॉर्डवर अधिका-यांच्या सहया नाहीत. पंचांच्या सहया नाहीत, सरपंचांच्या सहया नाहीत. माझ्याकडे दुसरी यादी आहे . . . .

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, एका वर्षामध्ये 40 लाख रुपयांचा भ्रष्टाचार झ ालेला आहे. अशा तीन-चार वर्षाच्या संबंधातील माहिती देण्यास सांगितले होते, पण त्याची माहिती दिलेली नाही. यामध्ये जिल्हा वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.जगझाप, वन परिक्षेत्र अधिकारी श्री.मिसाळ आणि श्री.सावंत यांनी प्रचंड प्रमाणात या एका गावामध्ये भ्रष्टाचार केला आहे आणि माझ्याकडे याबाबतीत अजूबाजूच्या गावाच्या संदर्भातील देखील माहिती आहे. यामध्ये लाखो रुपयांचा नाही तर करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. माझ्याकडे पुरावे आहेत. मी तेथे जाऊन पाहणी केलेली आहे. तेव्हा संबंधित अधिका-यांना निलंबित करुन, याची सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन पोलीस केस दाखल करणार आहात का ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेबांनी आता जी माहिती दिली आहे, जे आरोप केले आहेत ते अतिशय गंभीर स्वरुपाचे आहेत. येत्या आठवडयाभरामध्ये डेप्युटी कमिशनर यांचे जे दक्षता पथक आहे, त्यांच्यामार्फत चौकशी केली

. . . .डब्ल्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील . . . .

जाईल आणि पुढच्या आठवडयामध्ये सदनात अहवाल ठेवण्यात येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारलेला आहे. आपल्या विभागामध्ये जवळजवळ 40 लाख रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे आणि त्यासंबंधीची कागदपत्रे सन्माननीय सदस्यांकडे आहेत. यासंदर्भात त्यांनी असा प्रश्न विचारलेला आहे की, या भ्रष्टाचाराशी संबंधित असलेल्यांना सस्पेंड करणार आहात का ? तसेच त्यांनी जे आरोप केलेले आहेत, त्याबाबतीत सी.आय.डी.चौकशी करुन, त्यांच्यामार्फत या संपूर्ण भ्रष्टाचाराचा तपास करणार आहात का ? याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, याची प्राथमिक चौकशी करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, कसली प्राथमिक चोकशी करता ? श्री.जगझाप, श्री.मिसाळ, श्री.सावंत यांच्या संदर्भात त्या कार्यालयाच्या कर्मचा-यांनी वरिष्ठ अधिका-यांकडे चौकशीची मागणी केलेली आहे आणि त्याचे प्रुफ माझ्याकडे आहे. मी स्वत: तेथे जाऊन पाहणी केली आहे. असे असताना अजून कसली चौकशी करणार आहात ? आतापर्यंत अनेक वेळा चौकशी करण्याचे मान्य केले आहे. पण अजून काहीही झालेले नाही. त्यांना संरक्षण का देत आहात ? कशासाठी देत आहात ? तर संबंधितांना निलंबित करुन त्याबाबतीत सी.आय.डी.चौकशी करणार आहात का ?

(उत्तर नाही)

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मेटे यांनी जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे, त्यामध्ये 11 माती नालाबंडींगच्या कामांचे 21 लाख व 6 दगडी नालाबंडीगच्या कामाचे 13.26 लाख रुपयांची अंदाजपत्रके आहेत, या अंदाजपत्रकास तांत्रिक आणि प्रशासकीय मंजूरी दिली नाही हे खरे आहे का ? तसे असेल तर त्यावर कोणत्या वन अधिका-यांच्या सहया आहेत ? याची आपण चौकशी करणार का ? यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे...

आपण त्या अधिकाऱ्यांना ताबडतोब निलंबित करून त्यांची चोकशी करणार आहात काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : या कामाला तांत्रिक मंजुरी 3 मार्च 2004 रोजी देण्यात आली आहे. प्रशासकीय मंजुरी 31-03-2004 ला देण्यात आली. निलबित करण्याच्याबाबतीत प्राथमिक चौकशी करुन दोन-तीन दिवसामध्ये निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : आपण त्यांना कशासाठी संरक्षण देता. मी त्या ठिकाणी स्वत: जाऊन आलेलो आहे. आवश्यक ते सगळे पुरावे मी दिलेले आहेत. अधिकाऱ्यांच्या सह्या नाहीत, सरपंचांच्याही सह्या नाहीत. हे सगळे समोर असताना पुन्हा कशाला चौकशी करता.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, स्वत: सन्माननीय सदस्य सांगत आहेत, ते ग्राह्या धरले पाहिजे.

**उपसभापती** : कृपया मंत्री महोदयांवर दबाव आणू नये.

डॉ.दीपक सावंत : मंत्री महोदय जिनियस आहेत.

श्री.दिवाकर रावते : त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रश्न नाही. मंत्री महोदयांचा अनुभव लक्षात घेता, त्या अधिकाऱ्यांना सूट मिळता कामा नये. सभागृहाची प्रथा, परंपरा निश्चित आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांच्याकडे सगळी कागदपत्रे आहेत. मंत्री महोदयांनी उत्तर देताना प्रशासकीय मंजुरी केव्हा दिली, त्याची तारीख सांगितली. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मजुरांचे बोगस अंगठे घेतलेले आहेत. माझी विनंती आहे की, दोन-तीन दिवसात याबाबतची चौकशी करावी आणि निर्णय घ्यावा, तोपर्यन्त ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. मंगळवारी ही लक्षवेधी सूचना चर्चेला घ्यावी. मी मंत्री महोदयांना सुचवू इच्छितो की, त्यांनी आपल्या दालनामध्ये संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना बोलवावे, सन्माननीय सदस्यांनाही बोलवावे, अधिकाऱ्यांना बोलवावे आणि बैठक घेऊन सगळी कागदपत्रे पहावीत. त्यानंतर त्यासंबंधातील निर्णय घेऊन सभागृहामध्ये यावे. माझी अशाचप्रकारची लक्षवेधी सूचना मंजूर झालेली आहे. गावामध्ये लोकच अस्तित्वात नसतांना त्या लोकांची नावे लावून कामे मंजूर केलेली आहेत. अशा घटना वारंवार घडणाऱ्या असतील तर त्यावर कोठेतरी निर्बंध आला पाहिजे. सदनात चर्चा आल्यानंतर त्यासंबंधात कारवाई होते, हा संदेश बाहेर गेला पाहिजे. तेव्हा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी, अशी विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ SBT/ KGS/

प्रा.जोगेंद्र कवाड : रोजगार हमी योजना संशयाच्या भोवऱ्यात सापडलेले आहे. वारंवार भ्रष्टाचाराचे आरोप केले जातात, या पालवण सारख्या लहान गाव आहे, त्या ठिकाणच्या रोजगार हमी योजनेच्या कामावर 150 ते 400 लोक मजुरीसाठी जातात त्यांना योग्य प्रकारची मजुरी दिली जात नाही, काम दिले जात नाही, हे खरे आहे काय ? पालवणसारख्या छोटया गावामध्ये वर्षामध्ये 40 लाख रुपयाची बोगस कामे केली जातात. बीड तालुक्यामध्ये आणि जिल्हयामध्ये अशाप्रकारच्या बोगस भ्रष्टाचाराची किती प्रकरणे आहेत, याची माहिती देऊ शकाल काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : तशाप्रकारची तक्रार आली तर माहिती घेता येईल आणि ती पटलावर ठेवता येईल.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात )

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय,श्री. मिसाळ बीडमध्ये राहायला आल्यानंतर त्यांची प्रॉपर्टी किती झाली आहे ते बघावे. पाडली तालुका शिरुर येथे 150 एकर जमीन त्यांनी विकत घेतली आहे.त्याच्यामध्ये बागायती केलेली आहे. ठिबक सिंचन, फलोद्यान केलेले आहे. नामलगाव म्हणजे बीडच्या शहराला लागून असलेले गाव. येथे 13 एकर जमीन 50 लाख रुपयाची घेतलेली आहे. बीड मध्ये अंजली नावाचे हॉटेल काढले आहे. ते हॉटेल त्यांनी 40 लाख रुपयाला विकत घेतलेले आहे. आज त्यांच्याकडे चार गाडया आहेत. त्यांच्या नावावर दोन रिव्हॉल्व्हर घेतलेले आहेत. त्यांचे स्वत:चे आठ मोबाईल आहेत. एवढी प्रॉपर्टी एका अधिका-याकडे असणे आणि त्याच्यावर येथील सदस्यांनी गंभीर आरोप केलेले असतांना त्याला ताबडतोब सस्पेंड करुन मागाहून त्याची सी.आय.डी.मार्फत इन्क्वायरी करावी अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लिलावती रुग्णालयाने, भूखंड देतांना घातलेल्या अटी व शर्ती न पाळणे.

**मु. शी** : लिलावती रुग्णालयाने, भूखंड देतांना घातलेल्या अटी व शर्ती न पाळणे यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,श्रीमती कांता नलावडे वि.प.स. यां-ी दिलेली लजवेधी सूच-ाा.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-ो -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वज-िज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

"मुंबई वांद्रे (पश्चिम) येथील म्हाडाने दिलेल्या भूखंडावर बांधलेल्या लिलावती रुग्णालयाने भूखंड देताना घातलेल्या अटी व शर्ती न पाळणे, सर्व सामान्य नागरिकांकरिता बाहय रुग्ण विभाग (ओ.पी.डी.)औषधांसाठी उपलब्ध करुन न देणे, यामुळे नागरिकांमध्ये विशेषत: बाहय रुग्ण विभागात येणा-या रुग्णांमध्ये निर्माण होणारा असंतोष, यासंबंधी शासनाने कोणतीही कारवाई न करणे, यासंबंधी जनमानसात निर्माण झालेला उद्वेग, या प्रकरणाची चौकशी करुन लिलावती रुग्णालयात बाहय रुग्ण विभाग सुरु करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. विमल मुंदडा( सर्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लजवेधी सूच-ोसंबंधीच्या -िवेद-ााच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ाा आधीच वितरीत ज्ेल्या असल्यामुळे मी ते -िवेद-ा आपल्या अ-ुमती-ो सभाजृहाच्या पटलावर ठेवते.

**उपसभापती** : -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

-िवेद-ा

( प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे. )

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ही गंभीर गोष्ट आहे. लिलावती रुग्णालयासंबंधी मी याठिकाणी लक्षवेधी सूचना दिलेली होती. लिलावती रुग्णालयाने सरळसरळ आपल्या सगळया नियमांचा, कायद्यांचा, अटींचा भंग केलेला आहे. कायद्यानुसार गरिबांना मोफत सेवा देणे आवश्यक असतांना ती मोफत सेवा गरिबांना उपलब्ध करुन दिलेली नाही. या लक्षवेधीच्या उत्तराबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो की, कुठल्याही प्रकारे त्यांना वाचविण्याचा प्रयत्न न करता जी वस्तुस्थिती आहे ती शासनाने निदर्शनास आणलेली आहे. पण पुढे आपण इतके मुळमुळीत उत्तर दिलेले आहे की, शासनाच्या हेतु बद्दल शंका येते. निवेदनात असे म्हटले आहे की, " लिलावती रुग्णालयाची तपासणी धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाकडून दि.13.7.2004 व दि.14.7.2004 रोजी करण्यात आली असता असे आढळून आलेले आहे की, सदर रुग्णालयाने मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम,1950 च्या कलम 41 अअ खाली अत्यंत गरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना मोफत किंवा सवलतीमध्ये औषधोपचार देण्याची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. लिलावती रुग्णालयामध्ये उपरोक्त अधिनियमाच्या कलम 41 अअ मधील तरतुदींचे पालन न केल्यामुळे,येथे त्यांचे प्रशासन मुजोर झालेले आहे.सदर रुग्णालयास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. परंतु त्याचा समाधानकारक खुलासा रुग्णालयाच्या विश्वस्तांनी केलेला नाही. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे." सभापती महोदय, पुढील कार्यवाही काय करणार? सेक्शन 41 अअ प्रमाणे जर त्यांनी या सगळया अटींचे व्हायोलेशन केले तर.... सभापती महोदय, बांद्रया सारख्या ठिकाणी जमीन किती मातीमोल भावाने मिळालेली आहे. 672 प्रती चौरस मीटर प्रमाणे ही जमीन मिळालेली आहे. आणि त्याला 1 लाख 44 हजार रुपये भाडे आहे. बाय-पासच्या एका ऑपरेशनचे चार-चार लाख रुपये घेतात. एंजोप्लॅस्टिचे तीन-तीन, चार-चार लाख रुपये घेतात. कॉटनचा तुकडा सुध्दा रुग्णांना मोफत देत नाहीत. कुठल्याही प्रकारची सवलत मागितली तर ती दिली जात नाही. ऑपरेशनची तारीख दिल्या नंतर पहिल्यांदा 2/3 किंवा 75 पर्सेंट पैसे भरल्या शिवाय ऑपरेशनची तारीख मिळत नाही. सगळेच काही श्रीमंत आहेत म्हणून त्या रुग्णालयात जात नाहीत. जीवाची काळजी असते म्हणून लोक कर्ज वगैरे काढून असाध्य रोग बरा होण्यासाठी चांगल्या रुग्णालयातून चांगली सेवा मिळावी म्हणून जातात.पण त्यांना तशी सेवा

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

मिळत नाही. म्हणून त्यांना तुम्ही दंड किती करणार आहात?केवळ सेक्शन 66 प्रमाणे जी पेनॉल्टी लावलेली आहे, ती केवळ दोन हजार रुपये दंडाची आहे. माझा प्रश्न असा आहे की, कुठल्या अटी आणि शर्तीवर ही जमीन त्या रुग्णालयाला दिली होती? ज्या कायद्यानुसार त्यांना सवलती दिलेल्या आहेत त्यामध्ये ऑक्ट्रायमध्ये सवलत दिलेली आहे. पाणीपट्टीमध्ये सवलत दिलेली आहे. इलेक्ट्रिसिटीमध्ये सवलत दिलेली आहे. म्हणून यांच्यावर दंडात्मक कारवाई कोणती करणार? या काळामधील कमर्सियल रेटप्रमाणे पाणी पट्टी असेल किंवा बाकीचे जे सगळे दर असतील ते सगळे वसूल करणार काय?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कोणत्या अटी शर्तीवर.....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमच्यासमोर नेहमीच प्रश्न असतो की ट्रेझरी बेंचच्या बाजूने कोणीच सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. ना मंत्रिमहोदय, ना राज्यमंत्री ना सदस्य ही परिस्थिती आम्हाला नेहमी पाहावयास मिळते.सदनाचे काम चालवणे ही जबाबदारी कोणाची आहे?

यानंतर श्री. बरवड ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....
लक्षवेधी सूचना घेऊ नका असे आम्ही म्हणत नाही. पण सभागृहात गणपूर्ती ठेवणे ही सत्ताधारी पक्षाची जबाबदारी आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, या तांत्रिक मुद्दयावर सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यापेक्षा हा प्रश्न महत्वाचा आहे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेला आमची नेहमीच साथ असते. आम्ही सदनाच्या बाहेर जात नाही. हा सत्ताधारी बाजूकडचा प्रश्न आहे. मूलतः सभागृहात सन्माननीय सदस्यांना उपस्थित ठेवण्याची त्यांची जबाबदारी आहे. नेहमी असा अनुभव यावयास लागला आहे म्हणून मी हा हरकतीचा मुद्दा उपस्थित करीत आहे. सभागृहात गणपूर्ती ठेवण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, लिलावती हॉस्पीटलला जो भूखंड देण्यात आला होता त्यामध्ये करारनाम्यात कलम 2 (क्यू) मध्ये तरतूद आहे. त्यामध्ये मंडळाचे मुख्य अधिकारी....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, गणपूर्तीशिवाय सभागृहाचे कामकाज चालवावयाचे काय ?

**उप सभापती** : सभागृहात गणपूर्ती नसल्यामुळे सभागृहाची बैठक 2.15 वाजेपर्यन्त स्थगित करीत आहे.

( दुपारी 2.06 ते 2.15 वाजेपर्यन्त बैठक स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, याठिकाणी मा.सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी प्रश्न विचारला होता की, कोणत्या करारपध्दतीनुसार म्हाडाने लिलावती....

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, सभागृह तहकूब केले त्याला काही कारण होते. ते कारण तरी आम्हाला कळू द्यावे. ज्यांच्यामुळे सभागृह तहकूब झाले त्यांना ताकीद द्यावी. आम्ही किती काळ सरकार चालवावयाचे ?

**उप सभापती** : तुम्ही कोठे सहन केले ? आपण तर बाहेर गेला होतात.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, रेकॉर्डवर ताकीद येऊ द्यावी, याचे कारण असे की हे नेहमी होत आहे.

**उप सभापती** : सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सभासदांचे सहकार्य आवश्यक असते. हे सभागृह कोरमअभावी तहकूब करण्याची पाळी दोन्ही बाजूने येऊ देऊ नये आणि मला सहकार्य करावे अशी मी दोन्ही बाजूच्या मा.सदस्यांना विनंती करतो.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सभागृह तहकूब झाल्यामुळे माझा प्रश्न अर्धवट राहिला होता. या निवेदनामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, "परंतु त्यांचा समाधानकारक खुलासा सदर रुग्णालयाच्या विश्वस्तांनी केलेला नाही त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे" माझ प्रश्न असा आहे की, तुम्ही 2 हजार रुपये दंडा सुध्दा त्यांना केलेला नसणार. ज्याची कायद्यामध्ये तरतूद आहे. कालच मी अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने मी वेगळा विषय मांडण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी मंत्रिमहोदयांकडून सांगण्यात आले की, ही अतिशय गंभीर बाब आहे आणि शासन या कायद्यामध्ये बदल करुन दंडात्मक रक्कम वाढविणार आहे, त्याठिकाणी कैदेची सुध्दा तरतूद केली जाणार आहे असे एक चांगले व समाधानकारक उत्तर दिले होते. लगेच दुस-या दिवशी या लक्षवेधीच्या माध्यमातून मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले आहे त्यावरुन ही सर्व

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.मधुकर चव्हाण...

धर्मादाय संस्थांची रुग्णालये शासनाला अजिबात मानत नाहीत, तुमच्या पत्राला आठ महिने झाल्यावरही उत्तर देण्याची काळजी घेतली नाही. शासन हे प्रबळ असते, लोकशाहीमध्ये शासनापेक्षा कोणी प्रबळ नाहीत, परंतु आम्ही शासनाला मानणार नाही, आम्ही तुमच्या अटी व शर्थी पाळणार नाही असे त्यांचे धोरण आहे. सभापती महोदय, हे रुग्णालय साधारणपणे 7-8 वर्षे चालू आहे. या काळामध्ये अटीप्रमाणे त्यांनी एकाही रुग्णाला मोफत सेवा दिलेली नाही. ज्या दिवसापासून सुरु झाले तेव्हापासून ते आजपर्यंत त्यांना पाणीपट्टीत सवलत दिली आहे ती कमर्शिअल रेटने वसूल करणार का ? त्यांना अबकारी करात सवलत मिळालेली आहे, आयकरात सवलत मिळालेली आहे, या कायद्यातील तरतुदीनुसार ज्या ज्या सवलती मिळालेल्या आहेत त्या अनुषंगाने दंडात्मक रक्कम वसूल करणार काय आणि सवलती दिल्यामुळे त्यांना जो फायदा झालेला आहे म्हणून त्यांच्याकडून नियमित कर वसूल करणार का आणि कोणती कठोर कारवाई शासन करणार आहे ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, त्यांना ज्या करारपध्दतीवर, अटी व शर्थीवर आपण दिलेले होते त्या करारनाम्यानुसार व्यवस्थापन समितीवर हॉस्पिटलमधील एक सदस्य घ्यायवयास पाहिजे होता तो घेतलेला नाही. त्यांनी त्या अटी व शर्थीचा भंग केलेला आहे ही सत्य परिस्थिती आहे. नॉमिनल दरामध्ये हॉस्पिटलमध्ये रुग्णांना सुविधा दिल्या पाहिजेत किंवा म्हाडाचे जे कर्मचारी आहेत त्यांच्यासाठी 50 खाटा फ्री ठेवलेल्या आहेत. त्याही अटीची पूर्तता केल्याचे दिसत नव्हते. एकंदरीत आम्ही त्या हॉस्पिटलची पाहणी केली म्हणून त्या हॉस्पिटलला नोटीस दिलेली आहे. करारनाम्याचा भंग केला असल्यामुळे त्यांनी 90 दिवसात नोटीसला उत्तर दिले पाहिजे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. विमल मुंदडा...)

त्यांनी नोटीसीद्वारे दिलेले उत्तर समाधानकारक वाटले नाही तर शासनाकडून ज्या ज्या काही सवलती देय आहेत त्यासंदर्भात महानगरपालिकेला कळविण्यात येईल. बॉम्बे हॉस्पिटल, ब्रीचकॅन्डी हॉस्पिटल, लीलावती हॉस्पिटल यासारखी जी बॉम्बे ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत येणारी हॉस्पिटल्स आहेत त्या सर्व हॉस्पिटल्सच्या बाबतीत एक ॲक्शन प्लॅन तयार करावयाचा आहे. कालच याबाबतीत याठिकाणी चर्चा झालेली होती. या हॉस्पिटल्समधून बीपीएल खालील गरीब रुग्णांसाठी 15 टक्के बेडस् आरक्षित असावेत तसेच मोफत रुग्णसेवा दिली पाहिजे या दृष्टीने बॉम्बे ट्रस्ट ॲक्टच्या तरतुदी आहेत. शिवाय यासंदर्भात 22 जुलै 1990 ला शासनाने एक जी.आर.देखील काढलेला आहे.या रुग्णालयांमधून गरिबांना फ्री बेड सेवा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत, पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट तर्फे ज्या ज्या आरोग्य विषयक सेवा दिल्या जातात त्या सुविधा या रुग्णालयांमधून दिल्या गेल्या पाहिजेत यादृष्टीने शासन ॲक्शन प्लॅन तयार करणार आहे. हे प्रकरण सब्ज्युडिस आहे. अशी जी काही रुग्णालये गरिबांना आरोग्याच्या सुविधा देण्यामध्ये टाळाटाळ करतात त्याबाबतीत सचिव, विधी व न्याय विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव नगरविकास विभाग, सचिव, महसूल विभाग या विविध विभागाच्या सचिवांची एक समिती असणार आहे. डिस्ट्रीक लेव्हलवर...

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उप सभापती** : मा.सदस्यांनी प्रथम मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

डॉ. विमल मुंदडा :अशा प्रकारे बॉम्बे ट्रस्ट ॲक्टच्या अंतर्गत येणा-या रुग्णालयामधून ओपीडी किंवा अन्य आरोग्य विषयक सुविधा मिळावयास पाहिजेत. जसे शासकीय रुग्णालयांमधून किंवा महानगरपालिकेच्या रुग्णालयांमधून ज्या ज्या आरोग्य विषयक सुविधा रुग्णांना दिल्या जातात तशा प्रकारच्या आरोग्य विषयक सुविधा बॉम्बे ट्रस्ट ॲक्टच्या अंतर्गत येणा-या रुग्णालयामधून देण्यात येतील अशा प्रकारची भूमिका शासना घेणार आहे..

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा.मंत्रीमहोदयांनी प्रश्न जनरलाईज करुन उत्तर दिले आहे. म्हाडाच्या कर्मचा-यांसाठी लीलावती रुग्णालयामध्ये 50 बेडस् ठेवायला पाहिजेत. गेल्या 10 वर्षामध्ये त्यांनी म्हाडाच्या कर्मचा-यांसाठी एकही बेड ठेवलेला नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

यासंदर्भात म्हाडाच्या कर्मचारी संघटनेने तसेच म्हाडाच्या अधिकारी संघटनेने तक्रारी देखील केलेल्या आहेत. गेल्या 10 वर्षामध्ये त्यांनी आमदारांपैकी एकही प्रतिनिधी घेतलेला नाही. मा.मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांना नोटीस दिलेली असून 90 दिवसाच्या आत नोटीसीला त्यांनी उत्तर दिले पाहिजे. ही नोटीस 13 जूनला दिलेली आहे. ही नोटीस देऊन 9 महिन्यांचा म्हणजे 270 दिवसांचा काळ लोटला आहे. तरी देखील शासनाने काहीच कारवाई केलेली नाही. म्हणून माझा नेमका प्रश्न असा आहे की, या संपूर्ण काळातील पाणीपट्टी ही कमर्शियल रेटने घेणार काय ? हॉस्पिटलमध्ये परदेशातून जी मोठमोठी यंत्रसामग्री आणली जाते त्यावर ऑक्ट्राय माफ असतो तो ऑक्ट्राय शासन घेणार काय ? आतापर्यन्त ज्या कोट्यवधी रुपयांच्या सबसिडी त्या हॉस्पिटलला दिलेल्या आहेत त्याची वसुली करणार काय ? टॅक्समधील सवलत बंद करणार काय ? त्या हॉस्पिटलला शासनाकडून ज्या ज्या काही सवलती मिळतात त्या शासन काढून घेण्याचे आदेश देणार आहे काय ?

डॉ. विमल मुंदडा : मी मघाशी सांगितले की, आम्ही त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्या नोटीसीला समाधानकारक उत्तर आले नाही तर आम्ही ॲग्रीमेंट रद्द करणार आहोत.

श्री. जितेंद्र आव्हाड : मी परवा या सदनामध्ये बोलत असताना सांगितले की, महाराष्ट्रामध्ये ढेरपोटे विरुध्द खोलपोटे अशी लढाई आहे. हा प्रश्न लीलावती हॉस्पिटलपुरता मर्यादित नाही. श्रीमंतांनी ट्रस्ट स्थापन करायचे, सरकारमध्ये आपला वशिला वापरायचा, सरकारी जमिनी नाममात्र किंमतीने घ्यायच्या आणि गरिबांना आरोग्य विषयक सुविधा देत असल्याचे दाखवाचे, मात्र काहीच द्यायचे नाही ही विदारक वस्तुस्थिती आहे. मुंबईतील तमाम हॉस्पिटल्स बॉम्बे ट्रस्ट ॲक्टच्या नावाखाली सरकारच्या मदतीने उभी राहिलेली आहेत. अशा हॉस्पिटल्स मधून गरीब रुग्णांवर उपचार केले जात नाहीत हे विदारक सत्य आहे. आता लीलावती हॉस्पिटलच्या बाबतीत मा.सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी या लक्षवेधीच्या माध्यमातून जी वस्तुस्थिती सांगितली त्यानुषंगाने शासन तातडीने कारवाई करणार आहे काय ? ही कारवाई एक द्योतक ठरु शकेल. तेव्हा शासनाचे यासंदर्भातील धोरण काय असेल याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. ठाणे-मुंबई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जितेंद्र आव्हाड....)

शहरामध्ये या हॉस्पिटल्ससाठी 1-1 रुपया भाडे-पट्टीने जागा मिळविलेल्या आहेत. ही हॉस्पिटल्स अटी व शर्तींचे पालन करीत नसतील तर बॉम्बे ट्रस्ट ॲक्टच्या कलम 41 अेअे नुसान शासनाला अधिकार प्राप्त झालेले आहेत.

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:25

श्री.जितेंद्र आव्हाड...

मग एवढे वर्ष तुम्ही अधिकार का वापरले नाहीत ? तुम्ही अधिकार वापरले नाहीत म्हणून लोकांमध्ये मोठया प्रमाणात गैरसमज निर्माण झालेला आहे. तेंव्हा 41 चा वापर आपण करणार काय ? समस्त धर्मादाय आयुक्तांनी मंजूर केलेल्या शासनाचा फायदा घेत असलेल्या समस्त रुग्णालयांची शासनामार्फत चौकशी करण्यात येईल काय ? ज्यांनी अशा कारवाया केल्या आहेत त्यांच्याकडून रुग्णालये ताब्यात घेऊन ती रुग्णालये प्रशासकाच्या ताब्यात देणार काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, लिलावती हॉस्पीटलसाठी जागा ही म्हाडाने दिलेली आहे. लिलावती हॉस्पीटल आणि म्हाडा यांच्यामध्ये करार झालेला आहे. त्या करारामध्ये या रुग्णालयात 50 खाटा आरक्षित ठेवण्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या ठिकाणी दुस-या रुग्णालयाचा प्रश्न उपस्थित करण्याबाबतचा प्रश्न येत नाही. परंतु आपला चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्ट जो आहे. त्या ॲक्टप्रमाणे ज्या रुग्णालयांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्या रुग्णालयांमध्ये या ॲक्टचे उल्लंघन होते आहे असे निदर्शनास आल्यानंतर त्यांच्या बाबतीत नोटीस जारी करणे, त्यांची तपासणी करणे अशा गोष्टी शासनाच्या माध्यमातून करण्यात येत असतात. सभापती महोदय, मी सांगू इच्छिते की, रुग्णांची कुठेही हेळसांड होऊ नये अशा प्रकारची भूमिका शासनाची आहे व यापुढे देखील राहील..

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना अधिका-यांनी कदाचित चुकीची माहिती दिली असेल. आपण अडचणीत येऊ नये. म्हाडाने या लिलावती रुग्णालयास जागा उपलब्ध करुन दिली म्हणून तेथील कर्मचा-यांना 50 खाटा आरक्षित ठेवण्याचा करारात उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु पब्लीक चॅरिटेबल ट्रस्टखाली रजिस्ट्रेशन केल्यामुळे तेथे 10 टक्के खाटा आरक्षित ठेवाव्यात अशा प्रकारची तरतूद आहे. म्हाडाकडून जमीन घेतली म्हणून म्हाडातील कर्मचा-यांसाठी 50 खाटा ठेवल्या आरक्षित ठेवल्या पाहिजेत. आणि चॅरिटेबल ट्रस्ट प्रमाणे 10 टक्के खाटा आरक्षित ठेवल्या पाहिजेत. आपल्या उत्तरातून असे लक्षात येते की, That particular section is not applicable to Leelawati Hospital. It is not so.यामध्ये दोन गोष्टी वेगळया आहेत. चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्टप्रमाणे 10 टक्के आणि म्हाडाने जागा उपलब्ध करुन दिली म्हणून 50 खाटा या रुग्णालयात आरक्षित ठेवल्या पाहिजेत एवढेच मला आपणास नम्रपणे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सन्माननीय सदस्य माहिती सांगत आहेत ती सत्य आहे. मी मघाशी असेच सांगितले की, लिलावती रुग्णालयास म्हाडाने जमीन उपलब्ध करुन दिलेली आहे. या रुग्णालयामध्ये म्हाडासोबत केलेल्या कराप्रमाणे त्या ठिकाणी अंमलबजावणी व्हावी तसेच मुंबई चॅरिटेबल टॅक्टची देखील तरतूद या ठिकाणी लागू करावे असेच मी या ठिकाणी सांगत आहे. अशा रुग्णालयांमध्ये रुग्णांची गैरसोय होता कामा नये म्हणून शासनाने ॲक्शन प्लॅन केलेला आहे यासंबंधीची माहिती देखील मी मघाशी सांगितलेली आहे.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मूळ दुखणे वेगळे आहे. या ठिकाणी फक्त लिलावती रुग्णालयाचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. परंतु हा प्रश्न खूप व्यापक आहे. एखादे रुग्णालय अपवाद वगळता सगळया रुग्णालयांमध्ये या ॲक्टचे चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्टचे उल्लंघन सर्रासपणे होत आहे. ज्यावेळी ट्रस्टच्या माध्यमातून रुग्णालये उभी करण्यात येतात त्यावेळी शासनाकडून सर्व सुविधांचा लाभ घेतात. जागा कमी भावाने घेतता. एफ.एस.आय.ची सवलत घेतात. माझ्या माहिती प्रमाणे ही रुग्णालये उभी राहिल्यानंतर विशिष्ट भाग हा चॅरिटेबल आहे म्हणून जगातील अनेक संस्थांकडून निधी सुध्दा घेतात. त्याची आपल्याला कल्पना नाही, आणि आपले त्यासंबंधात काही कर्तव्य देखील नाही. असे असताना देखील ही रुग्णालये पूर्वीचे करार पाळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात आपल्याकडे मॉनेटरिंग ॲथॉरिटी उपलब्ध नाही. एखाद्या आमदाराने प्रश्न उपस्थित केल्यानंतर तुम्ही चौकशी करणार हे बरोबर नाही. यासंदर्भात कायम स्वरुपाची मॉनेटरिंग ॲथॉरिटी आपल्या खात्याने तयार केली तर त्या रुग्णालयांची वेळोवेळी तपासणी केली जाईल, त्यांचेवर एक प्रकारे नियंत्रण राहील. या ट्रस्टच्या रुग्णालयांना कोणी विचारत नाही. त्यांची लेजर्स कोणी बघत नाही. त्या ठिकाणी जाऊन एका महिन्यात किती रुग्णांना विनामूल्य सेवा दिलेली आहे याची माहिती कोणी विचारीत नाही. या प्रश्नास कायमचा विराम द्यावयाचा असेल तर आपण ताबडतोब मॉनेटरिंग ॲथॉरिटी ताबडतोब नेमाल काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मला एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय सभापतीच्या दालनात चर्चा झाली. त्यावेळी मा.सभापती श्री. शिवाजीराव देशमुख, माननीय मुख्यमंत्री व मी तसेच आपणही उपस्थित होतात. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सुचविले की, या बाबतीत रेग्युलाईज करण्याकरिता आपल्याला

3...



ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:25

श्री. नितीन गडकरी..

उप संचालकांच्या स्तरावर एक ॲथॉरिटी तयार करावयाची आहे. आपल्या या रुग्णालयांमध्ये जेवढया खाटा आरक्षित आहेत त्याची काळजी ते उप संचालक घेतील. नियमाप्रमाणे रुग्यांसाठी या रुग्यालयांमध्ये जेवढे टक्के आरक्षण व सुविधा ठेवलेल्या आहेत. तेवढया प्रमाणात  रुग्णंना सुविधा उपलब्ध करुन दिल्या गेल्या पाहिजेत अशा प्रकारचा मानस आमचा आहे. माननीय सभापतींनी देखील यासंदर्भात सहमती दर्शविली व त्यास मी समर्थन दिले. सन्माननीय सदस्य श्री. नवलकर यांनी या ठिकाणी या रुग्णालयांवर नियंत्रण असले पाहिजे यासंदर्भात मॉनेटरिंग ॲथॉरिटी असली पाहिजे अशी मागणी केली. तशाच भावनाने मी माझे मत व्यक्त केलेले आहे. माननीय मंत्र्यांनी यासंदर्भात उत्तर देण्याच्या आधी यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी. या विषयाच्या संदर्भात माननीय सभापतींनी देखील माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी. जनतेच्या दृष्टीने अशा प्रकारची ॲथॉरिटी असणे आवश्यक आहे. या संदर्भात चर्चा करुन नंतरच याबाबतचा निर्णय या ठिकाणी सांगावा. माननीय मुख्यमंत्री, माननीय सभापती यांचे बरोबर या विषयावर चर्चा झालेली आहे. आपण उत्तर देण्याआधी आपणास यासंबंधीची माहिती व्हावी म्हणून मी माननीय मंत्र्यांना ही बाब निदर्शनास आणून देत आहे. आपण माननीय सभापतींच्या दालनात झालेल्या चर्चेची प्रथम माहिती घ्या, त्यासंदर्भातील सर्व बाबी तपासून घेऊन नंतर आपला यासंबंधीचा निर्णय जाहीर करा. पण आज त्या प्रश्नास नकारात्मक उत्तर दिले तर रेकॉर्डवर चुकीची माहिती येईल. म्हणून मी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मा.विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यानुसार ॲक्शन प्लॅन तयार करीत आहोत. त्याचा संबंध याच्याशी नाही. मुंबई महापालिकेशी संबंध आहे,विधी व न्याय विभाग महसूल विभाग,गृहनिर्माण विभाग,धर्मादाय आयुक्त,आरोग्य विभाग अशा विविध विभागांशी रीलेटेड आहे.लिलावती रुग्णालयाच्या याबाबतीत एक समिती स्थापन करुन त्याबाबतचा निर्णय तीन महिन्यात घेऊ. मा.सदस्य श्री. नवलकर यांनी सांगितल्याप्रमाणे अशा प्रकारचे जे ट्रस्ट असतात त्यांच्यावर कंट्रोल करणे आणि मॉनिटरींग करणे आवश्यक आहे. सर्व विभागांना एकत्र करुन याबाबत निर्णय घेता येईल. सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे ज्या सुविधा दिल्या जातात आणि जी टक्केवारी ठरवून दिलेली आहे अशी भूमिका निश्चिपणे असणार आहे आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे याची शासन निश्चितपणाने दक्षता घेणार आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुंबईमध्ये अशा प्रकारची ट्रस्टी साधारणत: 20-30 हॉस्पीटल्स् असतील. ठाण्यामध्ये 1/2 असतील. आतापर्यंत या हॉस्पीटल्स्नी किती गरीब रुग्णांवर मोफत उपचार केले याची शासनाने तात्काळ माहिती मागवावी. कलम 41(अे) प्रमाणे धर्मादाय आयुक्तांना आणि शासनाला अधिकार आहे. सभापती महोदय,ठाणे महानगरपालिकेचे 1 रुपयाच्या भाडे तत्वावर ठाण्यामध्ये सुयोग नावाचे हॉस्पीटल आहे. आतापर्यंत या हॉस्पीटलमध्ये एकाही गरीब रुग्णावर मोफत उपचार केलेले नाहीत. उलट पैसे दिल्याशिवाय प्रेत अडविण्याचे काम यांनी केले आहे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मा. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन याबाबतची काटेकोरपणाने अंमलबजावणी करण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अनंत तरे )**

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: विमुक्त जाती आणि जमाती मधील लोकांना जातीचा दाखला मिळण्याबाबत.

**मु.शी.**: विमुक्त जाती आणि जमाती मधील लोकांना जातीचा दाखला मिळण्याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा.सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सीबीसी/1361/एम दिनांक 21 नोव्हेंबर 1961 अन्वये जाहीर केलेल्या एकूण 42 जाती व जमाती, नागपंथी, डवरीगोसावी, जोशी, चित्रकशी, दांगट, गारुडी, गोंधळी, कांजरभाट, भामटा, राजपारधी, मसनजोगी, बेलदार, कोलाटी, वासुदेव, भुते, नंदीवाल, हेलवे इत्यादी 42 जाती व जमातींच्या लोकांना शैक्षणिक नोकरी विषयक सवलती मिळविण्यासाठी जातीच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असते. सदर प्रमाणपत्र मिळविण्याकरिता या लोकांना महाराष्ट्र राज्यात 1961 पासून स्थायिक असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मागितला जातो. अन्यथा जातीचे प्रमाणपत्र त्यांना मिळत नाही आणि शासनाच्या विविध सामाजिक सोयी सवलतींचा त्यांना लाभ घेता येत नाही. भटक्या विमुक्त जाती व जमाती जन्मत: उदरनिर्वाहासाठी गावोगाव भटकत राहिलेल्या आहेत. तसेच हा समाज शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्टया मागासलेला आहे. शासनाने या समाजाच्या विकासाकरिता जाहीर केलेल्या विविध सवलतींचा फायदा घेण्यासाठी जातीच्या दाखल्याची नितांत गरज असतांना 1961 च्या कागदोपत्री पुराव्या अभावी त्यांना जातीचे प्रमाणपत्र दिल्या जात नाही.

सबब, हया समाजाला जातीचा दाखला देण्यासाठी घालून दिलेली उपरोक्त अट रद्द करुन त्यांना शाळा सोडल्याचा दाखला, शिधापत्रिका, नोकरी असल्यास नोकरीचा दाखला, निवडणूक ओळखपत्र, समाज संघटनेचा दाखला, न्यायालयीन शपथ पत्र आदि कागदपत्रे विचारात घेऊन जातीचा दाखला देण्याची कारवाई करण्याचे निदेश संबंधित विभागाला द्यावेत, ही विनंती.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ...

सभापती महोदय, या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विमुक्त जाती आणि जमातीमधील लोकांना जातीचा दाखला देताना मुंबईच्या उपनगर जिल्हाधिका-यांकडून अनेक अडचणी निर्माण केल्या जातात त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 21 नोव्हेंबर 1961 च्या निर्णयानुसार 42 जाती-जमाती जाहीर करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये नागपंथी,डवरीगोसावी,जोशी,चित्रकशी,दांगट,गारुडी,वासुदेव इ. जातींचा समावेश आहे. या विमुक्त जाती जमातीमधील लोकांना जातीचा दाखला/प्रमाणपत्र सहजासहजी मिळत नाही आणि त्यांना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते. या राज्यातील विमुक्त जाती जमातीच्या लोकांना हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी 1961 पासून या राज्यामध्ये स्थायी असल्याबद्दलचा पुरावा मागितला जातो. तो पुरावा नसेल तर जातीचे प्रमाणपत्र दिले जात नाही आणि शासनाच्या विविध सामाजिक सवलतींना या गोरगरीब जनतेला मुकावे लागते. त्याचा त्यांना फायदा घेता येत नाही. विमुक्त जाती जमातीमधील लोक जन्मत:च उदरनिर्वाहासाठी गावोगाव भटकत असतात.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.कानडे 14.30

प्रा.जोगेन्द्र कवाडे ...

आज सुध्दा त्यांची भटकंती थांबलेली नाही. त्यांच्या भटकंतीमुळे त्यां समाजातील मुले आणि मुली शैक्षणिकदृष्टया मागासलेली आहेत. त्याचबरोबर ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टयासुध्दा मागासलेली आहेत. शासनाने या समाजाच्या विकासाकरिता ज्या विविध सवलती जाहीर केलेल्या आहेत त्याचा फायदा घेण्याकरता त्यांचयाकडे जातीचा दाखला असणे अत्यंत आवश्यक असते. हा जातीचा दाखला मिळविण्यासाठी 1961 च्या कागदपत्रांचा पुरावा द्यावा असे सांगण्यात येत असल्यामुळे त्या समाजातील लोकांना जातीचे प्रमाणपत्र दिले जात नाही. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत शासनाला अशी विनंती करतो की,भटक्या समाजाला जातीचा दाखला मिळविण्याकरिता ज्या अटी घालून दिलेल्या आहेत त्या अटी रद्द करुन शाळा सोडण्याचा दाखला, नोकरीच्या ठिकाणी असलेले नोकरीचे ओळखपत्र, शिधावाटप पत्रिका,तसेच त्यांच्या समाजातील संघटनांनी दिलेला दाखला, न्यायालयातील शपथपत्र इत्यादी कागदपत्रे विचारात घेऊन त्यांना जातीचा दाखला देण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश शासनाला द्यावेत अशी मी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने विनंती करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

**पृ.शी : शासनाने देशी दारुविषयक लोककेन्द्री धोरण जाहीर करणे**

**मु.शी :शासनाने देशी दारु विषयक लोककेन्द्री धोरण जाहीर करण्याबाबत प्रा.शरद पाटील ,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना**

**तालिका सभापती (श्री.अनंत तरे)** : माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.शरद पाटील ( पुणे विभाग शिक्षक ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :

"राज्यात देशी दारु दुकांनांच्या परवान्यांची सख्या शासन वाढवून देणार अशी विविध व्यासपीठांवर चर्चा आहे. त्यामुळे सामाजिक संघटना व जागरुक नागरिक अस्वस्थ आहेत. या विषयी त्यांचे म्हणणे असे आहे की, 1972 पासून आतापर्यन्त सरकारने अनेक वेगवेगळे निर्णय घेऊन दारुच्या वापराला प्रोत्साहन दिले आहे. या सर्व निर्णयांना विरोध करण्यात गावा गावातल्या महिलांची, संघटनांची खूप उर्जा खर्ची पडली आहे आणि मानवी आरोग्याचा साधसंपत्तीचा प्रचंड -हास झाला आहे. अशा प्रकारे दारु दुकाने वाढवून देण्याने गावागावातील अराजकता वाढेल.

या शिवाय दारु विक्री बाबत शिथिल धोरण म्हणजे 30 लाख दारुबाज पुरुष निर्माण करणे (लोकसंख्येच्या सुमारे 10 टक्के व्यसनी असतात ) दोन कोटी ही पुरुषांची संख्या गृहीत धरली आहे. 30 लाख कुटूंबे म्हणजेच दीड कोटी लोकसंख्या उद्ध्वस्त करणे, दोन लाख पुरुषांचा मृत्यू होऊ देणे, 18 कोटी कामांचे दिवस वाया घालवणे ( दारुबाज माणूस वर्षाला 60 दिवस कामावर गैरहजर राहतो), 1800 कोटी रुपयांचे नुकसान होऊ देणे ( 100 रुपये प्रती कामाचा दिवस ), 1500 कोटी रुपये व्यसनीच्या उपचारासाठी खर्च करणे ( एक व्यक्ती एक वर्ष व्यसनमुक्त राहण्यासाठी येणारा खर्च 5000 रुपये ) याचाच अर्थ असा आहे की, दारुपायी दरवर्षी 2.271 कोटी रुपये सरकारला मिळावेत म्हणून समाज 3,300 कोटी रुपये किंमत चुकती करतो, विकासाचे हे गणित वजाबाकीचे आहे आणि म्हणूनच दारु दुकानांचे परवाने वाढवून देण्याआधी शासनाचे दारु विषयक लोककेन्द्री धोरण जाहीर व्हावे व या विषयी अभ्यास करण्यासाठी माजी न्यायमूर्ती श्री चन्द्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने अभ्यास समिती नेमावी अशी आग्रहाची मागणी आहे तरी कृपया या विषयी विशेष उल्लेख मी करु इच्छितो."

----

3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी : मंत्रालयातील विविध विभागांमध्ये प्रलंबित असलेल्या फायलींचा निपटारा करणे**

**मु.शी : मंत्रालयातील विविध विभागांमध्ये प्रलंबित असलेल्या फायलींचा निपटारा करण्याबाबत श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना**

**तालिका सभापती (श्री.अनंत तरे)** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था):महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :

" मंत्रालयीन कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यापोटी 106 कोटी रुपये खर्च होत असतांना वेगवेगळया विभागामध्ये सुमारे 1 कोटी 89 लाख फायली निर्णया शिवाय पडून आहेत.गृह विभागात 16 हजार 397 फायली प्रलंबित होत्या व निर्णय फक्त 2511 फायलींवर झाला,त्यासाठी कर्मचा-यांच्या पगारावर मात्र 57 कोटी 78 लाख रुपये खर्च झाला, सामान्य प्रशासन विभागात 5640 फायलींपैकी फक्त 524 फायलींवर निर्णय झाला व त्यावर 1 कोटी 77 लाख रुपये खर्च झ ााला.सार्वजनिक बांधकाम विभागात 7646 फायलीं पैकी 733 फायलींवरच निर्णय झाला व कर्मचा-यांच्या पगारावर 64 कोटी 72 लाख रुपये खर्च झाले, अशीच परिस्थिती जवळजवळ सर्व शासकीय विभागात आहे व त्यानुसार कमीत कमी दोन हजार रुपये व जास्तीत जास्त 33 हजार रुपये प्रत्येक फायलीवर वर्षानुवर्षे खर्च होतो, शासकीय कामांना दिरंगाई होणे व निर्णय लागण्यास वर्षानुवर्षे लागतात याची कारणे काय आहेत, त्याचा अभ्यास करुन सुधारणा सुचविण्याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली तीन सचिवांची समिती शासनाने नियुक्त केली होती व त्या समितीच्या शिफारशीवरुन उपरोक्त माहिती शासनाला सादर केली आहे .ज्या प्रमाणात वेतन व भत्ते याावर खर्च केला जातो, त्या मानाने कामाचा निपटारा होत नाही, विकासाची अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. त्यामुळे समितीच्या शिफारशी बाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावेत.व जनतेची दीर्घकाळ अनिर्णित राहिलेली प्रकरणे त्वरीत निकालात काढून विकासाच्या कामांचा निपटारा वेळेची मर्यादा घालून त्वरित करण्यात यावा. यासाठी ही बाब मी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात उपस्थित करु इच्छितो. कृपया परवानगी द्यावी .-."

-----

नंतर श्री.सुंबरे

अशोधित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 14:40

**पृ.शी.** : घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत.

**मु.शी.** : घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत श्री.रामनाथ मोते यांनी केलेला विशेष उल्लेख.

----

**तालिका सभापती (श्री.अनंत तरे)** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शिक्षकांच्या एका महत्त्वपूर्ण विषयाबद्दल विशेष उल्लेखास संमती दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि पुढीलप्रमाणे विशेष उल्लेख करतो ...

" महाराष्ट्रातील उच्च माध्यमिक व तंत्रशिक्षण, तसेच औद्योगिक प्रशिक्षण तथा मुलभूत प्रशिक्षण केंद्र व तत्सम विभागात काम करणाऱ्या तथापि पूर्णवेळ शिक्षकाचा अथवा अंशकालिक शिक्षका इतका संबंधित विषयाचा कार्यभार उपलब्ध नसल्याने या शिक्षकांना घड्याळी तासावर काम करावे लागले. 1978 पासून अशा घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना प्रत्येक घड्याळी तासासाठी 20 रुपये मानधन मिळते आणि यानुसार साधारणत: 500 ते 600 रुपये मानधन दरमहा मिळते. राज्यातील सर्व शिक्षकांच्या वेतनश्रेण्या 1986 च्या चौथया वेतन आयोगानुसार व त्यानंतर 1996 च्या पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारण्यात आल्या. तथापि घड्याळी तासावर काम करणाऱ्या या शिक्षकांच्या मानधनात मात्र वाढ झाली नाही. परिणामत: सर्वसाधारणपणे शिक्षक पदावर काम करणाऱ्या शिक्षकाला 15 हजार रुपये पर्यंत वेतन मिळते आणि या शिक्षकांना मात्र केवळ 350 ते 400 रुपये मिळतात. या बाबतीत शासनाकडे वारंवार विनंती करण्यात आली असून घड्याळी तासांवर काम करणाऱ्या या शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी केली होती. याबाबत या सदनामध्ये चर्चा देखील झालेली आहे. तारांकित प्रश्न क्रमांक 33580 वर 16 जुलै 2003 रोजी हा विषय सभागृहापुढे आला असता माननीय मंत्री महोदयांनी घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करण्याचे, 20 रुपयांऐवजी 50 रुपये देण्याचे मान्य केले होते, आश्वासन दिले होते. त्यासाठी येणाऱ्या आर्थिक बोजाचा विचार करता केवळ 2 कोटी 52

..... एफएफ 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते .....

लाख रुपये खर्च येणार आहे. गेल्या तीन वर्षात या सदनामध्ये मंत्र्यांनी आश्वासन देऊनही, निर्णय जाहीर करूनही त्याची अमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही. त्यामुळे आज देखील घड्याळी तासावर काम करणाऱ्या या शिक्षकाला 20 रुपये प्रमाणेच मानधन मिळते आहे. माननीय सभापती महोदय, घरकाम करणाऱ्या बाईपेक्षा देखील कमी वेतन या शिक्षकांना मिळते आहे. म्हणून शासनाने 2003 मध्ये जाहीर केलेल्या निर्णयाची अमलबजावणी होण्यासाठी 'विशेष उल्लेख' द्वारे मी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देत असून तातडीने या निर्णयाची अमलबजावणी होण्यासाठी योग्य ते आदेश निर्गमित करावेत अशी विनंती मी करतो.

*****

..... एफएफ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : महाराष्ट्र माहितीचा अधिकार अंतर्गत नवी मुंबई महापालिकेकडून मागितलेली माहिती न मिळणेबाबत.

**मु.शी.** : महाराष्ट्र माहितीचा अधिकार अंतर्गत नवी मुंबई महापालिकेकडून मागितलेली माहिती न मिळणेबाबत श्री.अरविंद सावंत यांनी केलेला विशेष उल्लेख.

-----

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी 'विशेष उल्लेख'ची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, आयत्या वेळेस सूचना देऊनही माननीय सभापतींनी मला 'विशेष उल्लेख' करण्यास या ठिकाणी परवानगी दिली त्याबद्दल मी सुरूवातीलाच माननीय सभापतींचे मन:पूर्वक आभार मानतो.

अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी एका वेगळ्याच विषयासंबंधात हा 'विशेष उल्लेख' करीत आहे. या सदनामध्ये राज्यातील नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यासंबंधीचे अत्यंत महत्त्वाचे असे विधेयक 2003 मंजूर केले. या विधेयकामध्ये अपेक्षित होते की, कोठल्याही सर्वसामान्य नागरिकाने त्याला कोणतीही माहिती शासनाकडून अपेक्षित असेल तर त्यासाठी शासनाकडे, संबंधित विभागाकडे अर्ज केल्यास त्याला ती माहिती उपलब्ध करून दिली जाईल. त्यामध्ये जर काही कागदपत्रे असतील तर त्यांच्या प्रती .. झेरॉक्स वगैरे करण्यासाठीचा खर्च आकारला जाईल. अध्यक्ष महाराज, मी या संदर्भात आपल्यापुढे काही धक्कादायक माहिती देऊ इच्छितो त्यावरून आपल्या लक्षात येईल की, या माहितीच्या अधिकाराच्या शासनाचे अधिकारी कशी धज्जा उडवितात. अध्यक्ष महाराज, नवी मुंबई मध्ये एका नागरिकाने तेथील महापालिकेकडे अर्ज केला आणि तेथील भ्रष्टाचारांच्या प्रकरणांची माहिती मागितली. नवी मुंबई मध्ये आर्ट व्हिलेज म्हणून एक वसाहत आहे त्या वसाहतीमध्ये प्रवेशद्वार बांधावयाचे होते आणि त्यासाठी 5 लाख रुपयांचे एस्टिमेट तयार करण्यात आले व ते मंजूरही करण्यात आले. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. जागडे .... जीजी 1 ..

श्री. अरविंद सावंत.....

त्या ठिकाणी प्रवेशद्वार न उभारता पाच लाख रुपये गिळंकृत केले आहेत. नाल्याचे बांधकाम करण्यासाठी पाच लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. परंतु त्या ठिकाणी नालाच अस्तित्वात नाही. तेही पाच लाख रुपये गिळंकृत करण्यात आले आहेत. सभापती महोदय, आपण बांधकाम व्यवसायात थोडेसे काम करीत आहांत, त्यामुळे आपणाला याची कल्पना आहे. रस्त्यावरील स्पीड ब्रेकर बांधावयाला 11 हजार रुपये खर्च येत असतो. त्या स्पीड ब्रेकरच्या दुरुस्तीसाठी 35 हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. मी अनेक प्रकारची धक्कादायक माहिती या ठिकाणी सांगणार आहे. मी तेथील अधिका-याला एक पत्र लिहिले आहे. नव्या मुंबईमध्ये बांगला देशीय लोक राहत आहेत. त्यांनी खोट्या शिधा पत्रिका तयार केल्या आहेत. या माध्यमातून त्यांची नांवे आता उद्याच्या निवडणूक यादीत आली आहेत.

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

सभापती महोदय, या बाबत मी पत्र दिले होते. मला असे उत्तर तेथील अधिका-याने दिले आहे की, " आपणाला पात्र मतदार पाहिजेत की अपात्र मतदार पाहिजेत. आपणाला माहिती कोणाची पाहिजे ? पात्र की अपात्र. " आता कोणते मतदार अपात्र आहेत, याची तेथील अधिका-यांना माहिती आहे. सभापती महोदय, त्यांना दिलेल्या शिधापत्रिकेचे नंबर आपल्या कार्यालयात नाही. आता त्या शिधापत्रिकेच्या आधारे त्यांनी आपले नाव मतदार यादीमध्ये आणले. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अंतर्गत सौ. कायस्था सावंत यांनी प्रभाग क्र. 13 मध्ये करण्यात आलेल्या प्रभाग समिती निधी, नगरसेवक निधी अंतर्गत केलेल्या कामांची माहिती मागितली होती. या बाबत कार्यकारी अभियंता यांनी सौ. कायस्था सावंत यांना असे उत्तर दिले आहे की, " आपण मागितलेली उपरोक्त विषयाची माहिती संकलित करणेकरिता स्वतंत्रपणे एक कनिष्ठ अभियंता, एक लिपीक व शिपाई नेमणे आवश्यक आहे. त्या निमित्त सदर कर्मचा-यांच्या वेतनावर होणारा अनिश्चित खच्र रुपये 14,897/- इतका आपण भरण्यास तयार असल्यास सदर माहिती संकलित करण्याचे काम चालू करता येईल. " सभापती महोदय, हा आपला माहितीचा अधिकार. सभापती महोदय, मी या बाबतचे सर्व पुरावे आपणाकडे देतो. सभापती महोदय, विधेयकाचा धज्जे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

आपले अधिकारी कसे उडवितात, हे आपणाला दिसून येईल. तेव्हा या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी शासनाचे लक्ष वेधीत आहे. भ्रष्ट कारभार चालला असताना, आणि त्याबाबत एखादा जागरुक नागरिक माहिती मागवून काहीतरी कारवाई करण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना माहिती दिली जात नाही. मी या बाबतची माहिती मागितली असतानाही मला अजूनही माहिती दिली नाही. म्हणून या विशेष उल्लेखाच्या मार्फत मी शासनाला विनंती करीत आहे. शासनाने या बाबत तातडीने कारवाई करावी. सभापती महोदय, मी या बाबतची सर्व कागदपत्रे आपणाकडे सादर करीत आहे. कृपया यावर आपण योग्य ती कारवाई करावी.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील जिल्हा परिषद सदस्यांचे अधिकार कमी करणे.

**मु.शी.**: राज्यातील जिल्हा परिषद सदस्यांचे अधिकार कमी करणे या बाबत श्री. अनंत तरे, वि .प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अनंत तरे ( रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" रस्ते देखभाल व दुरुस्ती अंतर्गत या लेखा शीर्षाखाली गट अ मधील कामे अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम स्तरावर गट ब व क ची कामे शासन स्तरावर आणि ड ची कामे मुख्य अभियंता यांचे स्तरावर सद्य:स्थितीत मंजूर केली जातात. सदर कामे मंजूर करण्याचे कोणतेही अधिकार जिल्हा परिषदेला नाहीत. वास्तविक पाहता जिल्हा परिषदेचे संबंधीत सदस्य यांच्या ग्रामीण स्तरावर प्रत्यक्ष व सातत्याने संपर्क असल्याने कोणत्या रस्त्यांची कामे प्राधान्याने करुन घ्यावयाची याबाबत त्यांना चांगली माहिती असते. अशा परिस्थितीत कोणत्याही रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे यांना अधिक्षक अभियंता यांनी दिलेली सहमती ही प्रशासकीय मान्यता समजण्यात घेऊ नये. प्रशासकीय मान्यता संबंधीत जिल्हा परिषदेने द्यावयाची आहे. अशी परवानगी असल्याशिवाय कोणतीही कामे करु नयेत, असे शासनाचे आदेश होते. सन 2001-2002 साली रस्ते देखभाल दुरुस्तीची कामे ठरविण्याचे जिल्हा परिषदेला अधिकार देण्यात आले होते. त्यानंतर दि. 21.5.2002 रोजी रस्ते व पुलाव्च्या परीरक्षण व दुरुस्ती कामाच्या आढावा बैठकीत मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांच्या बैठकीत घेण्यात येतो. सदरचा कार्यक्रम मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणे अधिक्षक अभियंता व शासन स्तरावर देण्यात आल्याने राज्यातील जिल्हा परिषदांच्या अधिकारांवर शासनाने गदा आणली असल्याने दि. 21.5.2002 रोजी बैठकीतील आदेश रद्द करुन पूर्वीप्रमाणे पध्दत सुरु ठेवण्यात यावी, त्यासाठी हा प्रस्ताव तपासून शासनाने तात्काळ निवेदन करावे. "





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे......

सभापती महोदय, यामुळे राज्यातील जिल्हा परिषदांच्या सदस्यांच्या अधिकारावर गदा आली आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी त्यांच्या मतदार संघामध्ये कोणते रस्ते करण्याची आवश्यकता आहे, याची माहिती असते. परंतु या रस्त्यांची कामे अधिक्षक अभियंता आणि त्यांचे अधिकारी करीत असतात. त्यामुळे जिल्हा परिषदांच्या सदस्यांच्या अधिकाराचा विचार व्हावा. आपल्या मतदार संघातील कोणते रस्ते घ्यावेत, या बाबतचा अधिकार जिल्हा परिषद सदस्यांना होता. तसा अधिकार पुन्हा जिल्हा परिषद सदस्यांना देण्यात यावा, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी विशेष उल्लेखाव्दारे जो विषय याठिकाणी मांडलेला आहे, त्या संदर्भात कार्यकारी अभियंत्यांना ताबडतोब मंगळवारच्या आत या संदर्भात योग्य ती माहिती सादर करण्याचे निदेश देतो. तसेच, अशाप्रकारे माहितीच्या अधिकाराचा चुकीचा अर्थ लावला जात आहे त्यासंबंधी योग्य ती कारवाई करतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी मनापासून आपणास धन्यवाद देतो.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वाजता पुन: भरेल.

(2.50 ते 3.15 मध्यंतर)

----

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सभागृहात कोरम नाही. याठिकाणी वारंवार सांगून सुध्दा ऐकले जात नसेल तर तातडीने, वेळ न दवडता, शिवाय याठिकाणी कॅबिनेट मंत्री महोदय देखील उपस्थित नाहीत. एका निर्लज्य माणसासारखे विरोधी पक्षाला काम करावे लागत आहे.

(यावेळी कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये येतात.)

सभापती महोदया, आता सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री आले असले तरी देखील सभागृहात कोरम नाही. त्यामुळे आपण तातडीने सभागृहाची बैठक तहकूब करावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शासन किती बेजबाबदारपणे वागत आहे ते पहावे.

**तालिका सभापती** : सभागृह तहकूब केले तर सगळेच ठराव राहतील.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, त्यासाठी सकाळी सभागृहाची विशेष बैठक घ्यावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, मंगळवारी सकाळी विशेष बैठक घ्यावी.

**तालिका सभापती** : आता सभागृहामध्ये कोरम झालेला आहे. त्यामुळे आता अशासकीय कामकाज घेण्यात येईल.

----

. . . .2 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज**

**अशासकीय विधेयके**

पृ.शी.: रोजगार हमी (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO. III OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.)**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

पृ.शी.: माथाडी,हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO.IV OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MATHADI, HAMAL AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1969.)**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : सन्माननीय सदस्यांनी विनंती केली होती की, ते यात्रेला गेलेले असल्याने, आज येऊ शकत नाहीत. म्हणून त्यांनी जी विधेयके दिलेली आहेत, ती पुढे घेण्यात यावीत. नाहीतर ती लॅप्स् होतील.

**तालिका सभापती** : माझ्यासमोर त्यांची विनंती नाही. पण त्यांची विनंती असेल आणि आपण त्यांच्यावतीने सांगत आहात का ? जेणेकरुन ती लॅप्स् होऊ नयेत.

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : होय.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्यामुळे वि.प.वि.क्रमांक - 3 व वि.प.वि.क्रमांक - 4 ही पुर:स्थापनार्थ असलेली दोन विधेयके पुढे ढकलण्यात आली आहेत.

-----

. . . .2 आय-3





पृ.शी.: मालकीहक्कांच्या फ्लॅटस्बाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन

देणे,त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO.X OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963.**

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 10 - महाराष्ट्र मालकीहक्काच्या फ्लॅटस्‌बाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

सभापती महोदय, विधान परिषद विधेयक क्रमांक 10- महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅटबाबत ( ते बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांची विक्री व्यवस्था व हस्तांतर यांचे नियमन करण्यासंबंधी ) सुधारणा विधेयक 2005 हे अशासकीय विधेयक आज सभागृहासमोर मांडीत असून मुंबई ठाणे आणि राज्यातील हजारो सदनिका धारकांना सतावणारी समस्या म्हणजे असे फ्लॅटस बांधून त्याची विक्री केल्यानंतर बिल्डर्स- विकासक सहकारी गृह निर्माण संस्थानच्या नावे अशा इमारतीचे अभिहस्तांतरणपत्र करुन देत नाही, परिणामी तांत्रिक दृष्टीने अशा इमारतीची मालकी बिल्डर्स- विकासकांकडे वर्षानुवर्षे रहात आहे. हा ज्वलंत विषय सोडविण्यासाठी व लाखो फ्लॅट्स धारकांना दिलासा देण्यासाठी हे महत्वाचे अशासकीय विधेयक मी आणले आहे. बिल्डर्स, प्रवर्तक मालकी हक्क तत्वावर सदनिका बांधून त्याची विक्री करतात कांही काळाने आपला बिल्डर्सचा व्यवसाय बंद करुन निघून जातात. परिणामी कन्हेअन्स ऑफ लॅन्ड हा महत्वाचा भाग तसाच राहिल्याने मुंबई-ठाणे, पुण्यातील आदि शहरातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील फ्लॅट्स मालक अतिशय चिंतीत झालेले आहेत. त्यांचा हा प्रश्न सोडविण्यासाठी हे अशासकीय विधेयक मांडले असून हे विधेयक ज्यावेळी चर्चेला येईल त्यावेळी यासंबंधीचे माझे विचार सविस्तर मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** :अनुमती देण्यात आली आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 10 मांडतो.

**तालिका सभापती** :विधेयक मांडण्यात आले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO. XI OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT, 1950.)**

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, सन 2005 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 11. मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम,1950 मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदया,मी आपला अधिक वेळ घेत नाही. ज्यावेळी हे विधेयक खंडश: विचारार्थ येईल त्यावेळी मी सविस्तरपणे बोलेन.सभापती महोदया, शासनाच्या सगळया सवलती घेऊन, लिलावती रुग्णालयामध्ये कशा प्रकारे शासनाच्या आणि कायद्याच्या सगळया बाबी धुडकावून लावून मनमानी कारभार करण्यात येतो यासंबंधात आजच सकाळी एका लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे उत्तर देण्यात आलेले आहे. म्हणून मी या विधेयकाच्या माध्यमातून कलम 41 मधील पोटकलम (4)क मध्ये पूर्वी केवळ पंधरा हजार रुपयांची आर्थिक मर्यादा होती ती आर्थिक मर्यादा 50 हजार रुपये करावी असे म्हटले आहे. तसेच जर त्यांनी कुठल्या अटी पाळल्या नाहीत, दहा टक्के रुग्णांना मोफत रुग्ण सेवा दिली नाही तर दोन हजार रुपये दंडात्मक कारवाईची तरतूद आहे ती दोन लाख रुपये करण्यात यावी, अशा त-हेची तरतूद करण्यासाठी मी हे विधेयक या ठिकाणी मांडलेले आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, ज्यावेळी हे विधेय चर्चेला येईल त्यावेळी शासनाच्या वतीने याचा विचार करुन त्याचा स्वीकार करण्यात येईल. धन्यवाद.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** :अनुमती देण्यात आली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 11 मांडतो.

**तालिका सभापती** :विधेयक मांडण्यात आले आहे.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिषक व शल्यचिकित्सक (दिवाणी व फौजदारी खटल्यांपासून मुक्त ठेवणे) विधेयक.

**L.C. BILL NO.XII OF 2005.**

**(A BILL TO PROVIDE FOR CIVIL AND CRIMINAL IMMUNITY TO PHYSICIANS AND SURGEONS WITHDRAWING LIFE SUSTAINING TREATMENT FROM PATIENTS SUFFERING FROM TERMINAL ILLNESS.)**

डॉ. दीपक सावंत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 12- मृत्यूपर्यवसायी आजाराने ग्रस्त असलेल्या माणसांना जिवंत ठेवण्यासाठी करावयाचे औषधोपचार बंद करण्याबाबत भिषक व शल्यचिकित्सक यांना दिवाणी व फौजदारी खटल्यांपासून मुक्त ठेवण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदया, वैद्यक शास्त्रामध्ये माणसाला येनकेन प्रकारे जिवंत कसे ठेवता येईल यासाठी काही प्रगत उपचार पध्दती आलेल्या आहेत. परंतु ज्या रुग्णाचा मेंदू काम करीत नाही, मेंदू डेड झालेला आहे , ज्याला डेड ब्रेनसिल म्हणतो अशा लोकांसाठी, त्यांना यातना सहन कराव्या लागू नयेत आणि ठराविक काळापर्यन्त त्यांनी औषधोपचाराला प्रतिसाद दिला नाही, काही लोक सहा महिने, आठ महिने औषधोपचाराला प्रतिसाद देत नाहीत, काही लोक सहा ते आठ वर्षे बेडवर मरणप्राय अवस्थेमध्ये असतात, त्यांचा मेंदू काम करीत नाही, अशा लोकांना शांत मरण या विधेयकाव्दारे प्रस्तावित करीत आहे. त्यामुळे जे कोणी भिषक किंवा शल्यचिकित्सक उपचार करीत असतील त्यांना दिवाणी व फौजदारी खटल्यांपासून मुक्त ठेवता येईल आणि ते या कायद्याचा अतिरेक सुध्दा करणार नाहीत यादृष्टीने मी हे विधेयक मांडत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 12 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

**पृ. शी.** : गुंठेवारी विकास ( नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण ) ( सुधारणा ) विधेय□

**L.C. BILL NO.XII OF 2003.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GUNTHEWARI DEVELOPMENTS (REGULATION, UPGRADATION AND CONTROL) ACT,2001.)**

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, स□2003 चे वि. प. वि. □मां□ 12 महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण करणे ) अधिनियम, 2001 मध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घे□ात यावे असा मी आपल्या अ□मती□प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, हे महत्वाचे अशासकीय विधेयक मी सदनाच्या विचारार्थ मांडलेले आहे. महाराष्ट्राच्या विधिमंडळाने सन 2001 साली महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण करणे ) अधिनियम, 2001 संमत केले. या कायद्यातील काही जाचक तरतुदी रद्द कराव्यात, त्या बदलाव्यात यासाठी हे विधेयक सभागृहासमोर मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील....

2001 साली महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये गुंठेवारी नियमित करण्याचा कायदा संमत झाला. गुंठेवारी विकास कायद्यानुसार बेकायदेशीर जमिनीचा वापर आपल्या राज्यात वर्षानुवर्षे सुरु आहे. शासनाने 2001 साली विधेयक आणले होते त्या विधेयकाच्या प्रस्तावामध्ये हे मान्य करण्यात आले होते की, गेल्या अनेक वर्षापासून ही गुंठेवारी विकास सुरु आहे. तो बेकायदेशीर असला तरी देखील मोठया प्रमाणावर अशा स्वरुपाची बांधकामे झालेली असल्यामुळे ती जुनी व दीर्घकालीन आहेत, ती पाडता येणार नाहीत आणि तिचा दर्जा व किंमत समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक अनिवार्य खर्च पूर्ण करण्यास अपयशी ठरली असल्यामुळे शासनाने याठिकाणी हे मान्य केलेले आहे. गोरगरीब लोकांना घरे बांधण्यासाठी रितसर भूखंड उपलब्ध होत नसल्यामुळे अशा बेकायदेशीर भूखंडावर घरे बांधण्याचा प्रयोग केला आणि तो यशस्वी झाला व अनेक वर्षे सुरु आहे. मी असे सांगू इच्छितो की, ही गुंठेवारी बेकायदेशीर असली तरी देखील गुंठेवारी विकासक किंवा भूखंड विकत घेणारा जबाबदार आहे त्याच्यापेक्षा शासन जास्त जबाबदार आहे. अन्न, वस्त्र व निवारा पुरविण्याची कोणत्याही राज्यसरकारची जबाबदारी असते. लोकांच्या निवा-याची गरज भागविण्याची जबाबदारी शासनाने पार न पाडल्यामुळे अशा स्वरुपाच्या बेकायदेशीर गुंठेवारी वसाहती निर्माण झाल्या. ब्रिटिशांनी दर 10 वर्षांनी गावठाण विस्ताराची योजना राबविण्याचा प्रघात सुरु केला होता. या पाठीमागे होतू असा होता की, दर 10 वर्षांनी ज्यांना निवा-याची गरज आहे अशी पिढी तयार करावी आणि तयार झालेल्या पिढीची निवा-याची शासनाने जबाबदारी घेऊन प्रत्येक गावठाणामध्ये निवा-याची योजना राबवावयाची स्वातंत्र्य काळानंतर ही पध्दत बंद पडली आणि त्यानंतर वाढलेल्या लोकसंख्येची निवा-याची व्यवस्था शासन करु शकले नाही म्हणून त्या नागरिकांना स्वत:चा निवारा करुन घेण्याची पाळी आली. शासन या गुंठेवारी विकासास जबाबदार आहे असे मी मानतो. याचे दुसरे कारण असे की, शेत जमिनीचे बिगर शेतीमध्ये रुपांतर करण्याची पध्दत क्लीष्ट, गुंतागुंतीची, वेळ खाऊ अशा स्वरुपाची असल्यामुळे शासनाच्या नियमाच्या जंजाळात अडकल्यानंतर शेतक-याला किंवा विकासकाला आपली जमीन बिगर शेती करण्यासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते आणि त्या अडचणींना तोंड देण्यापक्षा जमिनीचा गुंठा करुन तो

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

प्रा.शरद पाटील....

गुंठा विकला तर त्यातून ताबडतोब पैसे मिळतील व गरजू लोकांना स्वस्त दरामध्ये भूखंड मिळेल त्यामुळे जमीन विकणारा आणि ज्यांना घराची गरज आहे अशा दोघांमध्ये व्यवहार होण्यास सुरुवात झाली. असे व्यवहार सुरु झाल्यानंतर शासनाने या व्यवहाराला पायबंद घालावयास पाहिजे होता परंतु ते घडले नाही. कोणत्याही जमिनीची खरेदी विक्री होत असताना निबंधकाकडे त्याची रितसर नोंद केली जाते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. शरद पाटील पुढे सुरु...)

ही नोंद झाल्यानंतर गावचावडीला नोंद होते, गुंठेवारधारीकाला 7/12चा उतरा मिळतो. गुंठेवारी भूखंडावर घर बांधल्यानंतर त्या घराची नोंद नगरपालिका किंवा ग्रामपंचायत आपल्या असेसमेंटला करते. त्यामुळे हे संपूर्ण व्यवहार कायदेशीर असावेत अशी गुंठेवारीधारकाची समजूत होती. त्यामुळे हे व्यवहार वर्षानुवर्षे चालत राहिले. परिणामी अस्ताव्यस्थ वसाहती गावाच्या आणि शहराच्या अवतीभोवती उभ्या राहिल्या. याकडे शासन यंत्रणेने कोणत्याही प्रकारे लक्ष दिले नाही, या प्रकाराला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला नाही. शासनाने निव-याची व्यवस्था केली नाही. उलट शेतजमीन बिगर शेती करण्याचे नियम क्लिष्ट आणि जाचक असे करुन ठेवले. हा जो विनापरवाना व्यवहार सुरु होता त्याला पायबंद घालण्याचा प्रयत्न शासनाने केला नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या गुंठेवारी वसाहती राज्याच्या सर्व शहरीभागामध्ये आणि गावामध्ये निर्माण झाल्या आहेत. या वसाहती निर्माण झाल्यानंतर जेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांनी, विशेषत: सांगली आणि कोल्हापूर स्थानिक स्वराज्य संस्थांनी अशा बेकायदेशीर वसाहतींना पाणी, वीज, रस्ते अशा सुविधा देण्यास नकार दिला त्यावेळी गुंठेवारीधारकामध्ये असंतोष निर्माण झाला आणि त्यांनी आपल्या वसाहती नियमित करण्यासाठी मागणी करायला सुरुवात केली. सांगली शहरामध्ये फार मोठ्या प्रमाणावर हा प्रश्न निर्माण झाला. या प्रश्नाच्या बाबतीत सांगलीतील गुंठेवारीधारकांनी अनेक आंदोलने केली, मोर्चे काढले. कोल्हापूर शहरामध्ये देखील हा प्रश्न तीव्र बनला. ही आंदोलने झाल्यानंतर लोकप्रतिनिधींनी देखील गुंठेवारी नियमित करण्यासंबंधी कायदा करु अशा प्रकारचे आश्वासन दिले. वास्तविक पाहता हा कायदा करण्याचीच मुळात आवश्यकता नव्हती. महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोड 1966 आणि महाराष्ट्र रिजनल ॲण्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट 1966मध्ये जमिनीच्या बेकायदेशीर अकृषिक वापरासंबंधी करावयाची दंडात्मक कारवाई आणि नियमितीकरणाची प्रक्रिया देखील दिलेली आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966मध्ये देखील यासंबंधी तरतुदी आहेत. महाराष्ट्र रिजनल ॲण्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट 1966 आणि महाराष्ट्र जमीन महसूल ॲक्ट 1966 या दोन्ही कायद्याच्या आधारे या बेकायदेशीर वसाहती नियमित करता येतात. असे असतानाही शासनाने नवीन कायदा करण्याचा घाट घातलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. शरद पाटील पुढे सुरु...)

दुसरे असे की, जमीन ही बाब महसूल विभागाच्या अखत्यारित येते. त्यामुळे यासंदर्भात कायदा करण्याची जबाबदारी ही महसूल विभागाची आहे. असे असताना यासंदर्भात कायदा करण्याची जबाबदारी ही नगरविकास विभागाकडे सोपविलेली आहे. नगरविकास खात्याने जो कायदा तयार केलेला आहे त्या कायद्याला नियमितीकरण कशासाठी म्हणावयाचे असा प्रश्न पडतो. ज्यावेळी हा कायदा तयार झाला त्यावेळी, नगररचनेच्या नियमाप्रमाणे शेत जमीन बिगर शेती करण्यासाठी ज्या ज्या अटींचे आणि नियमांचे पालन करावे लागते त्या सर्व अटी आणि नियम या कायद्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्यामुळे या कायद्याला नियमितीकरण कायदा कशासाठी म्हणावयाचे असा प्रश्न निर्माण होतो. नियमांचा भंग झाला असेल तर तो भंग क्षमापित करण्यासाठी नियमितीकरण करावयाचे असते. या कायद्यामध्ये ज्या तरतुदी घालण्यात आल्या त्या तरतुदी, एखाद्या शेतक-याने स्वत:ची शेतजमीन बिगर शेती करण्यासाठी अर्ज केल्यानंतर ज्या तरतुदी लावण्यात येतात त्या सर्व तरतुदी त्या कायद्यात समाविष्ट केलेल्या आहेत. उदा. 10 टक्के जागा मोकळी सोडली पाहिजे. गुंठेवारीचा कायदा करणा-यांना गुंठेवारी वसाहती कशा असतात हेच माहीत नाही हे यावरुन दिसून येते. कारण आपली जमीन गुंठेवारीने विकणारा शेतकरी किंवा विकासक सहसा मोकळी जागा शिल्लक ठेवत नाही. त्याची 1 एकर जमीन असेल तर सर्वच्या सर्व 40 गुंठे जमीन तो विकतो आणि प्लॉट एकमेकासमोर येतील अशा पध्दतीने त्या जमिनीचे 40 तुकडे पाडतो.

..नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 15:40

श्री. शरद पाटील...

समोरच्या प्लॉट धारकाने अडीच फूट रस्ता सोडावयाचा आणि इकडच्याने अडीच फूट रस्ता सोडावयाचा. अशा त-हेने पाच फुटाचा रस्ता त्यानीच स्वत: त्या ठिकाणी निर्माण करावयाचा. अशा त-हेने गुंठेवारी निरनिराळया ठिकाणी मोठया प्रमाणात झालेली आहे. त्यामुळे 10 टक्के खूला भूखंड उपलब्ध कसा होणार हा मोठा प्रश्न आहे ? म्हणून 10 टक्के खूला भूखंड शासनाला गुंठेवारी वसाहतीत मिळाला पाहिजे ही जी अट घालण्यात आली आहे ती काढून टाकावी अशी माझी मागणी आहे. मुळात गुंठेवारी निर्मितीकरणाचा अर्ज ज्याने गुंठयाने जागा घेतलेली आहे त्याने करावयाचा आहे. जमीन मालक जो असतो, त्या मालकाने गुंठेवारी जमीन विकलेली असते. पैसे घेऊन तो गेलेला असतो आणि निर्मितीकरणासाठी त्याने अर्ज करावा असे अभिप्रेत नाही. 10 टक्के खूला भूखंड शासनाला उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे या कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे, ती तरतूद रद्द करावी अशी माझी मागणी आहे. दुसरे असे की, रस्त्यांच्या संबंधीची तरतूद आहे ती देखील अत्यंत जाचक आणि अव्यवहार्य आहे. महापालिका क्षेत्रामध्ये म्हणजचे "अ" वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये 9 मिटर रुंदीचे रस्ते असले पाहिजे अशी आपली अट आहे. 9 मिटर रुंदीचे रस्ते ठेवले तर तर तेथे वस्तीच शिल्लक रहाणार नाही. त्यामुळे 9 मिटर रस्ते रुंद ठेवण्याची अट ही रद्द करावी. नगरपालिका क्षेत्रामध्ये आणि इतर क्षेत्रामध्ये रस्त्यांची रुंदी साडेचार मिटर असावी अशी तरतूद आहे. माझी मागणी अशी आहे की, रस्त्याच्या रुंदीची अट रद्द करुन तीन मिटर रुंदीचे रस्ते असावेत अशा स्वरुपाचा बदल त्यामध्ये करावा अशी माझी मागणी आहे. या वसाहतीमध्ये फायर फायटर आणि अँब्युलन्स जाऊ-येऊ शकेल इतक्या रुंदीचे रस्ते ठेवणे आवश्यक आहे. त्यापेक्षा अधिक रुंदीचे रस्ते ठेवले तर गुंठेवारी वसाहतीच नष्ट होतील. कारण त्या ठिकाणी एवढया दाटीदाटीने घरे बांधलेली असतात. त्या ठिकाणी अतिशय कमी जागा असते. एवढया रुंदीचे रस्ते ठेवून वसाहत शिल्लक रहाणार नाही म्हणून ही देखील तरतूद रद्द करावी अशी या ठिकाणी मी मागणी करतो. गुंठेवारी निर्मितीकरण कोणकोणत्या भागामध्ये होईल, कोणकोणत्या भागामध्ये होणार नाही याची यादी या ठिकाणी दिलेली आहे. आरक्षणाखाली असलेले भूखंड, जेथे नागरी सुविधा पुरविणे अशक्य आहे असे भूखंड, आणि ज्या वसाहती शासनाच्या निरनिराळया योजना समाविष्ठ असलेल्या जमिनी आहेत अशा प्रकारच्या वसाहती नियमित होणार नाहीत अशी तरतूद आहे. मी या ठिकाणी सूचवू इच्छितो की, आरक्षणातील भूखंडावर गुंठेवारी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद पाटील..

उभी राहिलेली असली तरी देखील त्या आरक्षणाची व्यवस्था दुसरीकडे करुन त्या वसाहती नियमित कराव्यात. गुंठेवारी वसाहतीचे निर्मितीकरण करण्यासाठी गुंठेवारी धारकांना अर्जासोबत प्रशमन शुल्क म्हणजे विकास शुल्क भरण्याची अट आहे. एखाद्या नॅशनलाईज बँकेचा डिमांड ड्राफ्ट काढावा आणि त्या अर्जासोबत जो द्यावा अशा स्वरुपाची जी अट आहे ती देखील रद्द करावी. गुंठेवारीधारकाने वर्षानुवर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांना कर भरलेला आहे आणि ते कर भरता आहेत. या वसाहतीमध्ये राहणारे नागरिक सामान्यपणे अत्यंत गरीब कुटुंबातील असल्यामुळे त्यांच्यावर प्रशमन शुल्काचा,विकास शुल्काचा बोजा टाकणे योग्य होणार नाही. त्याच बरोबर या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे महसूल खात्याकडून देखील अकृषीक आकार म्हणजेच दंडात्मक आकारणी होणार असल्यामुळे अशा प्रकारची दुहेरी दंडात्मक आकारणी या गुंठेवारी धारकांकडून करण्यात येऊ नये अशीही माझी मागणी आहे. त्यामुळे विकास शुल्क आणि प्रशमन शुल्क रद्द करावे. आणि महसूल खात्याकडून वसूल करण्यात येणारी दंडाची आणि अकृषीक आकारणीची रक्कम त्यांच्याकडून वसूल करुन त्यांच्या गुंठेवारीचे बांधकाम नियमित करावे अशीही मागणी मी या निमित्ताने करतो...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 15:45

प्रा. शरद पाटील .....

त्याचप्रमाणे याठिकाणी या एकूणच गुंठेवारीच्या प्रश्नासंबंधी महाराष्ट्र शासनाकडे अनेक तक्रारी आल्या. निरनिराळया महापालिका क्षेत्रामध्ये या गुंठेवारी नियमितीकरणाचा कायदा राबविण्याचा प्रयत्न झाला. प्रामुख्याने आपल्या राज्यात काही महानगरपालिकांनीच हा कायदा राबविण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक पाहता मुंबई सोडून सर्व महाराष्ट्रासाठी हा कायदा आहे. काही महापालिका सोडून इतरत्र या कायद्याची अंमलबजावणी सुरु झालेली नाही. कारण ती अव्यवहार्यच आहे. या कायद्यातील तरतुदी दुरुस्त केल्याशिवाय हा कायदा व्यवस्थितरित्या अंमलात येऊ शकणार नाही. या वसाहती मोठया प्रमाणावर शहरामध्ये पसरलेल्या आहेत त्यांचे नियमितीकरण होऊ शकणार नाही म्हणून यामध्ये दुरुस्त्या सुचवीत आहेत त्या मान्य कराव्यात. मुख्यमंत्री महोदयांनी 2002 साली निरनिराळया महापालिका आयुक्तांची बैठक घेतली होती त्या बैठकीमध्ये देखील आयुक्तांनी हा कायदा राबविण्यामध्ये ज्या अडचणी येतात त्या बैठकीच्या वेळी नमूद केल्या होत्या. त्यापैकी एक-दोन मासलेवाईक उदाहरणे मी सांगू इच्छितो. पुणे महानगरपालिका आयुक्तांनी असे सांगितले की,अधिनियमातील तरतुदीनुसार 10 टक्के विकला न गेलेला व बांधकाम न केलेला भूखंड मनपाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. तथापि सदर भूखंड विकला गेला असल्यामुळे उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच अधिनियमातील 10 टक्के तरतुदीनुसार खुली जागा सोडणे आवश्यक आहे. काही ठिकाणी खुली जागा ठेवलेली नाही. अधिनियमान्वये रस्त्याची रुंदी 9 मिटर ठेवणे आवश्यक आहे तथापि बांधकामे पूर्वीची असल्यामुळे रस्त्यासाठी 9 मिटर एवढी जागा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे रस्त्यासाठी 15 फूट एवढी रुंदी ठेवल्यास सोईस्कर होईल. भूखंड धारकांनी लेआऊट तयार करुन मनपाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर विकास शुल्क व प्रशमन शुल्क मिळून होणारी रक्कम जास्त असल्यामुळे अधिनियमाच्या अंमलबजावणीस नागरिकांचा प्रतिसाद मिळत नाही. सोलापूर महानगरपालिका आयुक्तांनी त्याचप्रमाणे सूचना केलेल्या आहेत. सांगली मिरज कूपवाड महानगरपालिका आयुक्तांनी सांगितले की या क्षेत्रातील सुमारे 21795 बांधकामे नियमित करणे शक्य आहे. अंमलबजावणीबाबत जाहिराती दिल्या असून आतापर्यंत 9300 अर्ज आले आहेत त्यापैकी 126 बांधकामे नियमित करण्यात आली आहेत. रस्त्याची रुंदी 10 टक्के रिकामे भूखंड हस्तांतरित करणे याबाबत अडचणी येत आहेत. महानगरपालिकेने बांधकाम नियमित केल्यानंतर सदर बांधकाम आपोआपच अकृषीक परवाना मिळणे आवश्यक आहे असे सांगलीच्या

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 15:45

प्रा. शरद पाटील...

आयुक्तांनी कळविले आहे. अशा या सगळया अडचणी त्यांनी नमूद केलेल्या आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेच्या आयुक्तांनी अंमलबजावणीमध्ये इतर महानगरपालिकांनी नमूद केल्याप्रमाणे अडचणी येत आहेत असे कळविले आहे. कालच मला एक माहिती मिळाली. औरंगाबाद महापालिकेची निवडूक होत आहे. मा. मुख्यमंत्री त्या निवडणुकीच्या प्रचारासाठी औरंगाबाद येथे गेले असताना त्यांनी गुंठेवारी धारकांना असे आश्वासन दिले आहे की,गुंठेवारी वसाहती नियमित करु. कायदा बाजूला ठेवून देखील या वसाहती नियमित करण्यात येतील अशा प्रकारचे आश्वासन दिलेले आहे. सर्व महानगरपालिकांमध्ये या कायद्याची अंमलबजावणी करण्यात अडचणी येत आहेत.आलेल्या अर्जांची संख्या देखील अत्यंत अल्प आहे आणि नियमितीकरण झालेल्या अर्जांची संख्या देखील अत्यल्प आहे. या सगळया बाबींचा विचार करुन शासनाने यातील जाचक अटी काढून टाकल्या आणि नियमितीकरणाची प्रक्रिया सुलभ केली तरच या वसाहतींचे नियमितीकरण होऊ शकेल. आपण 1 जानेवारी 2001 पर्यंत कट ऑफ डेट दिलेली आहे. यानंतर झालेले भूखंड नियमित करता येणार नाहीत. किंबहुना 1 जानेवारी 2001 नंतर अशा प्रकारच्या गुंठेवारी वसाहती विकसित झाल्या तर त्या त्या ठिकाणचे क्षेत्रीय अधिकारी जबाबदार असतील असे नमूद केलेले आहे. नम्रपणाने मी सांगू इच्छितो की,आजही गुंठेवारी सुरु आहे. याची नोंद होत नाही. वेगळया त-हेने करार करुन गुंठयांनी जमिनी घेत आहेत,विकत आहेत आणि त्याच्यावर घरे देखील बांधली जात आहेत.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील ..

तेव्हा हा गुंठेवारीचा बेकायदेशीर विकास थांबवावयाचा असेल तर शासनाने काही तरतुदी केल्या पाहिजेत तसेच धोरणामध्ये काही बदल करावयास पाहिजे. या कायद्यामध्ये ज्या जाचक तरतुदी आहेत त्या बदलण्यात आल्या पाहिजेत.तसेच जमीन बिगर शेती करण्यांसंबंधीची आपली जी पध्दत आहे ती सोपी व सुटसुटीत करण्यात आली पाहिजे.त्या शिवाय ब्रिटीशाप्रमाणे आपण सुध्दा प्रत्येक गावाची आणि प्रत्येक शहराची विस्तारीकरणाची तसेच गावठाण वाढीची योजना तयार करुन ती राबविण्याची व्यवस्था करावयास पाहिजे. आपण जर अशा प्रकारची योजना तयार केली तरच गुंठेवारी नाहीशी होईल अन्यथा वर्षानुवर्षे गुंठेवारीच्या वसाहती होत राहतील आणि आपण कितीही कायदे केले तरी त्या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होणार नाही आणि शहरांचा अस्तव्यस्त विकास होत राहील.तेव्हा अशा प्रकारे शहराचा अस्ताव्यस्त विकास होऊ नये असे जर आपल्याला वाटत असेल तर गुंठेवारी का झाली याचा शासनाने प्रथम शोध घ्यावा. ती कारणे दूर करुन या पुढे गुंठेवारी होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशी मी विनती करतो. या अशा ाकीय विधेयकाच्या निमित्ताने मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत आणि जे काही बदल सुचविलेले आहेत त्याचा विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला

------

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ( विधान सभेने निवडलेल्या ) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी या ठिकाणी सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 12 - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण ) ( सुधारणा ) विधेयक मांडलेले आहे. त्या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी व त्या निमित्ताने शासनाला काही सुधारणा करण्यासाठी मी येथे उभी आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी अतिशय चांगल्या सूचना या विधेयकाच्या निमित्ताने शासनाला केलेल्या आहेत.नगरपालिका किंवा महानगरपालिका इत्यादी ठिकाणी शहरांचा मोठा विस्तार होत असतो.या शहरांच्या आसपास ज्या जमिनी असतात त्या ठिकाणी अनेक गरजू लोकांना घरांची आवश्यकता असते.ही घरे बांधत असतांना त्यांना एक दोन गुंठे जमिनीची आवश्यकता असते.नियमाने त्यांना ही जमीन घेता येत नाही किंवा त्यांना घरे बांधता येत नाहीत.परंतु हे लोक त्याच भागात व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांना तेथेच रहावयाचे असते. कायद्यात अनेक पळवाटा आहेत. कायद्याने असे करता येत नाही परंतु बेकायदेशीरपणे गुंठेवारी चालूच आहे. त्या पळवाटा शोधून काढून जमिनीचे मालक त्यांच्या कडील जमिनीचे तुकडे पाडत असतात व त्यांना घरे बांधण्यास परवानगी दिली जाते.त्याप्रमाणे एक दोन गुंठे जमीन घेऊन ती व्यक्ती घर बांधत असते. एकदा घर बांधल्यानंतर जमिनीचा मालक असे म्हणतो की आता माझा काहीही सबंध राहिलेला नाही. त्यामुळे या जमिनीचे नियमितीकरण होत नाही आणि या. त्यांच्यासमोर नियमितीकरणाची समस्या निर्माण होत असते.यामध्ये ज्या काही जाचक अटी आहेत त्या त्वरित काढून टाकल्या पाहिजेत असे मला सांगावयाचे आहे.मुंबई शहरामध्ये सुध्दा अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणावर होत आहेत. मुंबईमध्ये शाळा किंवा महाविद्यालये यांच्यासाठी मोठे प्लॉटस आरक्षित करण्यात आलेले आहेत. मी पूर्व उपनगरात चेंबूर येथे राहत असल्यामुळे मला त्यासंबंधीची माहिती आहे.चेंबूर ते मानखूर्द या भागात अनेक प्लॉटस शाळा व महाविद्यालयांसाठी आरक्षित करण्यात आलेले आहेत परंतु त्या प्लॉटसवर अनधिकृत झोपडपट्टया उभ्या राहिल्या असून त्यानंतर त्या अधिकृत झाल्या आहेत.काही ठिकाणी आवश्यकता असेल तर जमिनीचे नियमितीकरण करण्यासंबंधीचे नियम बदलण्यात आले पाहिजे आणि नियमितीकरण करण्यात आले पाहिजे. रस्त्याच्या बाबतीत अशी अट घालण्यात आली आहे की , 9 मिटर्स रुंद रस्ता असला पाहिजे परंतु ते अशक्य आहे.तेव्हा शासनाने हा नियम सुध्दा शिथिल करावयास पाहिजे. दोन किवा तीन मिटर्स

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे..

किंवा पंधरा फूट रुंदीचा हा रस्ता असला पाहिजे असा बदल आपण नियमामध्ये करावा असे मला सांगावयाचे आहे.महसूल विभागाकडून दंडात्मक कारवाई सुध्दा होण्याची शक्यता असते तेव्हा ती कारवाई करता कामा नये.मोठ मोठया शहराच्या आसपास काही लोकांनी फार्म हाऊससाठी जमिनी दिल्या आहेत. मुंबईच्या आसपास कर्जत किंवा शहापूर या ठिकाणी अनेक जमीनदारांनी आपल्या जमिनी फार्म हाऊससाठी विकून टाकल्या आहेत.त्या ठिकाणी फार्म हाऊस तयार झालेले आहेत. एक किंवा दोन एकर जमिनीवर फार्म हाऊस तयार झालेले आहेत. त्यामुळे तेथे प्रश्न येत नाही परंतु जे गरीब लोक आहेत आणि ज्यांनी कमी क्षेत्रावर फार्म हाऊस केलेले आहेत ते या जाचक अटीमुळे भरडले जात आहेत. त्यांना जाचक अटीपासून सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला पाहिजे.त्याचबरोबर हे नियम शिथिल करण्यात आले पाहिजेत आणि एक दोन गुंठयावर त्यांची जी घरे आहेत त्यांचे नियमितीकरण करण्यात यावे. अशी मी विनंती करुन माझे भाषण संपविते.

----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील आणि सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी एका अतिशय महत्त्वाच्या अशा अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून आपले विचार येथे व्यक्त केलेले आहेत. सभापती महोदया, गंठेवारी पध्दत कशामुळे आली, कशसामुळे आजही ती चालू आहे याच्या खोलामध्ये आपण गेलो तर आपल्याला समजून येईल की, अलिकडच्या काळामध्ये नागरीकरण झपाट्याने वाढत आहे आणि लोकांना पटकन घर कसे निर्माण करता येईल, जास्त त्रासाला सामोरे न जाता घर कसे करता येईल या दृष्टीकोनातून, या प्रवृत्तीतून गुंठेवारी वाढते आहे. जुन्या काळामध्ये प्रामुख्याने यूएलसीच्या जमिनी होत्या त्या वाचविण्याच्या दृष्टीनेसुध्दा काही शहरांमध्ये ज्या सरप्लस जमिनी आहेत त्यावर गुंठेवारी करण्याचा प्रयत्न लोकांनी केला. गुंठेवारीमध्ये कोठेही लेआऊट करण्याचा प्रश्न नाही. ज्या काही शास्त्रशुद्ध पध्दतीमध्ये, एमआरटीपी ॲक्ट नुसार रस्ते वगैरे सोडण्याचीही गरज नाही आणि एन.ए.च्या जाचक अटी.. ज्या बाबत सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांनी सांगितले. खरे म्हणजे या अटींपासून पळ काएण्यासाठीच या गुंठेवारी पध्दतीने लोक विकास करीत गेले. अध्यक्ष महाराज, या सगळ्या परिस्थितीवर अभ्यास करून शासनाने 2001 ला हा कायदा अस्तित्वात आणला. यामध्ये हे सगळे नियमित करण्याच्या दृष्टीकोनातून या कायद्याच्या अनुषंगाने अनेक तरतुदी, प्रामुख्याने 10 टक्के जागा. .. 1.1.2001 ला सोडलेली नसेल, बांधकाम केलेले असेल किंवा सोडलेली जागा विकलेली असेल तर 10 टक्केची अट बंधनकारक नाही. एमआरटीपी नुसार एफएसआयची देखील महत्त्वाची अट असते. परंतु या एफएसआय मध्ये देखील सवलत या कायद्यानुसार देण्यात आलेली आहे. एन.ए.चा उल्लेख येथे केलेला आहे. ज्यावेळेस गुंठेवारी कायदा आणला तो डीम आहे असे समजले जाते. जर काहीही आरक्षण असेल तर ते वगळण्यात येऊन या कायद्यानुसार आपोआप ते नियमित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारचा हा कायदा आपण केलेला आहे. यामध्ये काही सूचना सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या माध्यमातून येथे आणल्या आहेत. त्यातील पहिली सूचना म्हणजे कट ऑफ डेट नको. पण ही कट ऑफ डेट नसेल तर उलट अधिक गैरफायदा घेतला जाणार आहे. अमुक तारखेच्या अगोदरचे जे काही भूखंड असतील ते नियमित केले जातील असे आपण केले आहे. शेवटी शहराचा वा नगरांचा विकास हा शास्त्रशुद्ध पध्दतीनेच व्हायला पाहिजे, नियोजनानुसार, नियोजित असाच असला पाहिजे आणि त्यासाठीच कट ऑफ डेट ठेवलेली आहे. ही कट ऑफ डेट ठेवली नाही तर हे वाढत जाईल आणि त्याला कोठेही लगाम वा मर्यादा असणार नाही. ... ( यानंतर श्री.जागडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

माननीय सदस्यांनी 10 टक्क्याचे बंधन घालू नये असे म्हटले आहे. दि.1.1 च्या अगोदर ज्यांनी 10 टक्के जागा वापरली असेल, त्यांना बंधनकारक नाही. परंतु ज्यांनी वापरली नसेल त्यांना हे बंधनकारक आहे. रोड आणि सामाईक अंतर याचा उल्लेख माननीय सदस्यांनी केला आहे. ड्रेनेज लाईन, इलेक्ट्रिक लाईन, पाण्याची लाईन यासाठी सामाईक अंतर आवश्यक आहे. माननीय सदस्य रोडचे अंतर कमी करा, असे म्हणत आहे. परंतु ते शक्य नाही. डेव्हलपमेंट चार्जेस तसेच कंपाऊंड चार्जेस घेऊ नयेत, असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. गुंठेवारीचा विकास करण्यासाठी हे चार्जेस घेण्यात येतात. आज नगरपालिकांची परिस्थिती काय आहे ? सर्व प्रकारच्या नागरी सुविधा नगरपालिकेने पुरविल्या पाहिजेत, अशी लोकांची अपेक्षा असते. परंतु या सुविधा पुरविण्याची नगरपालिकेची परिस्थिती चांगली नाही. सभापती महोदया, डेव्हलपमेंट चार्ज ज्या ठिकाणाहून वसूल करण्यात आला आहे, त्याच ठिकाणी तो वापरला पाहिजे. दुसरीकडे तो वापरता येणार नाही. म्हणून गुंठेवारीच्या विकासाच्या दृष्टीकोनातून डेव्हलपमेंट चार्ज आणि कंपाऊंड चार्ज असणे आवश्यक आहे. हे चार्जेस जर रद्द केले तर नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईस येईल. कोणत्याही प्रकारचा विकास नगरपालिकेला करता येणार नाही. शास्त्रशुध्द विकास करण्यामध्ये नगरपालिकेला अडचण येणार आहे. माननीय सदस्यांनी बोलत असताना पुणे आणि इतर भागातील उदाहरणे दिली आहेत. माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत, त्यावर निश्चितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदया, एन. ए. करण्यासाठी 27 कागदपत्रांची आवश्यकता असते. त्यामुळे कोणताही शेतकरी आपली शेती एन.ए. करीत नाही, तसा प्रयत्न करीत नाही. म्हणून यामध्ये योग्य तो बदल करण्याचा शासन प्रयत्न करील. सभापती महोदय, या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना ज्या अडचणी असतात त्याचा उहापोह माननीय सदस्यांनी केला आहे. एमएमआरडीएला सुध्दा हा कायदा लागू करावा, असे त्यांनी म्हटले आहे. एमएमआरडीएमध्ये ठाणे आणि रायगड जिल्हा येत आहे. या ठिकाणी गुंठेवारी कायदा लागू करण्याचा प्रयत्न केला तर अगोदरच दाटीवाटीच्या जमीन असणा-या ठिकाणी अडचणी निर्माण होणार आहेत. त्यामुळे एमएमआरडीएच्या परिसरात हा कायदा लागू होणार नाही.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे..

परंतु या निमित्ताने सभागृहाला एवढे सांगतो की, निश्चितपणे या संबंधीचा आढावा घेणे आवश्यक आहे. 2001 मध्ये कायदा लागू झाला परंतु त्या कायद्यान्वये आज खऱ्या अर्थाने काय अडचणी आहेत याचा जरुर आढावा घेतला पाहिजे. मधल्या काळात मा. मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला, त्या अनुषंगाने काही शिथिलता कायद्यात आणण्यासाठी नवीन सर्क्युलर नगर विकास विभागाच्या माध्यमातून दिले आहे. त्यामध्ये निश्चित प्रकारचा आढावा घेतला जाईल. काही अडचणी आहेत त्या सोडविण्यासाठी गरज पडलीतर पुढे विधेयक आणण्यात येईल. व त्यामुळे आपण ज्या सूचना केल्या आहेत त्या बाबत आपल्याला समाधानकारक सांगण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हा मा. सदस्यांनी आपले विधेयक मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी विनंती केल्याप्रमाणे मी विधेयक मागे घेण्यास तयार आहे. तथापि, प्रत्यक्षात या कायद्यामध्ये अडचणी आहेत, त्यामध्ये जाचक तरतुदी आहेत त्या संबंधी शासनाने स्वत: आढावा घेऊन महाराष्ट्रात ज्या ज्या नगरपालिका व महानगरपालिकांनी या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला आहे त्या महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रामध्ये या कायद्याची अंमलबजावणी करतांना कोणत्या अडचणी आल्या त्याचा देखील विचार करावा. त्याचप्रमाणे या जाचक अटी आहेत त्या रद्द करण्यासंबंधी महानगरपालिका व नगरपालिकांचे मुख्याधिकारी आयुक्तांची बैठक घ्यावी आणि त्या संबधी लोक प्रतिनिधींची देखील बैठक घेऊन त्यांच्या सूचना विचारात घ्याव्यात अशी विनंती आपल्या माध्यमातून मंत्रिमहोदयांना करतो. सभापती महोदय, मला हे विधेयक परत घेण्यासाठी सभागृहाची अनुमती द्यावी.

विधेयक सभागृहाच्या अनुमतीने परत घेण्यात आले.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनासंबंधी.

श्री. मधुकर सरपोतदार: सभापती महोदया, संध्याकाळचे 4 वाजत आले आहेत. मी नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेच्या संदर्भात माननीय सभापतींनी आज निवेदन करण्यासंबंधी निदेश दिले होते, त्याचप्रमाणे श्री. तळेकर यांच्या सुटकेसंबंधी निवेदन करण्याची मागणी केली होती ......

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. व मु.शी.** : □म□ज सल्ला□र समितीचा अहवाल सभा□ृहाला सादर □र□व संमत □रु□घे□

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अ□ुमती□ □म□ज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभा□ृहाला सादर □रतो.

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक शुक्रवार, दिनांक 8 एप्रिल, 2005 रोजी दुपारी 3.00 वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन सोमवार, दिनांक 11 एप्रिल, 2005 ते शनिवार, दिनांक 16 एप्रिल, 2005 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

**एप्रिल, 2005**

| | |
|---|---|
| सोमवार, दिनांक 11 | शासकीय विधेयके. |
| मंगळवार, दिनांक 12 | 1. राज्यातील अवर्षणप्रवण तालुक्यांसदर्भात नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा (सत्तारुढ पक्षातर्फे) |
| | 2. सन 2005-2006 चे विनियोजन विधेयक. |
| | 3. शासकीय विधेयके. |
| बुधवार, दिनांक 13 | शासकीय विधेयके. |
| गुरुवार, दिनांक 14 | सुट्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती) |
| शुक्रवार, दिनांक 15 | 1. अंतिम आठवडा प्रस्ताव. |
| | 2. शासकीय विधेयके. |
| | 3. अशासकीय कामकाज (विधेयके) |
| शनिवार, दिनांक 16 | शासकीय विधेयके. |

**तालिका सभापती** : □म□ज सल्ला□र समितीचे प्रतिवृत्त सभा□ृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, □म□ज सल्ल□र समितीचे प्रतिवृत्त सभा□ृहास संमत आहे असा मी आपल्या अ□ुमती□ प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टा□□ संमत झाला.

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:10

वि.प.वि.क्रमांक 12 बाबत

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे, यांचे सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 12 - अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, 2004. हे विधेयक पुढे ढकलण्यात यावे असे सन्माननीय सदस्यांना म्हणावयाचे आहे का ?

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी विनंती केलेली आहे आणि मी त्याला सहमती देतो. पण माझी विनंती आहे की, बाकी बिलावर सुध्दा उत्तरे देण्यासाठी याठिकाणी माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत. त्यामुळे मंगळवारी सकाळी सभागृहाची विशेष बैठक घेऊन या विषयावर चर्चा करुन, उत्तरे देण्यात यावीत.

**तालिका सभापती** : दिनांक 15-4-2005 रोजी शुक्रवार असल्याने त्यादिवशी अशासकीय कामकाज होणार असून त्यामध्ये "विधेयके" असे दाखविण्यात आलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, शेवटच्या दिवशी कामकाज होत नाही.

**तालिका सभापती** : 15-4-2005 ला अधिवेशनाचा शेवटचा दिवस नाही, तर शनिवार, दिनांक 16-4-2005 रोजी शेवटचा दिवस आहे. तेव्हा शुक्रवार, दिनांक 15-4-2005 रोजी अशासकीय कामकाज असून त्यादिवशी "विधेयके"असे दाखविण्यात आलेले असल्याने त्यामध्ये आपल्याला हे विधेयक चर्चेसाठी ठेवावयाचे आहे का ?

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, 15 तारखेला हे विधेयक चर्चेसाठी ठेवण्यात येऊ नये. कारण त्यादिवशी मला अडचण असल्यामुळे मी येथे येऊ शकणार नाही. त्यामुळे हे विधेयक पुढील अधिवेशनात . . . .

**तालिका सभापती** : हे विधेयक पुढील अधिवेशनामध्ये चर्चेसाठी ठेवण्यात यावे अशी सन्माननीय सदस्यांची विनंती आहे का ? तर याबाबतीत माननीय सभापती महोदयांना विचारुन सन्माननीय सदस्यांना यासंबंधात कळविण्यात येईल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, एक वर्षापासून हे विधेयक येथे आणले जात आहे. तेव्हा 12 तारखेला यासंबंधातील चर्चा ठेवण्यात यावी.

**तालिका सभापती** : जर 12 तारखेला ही चर्चा ठेवावयाची असेल तर त्यासाठी सभागृहाची सकाळी विशेष बैठक घ्यावी लागेल आणि त्यासाठी माननीय सभापतींची अनुमती घेऊन, त्यांनी याबाबतीत तसे सांगितले तर आपण बैठक घेऊ.

. . . .2 टी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, धन्यवाद.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, 12 तारखेला सकाळी सभागृहाची विशेष बैठक ठेवली तर ते अडचणीचे होणार आहे. कारण 12 तारखेला लोकशाही आघाडीची बैठक ठेवण्यात आली आहे. त्यामुळे याबाजूचे सन्माननीय सदस्य बहुसंख्येने त्या बैठकीसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे ते अडचणीचे होईल.

**तालिका सभापती** : यासाठीच मी सभागृहाला सांगू इच्छिते की, यासंदर्भात सर्व गोष्टींचा विचार करुन माननीय सभापतींच्या अनुमतीने आपण यासाठी दिवस मुक्रर करु आणि त्यानंतर तो सभागृहाला कळविण्यात येईल.

-----

. . . .2 टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय ठराव**

पृ.शी.: जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव.

मु.शी.: जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव या विषयावरील श्रीमती संजीवनी रायकर यांचा ठराव.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते.

"जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदया, "आता राज्यातील जनता अन्नधान्याच्या बाबतीत उपाशी राहणार नाही. ज्यांना शिधापत्रिका मिळणार नाही, त्यांना शासन फुड कुपन देणार " असे उद्‌गार आपण काढलेले आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, आता सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना असे म्हटले आहे की, "आपण असा उल्लेख केला आहे." तेव्हा "आपण" म्हणजे कोण ?

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदया, "आपण " म्हणजे माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.सुनील तटकरेसाहेब. ही योजना आदिवासींच्यासाठी अधिक प्रमाणात आहे. आदिवासींसाठी "अंत्यादय योजने" तील धान्य दरमहा 10 कि.ग्रॅ.दिले जाते.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर..

स्वस्तधान्य दुकानदारांविषयी श्री. सुरेश कदम यांची तक्रार आहे की, आदिवासींना या योजनेतील धान्यच मिळत नाही. आणि ते दिलेच तर ते चढया भावाने दिले जाते. मागणी केल्यानंतर 35 किलोग्रॅम नाही तर फक्त 10 किलोग्रॅम धान्य दिले जाते.अशी तक्रार डिसेंबर,2004 मध्ये आलेली आहे. त्याचबरोबर स्थानिक अधिकारी रेशन दुकानदार यांच्या संगनमताने अनेक वर्षापासून चाललेला रेशनिंग घोटाळा समतानगर पोलिसांनी उघडकीस आणला. हे जाळे सगळया मुंबईभर पसरलेले असावे असे दिसते. गुजरात, उत्तरप्रदेश, बिहार वगैरे राज्यांतून येणारे लोक त्या त्या प्रांतातील जुने युनिट रद्द केल्याचे दाखवून नव्या शिधावाटप पत्रिका बनवितात, हा धंदाच झाला आहे. रेशनकार्ड तयार करुन शासनाकडून कोटयावधी रुपयाचे धान्य खरेदी करुन, ते धान्य काळयाबाजारात विकण्याचा उद्योगही चालतो. संजयगांधी निराधार योजना, इंदिरागाधी योजना, श्रावणबाळ योजना या योजनांद्वारा लाभ घेण्यासाठी 10 हजार जणांनी दोन-दोन रेशनकार्ड घेऊन कोटयावधी रुपयांची फसवणूक केलेली आहे. या योजनेतील अनेक प्रकरणे बोगस आहेत, त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. रॉकलच्या काळया बाजाराबाबत आपल्याकडे अनेकदा लक्षवेधी सूचना येतातच. गरिबांसाठी, मध्यमवर्गीयांसाठी रेशनकार्डवर काही गोष्टी मिळाल्या पाहिजेत. सर्वसाधारपणे मध्यमवर्गीयांना रेशनकार्ड हे फक्त पुरावा दाखविण्यासाठी, पासपोर्ट मिळविण्यासाठी किंवा घर, ब्लॉक वगैरे खरेदी करण्यासाठीच उपयोगात येते. बाकी त्यांचा रेशनकार्डाशी संबंधत येत नाही. जानेवारीमधील एक घटना आहे.केंद्रसरकारचा अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर गोड साखरेच्या कडू कहाणीला सुरुवात झाली. पंधरा-सोळा रुपये किलो भावाने मिळणारी साखर एकदम वीस-बावीस रुपयांपर्यंत पोहचली आहे. आणि आणखीसुध्दा साखरेचा भाव वाढण्याचा संभव आहे. केंद्र सरकारच्या सेवा कराच्या निषेधार्थ हे काम घडले. सेवा कराच्या निषेधार्थ नवी मुंबईत घाऊक व्यापा-यांचा संप सुरु झाला. आणि खरेदी बंद आंदोलन त्यांनी केले. त्यामुळे सध्याच्या महागाईच्या वणव्यात अधिक तेलच ओतले गेले. त्यामुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई या परिसरात जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा करणा-या वाशी बाजारातील मालाचा साठा निम्म्यावर आला. त्यामुळे साहजिकच किरकोळ व्यापा-यांनी चढया दराने वस्तू विक्री केल्या. त्यामुळे महागाईत जनता होरपळून निघाली आहे. घरामध्ये सामान्य माणूस अगदी मेटाकुटीला आलेला आहे असे म्हणण्यापेक्षा तो कासाविसच झ ाला आहे. एकटया कमावत्या व्यक्तिचे कुंटुब चौकोनी असेल .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

तर एस.टी.भाडेवाढ, बेस्ट भाववाढ, पेट्रोल-डिझेल भाववाढ याच्यामुळे मालवाहतुक, प्रवाशी वाहतुकीमध्येही वाढ झालेली आहे. त्यामुळे हॉटेलात जाऊन चहा पिणे ही देखील सामान्य माणसाच्यादृष्टीने चैनीचीच गोष्ट झालेली आहे.सरकारच्यावतीने जो महागाई निर्देशांक प्रसिध्द होतो, तो दिशाभूल करणारा आहे. त्यात वस्तुंच्या चढया दराचे, वाढत्या दराचे प्रतिबिंब मुळीच नसते. केंद्राप्रमाणे महागाई भत्यात वाढ केली जाते. पण जीवनावश्यक वस्तूंचे वाढते दर आणि महागाई भत्ता यांचा ताळमेळ कधीच जुळत नाही. भाववाढीबद्दल शासनसुध्दा फारसे संवेदनशील नाही. बोनस देणे सुध्दा शासनाने आता रद्द केलेले आहे. वास्तविकपाहता कोणाला बोनस हा शब्द टोचत असेल तर बोनस म्हणण्याचे काही कारण नाही. पण डिफर्डवेज म्हणजे महागाईच्या दरात ज्या प्रमाणात वाढ होते, त्याप्रमाणात आपल्याला वेतन मिळत नाही, म्हणून तेराव्या महिन्याचे वेतन असे म्हटले तर बोनस देण्याबद्दल बद्दल कुणी आक्षेप घेणार नाही. तेव्हा शासनाने हे करावे. वर्तमानपत्रात भाववाढीबद्दल अग्रलेख येतील. लोक विशेषत गृहिणी चार भिंतीमध्ये थोडयाशा तणतणतील. वाचकांचा पत्रव्यवहारही होईल. एखाद-दुसरे पत्रही येईल. सामान्य माणूस जीवनकलहात इतका भांबावला आहे की, महागाई विरोधी आवाज उठवण्याचे त्राणच त्याच्यामध्ये उरलेले नाही. महागाई प्रतिकार महिला संघटना,................................................

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ....

मला आठवते की, दरवर्षी ती संघटना महागाई विरोधात मोर्चे काढत असत परंतु आता त्यांचा पूर्वीचा आवाज क्षीण झालेला आहे. लाटणे मोर्चा, थाळी मोर्चा अलीकडे दिसत नाही. मोर्चाकरिता येणाऱ्या सगळयांना आझाद मैदान येथेच बसविले जाते त्यामुळे त्यांना मोर्चाची गंमत वाटत नसेल. अशा संघटनाही आता राहिलेल्या नाहीत. जपानमध्ये भाव वाढीवर नियंत्रण ठेवणाऱ्या प्रभावी ग्राहक संघटना आहेत. तशा संघटना आपल्या देशामध्ये स्थापन केल्या तर वाढत्या महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण बसेल. सरकारची धोरणे महागाईला निमंत्रण देणारी असतात. अनेक नवनव्या बाबींवर सेवाकर लावला जातो. त्यामुळे व्यापारी, शेतकरी, वाहतूकदार त्यांचे प्रश्न शासनाकडे मांडतात. ते प्रश्न वेळीच सोडविले तर भाववाढीला आळा बसेल. हे प्रश्न विलंबाने सुटले तर एकदा वाढलेले भाव कधीच खाली येत नाहीत. ते भाव वाढतच जातात.

सभापती महोदया, 1 एप्रिलपासून महाराष्ट्रामध्ये मूल्यवर्धित कर प्रणालीचा वापर सुरु झालेला आहे. त्याचा पहिला दणका खाद्यतेल उत्पादकांना बसला आहे. मूल्यवर्धित कर लागू नसलेल्या राज्यातून तेल आयात करता येईल. गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू, राजस्थान या राज्यातून येणाऱ्या खाद्यतेलाचे, वनस्पती तुपाचे भाव बऱ्यापैकी स्वस्त राहणार आहेत. त्यामुळे 1 एप्रिलच्या आधीपासूनच घाऊक व्यापाऱ्यांनी त्या राज्यातून आयातीला सुरुवात केलेली आहे. त्यामध्ये कोटयवधी रुपयांचे सौदे झालेले आहेत. आता एप्रिलनंतर 15 किलोच्या डब्यामागे 25 ते 30 रुपये कमी मोजावे लागणार आहेत. औषधावरील विक्रीकर महाराष्ट्रात 9 टक्के आहे. व्हॅट प्रणालीमुळे तो कर 12 टक्के होईल व ग्राहकांपर्यन्त हा कर 15.5 टक्केपर्यन्त जाईल. जी जीवनावश्यक औषधे आहेत ती या करातून वगळली जावीत. अन्नधान्य, साखर यांना आता प्रथमच मूल्यवर्धित कर लागू होणार आहे. रवा , मैदा इत्यादीवर कर लागणार आहे. त्यामुळे या वस्तू महाग होणार.

सभापती महोदया, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किंमतीत वाढ होत असल्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमतीतही वाढ होणार आहे. मालाची, भाज्यांची, फळांची वाहतूक ट्रकव्दारे होत असते. त्यामुळे या जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ अटळ आहे. याबाबत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने वाढ होऊ दिली नव्हती. तसा प्रयोग या शासनाने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्रीमती संजीवनी रायकर .....

करायला हरकत नाही. पेट्रोलियम पदार्थांना व्हॅटच्या कक्षेत आणावे. घरगुती गॅसबाबत केंद्रीय पेट्रोलियम मंत्री श्री. अय्यर यांनी सांगितले होते की, त्यामध्ये 100 रुपयांपर्यन्त वाढ होईल. ज्यावेळी केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाला त्यावेळी माननीय पंतप्रधान यांच्या पत्नीला विचारले गेले की, तुम्हाला याबद्दल काय वाटते ? त्यावेळी त्यांनी जे उद्‌गार काढले त्यामध्ये त्यांनी समस्त भारतीय गृहिणींचे मत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, गॅसची भाववाढ करु नका. परंतु आजच वर्तमानपत्रामध्ये बातमी आली आहे की, घरगुती गॅस 6 रुपयांनी महाग झाला. म्हणजे आता 295 रुपयांऐवजी 297 रुपये 98 पैसे एवढी किंमत झालेली आहे. यामध्ये वरचे 98 पैसे अशी किंमत का ठेवली जाते हे कळत नाही. बाटा कंपनीवाले बुटांचे दर याच पध्दतीने काही रुपये 99 पेसे असे दर ठेवतात. तशी अवस्था शासनाने याबाबतीत केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे साहेब आता या ठिकाणी उपस्थित नाहीत. ते मत्स्यप्रेमी आहेत. व्हॅट लागू झाल्यानंतर मच्छिमारांनी आंदोलन अधिक तीव्र केलेले आहे. शिल्लक असलेल्या मासळीची विक्री सुध्दा बंद करण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. किरकोळ बाजारात मासे नाहीत. त्यामुळे मत्स्यप्रेमींना आता उपवास घडणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत दोन दिवसात निर्णय घेण्याचे आश्वासन दिलेले आहे. ते आश्वासन त्यांनी पाळावे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

जगात दोन गोष्टी टाळणे अशक्य आहे एक कर व दुसरा मृत्यू. मृत्यू टाळण्याचे प्रयत्न डॉक्टर करतात. परंतु मृत्यू अटळ आहे. पण करांचा बोजा कमी करण्यासाठी उद्योगधंद्यातील मंडळींचा प्रयत्न असतो. पण सर्वसाधारण माणसांवर त्याचे ओझे पडते. केंद्राने कोणत्या बाबी व्हॅटमधून वगळायच्या हे त्या त्या राज्यांवर सोपविले आहे. सामान्य व अतिसामान्य लोकांसाठी ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत त्यांच्याबाबत हा विचार करावा आणि महागाईनेमुळे जीवनावश्यक वस्तू महाग होणार आहेत त्यांना काही तरी दिलासा मिळेल असे शासनाने करावे यासाठी हा ठराव मांडला आहे. शिधापत्रिका ही आता ठराविक लोकांपुरती झालेली आहे. आता व्हॅटच्या माध्यमातून भाववाढ होईल म्हणून मी हा व्हॅटसंबंधीचा विषय आपल्यासमोर ठेवलेला आहे. शासनाने त्याबद्दल विचार करावा एवढीच विनंती या निमित्ताने करुन मी माझे भाषण संपविते.

ठराव प्रस्तुत झाला.

-----

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अनंत तरे)**

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदनांबाबत</u>

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सभागृहामध्ये आज दोन निवेदने केली जाणार होती. आता हे अशासकीय कामकाज संपल्यानंतर सभागृहाचे कामकाज संपणार आहे. तत्पूर्वी मी मुद्दाम आठवण करुन देत आहे.

**तालिका सभापती** : मंत्रिमहोदय, मा.सभापतींनी निदेश दिल्यामुळे आज दोन निवेदने करावयाची आहेत. सभागृहाचे आजच्या दिवसाचे कामकाज संपण्यापूर्वी ही दोन्ही निवेदने केली जातील याची आपण नोंद घ्यावी.

श्री.मधुकर सरपोतदार : या सदनामध्ये सन्माननीय सभापती निदेश देतात त्या निदेशांचे पालन होत नाही. कालच तळेकर यांच्याबद्दल मा.सभापतींनी निदेश दिले होते त्याचे आज निवेदन होणे आवश्यक होते. आज नवी मुंबईतील कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर आज संध्याकाळपर्यंत निवेदन करण्याचे मा.सभापतींनी निदेश दिले होते. ते निवेदनही अद्याप झालेले नाही. शासन निदेश गांभीर्याने घेतच नाही असे मा.सदस्यांच्या लक्षात आलेले आहे. सभापती महोदय, या निवेदनांसंबंधीची वस्तुस्थिती काय आहे ते मंत्रिमहोदयांना विचारुन खुलासा करुन घ्यावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, परवा व्हॅटसंबंधीचे विधेयक खालच्या सभागृहातून पारित होऊन या सभागृहात न आल्यामुळे हे सभागृह तहकूब केले होते. आता आपले कामकाज संपत आलेले आहे. त्यामुळे मा.सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी म्हटल्याप्रमाणे दोन निवेदने आज करण्यासाठी शासनाला भाग पाडावे म्हणून सभागृह अर्धा तास का होईना तहकूब करावे. आपण व्हॅटच्या बिलासाठी सभागृह तहकूब केले होते ना ? मग आताही निवेदन येईपर्यंत अर्धा तास सभागृहाची बैठक तहकूब करावी.

श्री.सुनील तटकरे : मा.सभापतींनी निदेश दिले असतील त्याप्रमाणे निवेदन करण्याची कार्यवाही केली जाईल.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 16:30

**पृ.शी.**: जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव

**मु.शी.**: जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव या विषयावरील श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांचा ठराव

(चर्चा पुढे सुरु..)

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर यांनी अशासकीय ठरावाद्वारे जीवनावश्यक वस्तुंच्या संदर्भात आपले विचार याठिकाणी मांडलेले आहेत. जीवनावश्यक वस्तूंमध्ये अनेक वस्तुंचा समावेश होतो. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला पूर्णपणे धान्य उपलब्ध व्हावे यादृष्टीने गेल्या चार-पाच वर्षामध्ये ही व्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. ही व्यवस्था करीत असताना जो वर्ग सातत्याने दुर्लक्षित आहे किंवा अन्य काही कारणांमुळे पूर्णवेळचे जेवण घेऊ शकत नाही अशा लोकांना राज्य आणि केन्द्र शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून स्वस्त दरामध्ये आणि मुबलक प्रमाणात धान्य कसे उपलब्ध होऊ शकेल हा राज्य आणि केन्द्र सरकारचा विचार आहे. या योजनांची सांगड घालत असताना मग रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून केली जाणारी कामे असतील किवा आश्वासित रोजगार योजनेच्या माध्यमातून केली जाणारी कामे असतील, या कामावर काम करणा-या मजुरांना कामाचा मोबदला देत असताना त्यांना आवश्यक असणारे धान्य देखील उपलब्ध व्हावे अशा प्रकारची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे. अनेक वेळा असे होते की, गरीब कुंटुंबातील मजुरीच्या कामावरील लोकांना मजुरीचे पैसे मिळाल्यानंतर काही वेळा अन्य कारणासाठी ते पैसे खर्च केले जातात आणि कुटुंबातील माणसांवर उपाशी राहाण्याची पाळी येते. म्हणून रोजगार हमी योजना किंवा अश्वासित रोजगार योजना अशा योजनांवरील मजुरांना पैशाच्या स्वरुपात रोखीने मजुरी देण्यात येते, पण त्याच बरोबर त्याना धान्यही देण्यात येते. गेल्या चार-पाच वर्षामध्ये देशात धान्याचा विपूल साठा उपलब्ध आहे. त्यामुळे वर्गवारी प्रस्थपित केलेली आहे. ही वर्गवारी करीत असताना दारिद्र्य रेषेखालील लोकांना 35 किलो धान्य हे सवलतीच्या दरामध्ये मिळाले पाहिजे. त्यासाठी आवश्यक तेवढा धान्याचा कोटा भारत सरकारकडून राज्य शासन उपलब्ध करुन घेत आहे. रेशनिंगच्या दुकानांवर गहू-तांदूळ 6-7 रु. किलोने उपलब्ध करुन दिले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुनील तटकरे पुढे सुरु...)

जातात. तसेच रॉकेल, तेल, साखर अशा जीवनावश्यक वस्तू रेशनिंगच्या दुकानावर स्वस्त दरात उपलब्ध करुन दिल्या जातात. हे शासन अंत्योदय सारखी योजना राबवित आहे. लोकांच्या विश्वासाला पात्र ठरुन हे आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर 4 लाख 56 हजार लोकांना अंत्योदय योजनेचा फायदा देण्याच्या दृष्टीने शासनाने पावले टाकलेली आहेत. अशा प्रकारे अंत्योदय योजनेचा तिसरा विस्तार करण्यास केन्द्र सरकारकडून राज्य सरकारने मान्यता घेतलेली आहे. त्यामुळे बीपीएल खालील 4 लाख 56 हजार लोकांना या अंत्योदय योजनेचा फायदा निश्चितच मिळणार आहे. अनेक वेळा रेशनिंग दुकानावर उपलब्ध होणा-या धान्याचा काळाबाजार होतो असे मा.सदस्यांनी सांगितले. त्याबाबतीत दक्षता पथके नेमलेली होती. अनेक वेळा दक्षता पथकांनी तपासणी केल्यानंतर जे रेशनिंग दुकानदार दोषी आढळून आले त्यांचे परवाने निलंबित करुन त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई केलेली आहे. आपल्या देशामध्ये अन्नधान्याचे उत्पादन फार मोठया प्रमाणावर झालेले असून सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून ते सर्वसामान्य लोकांना मिळाले पाहिजे अशा प्रकारची भूमिका आपण घेतलेली आहे. मा.सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे फूड कूपन्सची नवीन कल्पना राज्यामध्ये राबविण्याचा विचार आम्ही करीत आहोत. या मुंबई शहरामध्ये ज्यांचे घर आहे, जे लोक येथे राहातात त्यांनाच रेशन कार्ड देण्यात येते. परंतु जे लोक ग्रामीण भागातून दोन-तीन महिन्यांसाठी मुंबईमध्ये कामाच्या निमित्ताने येत असतील तर अशा ग्रामीण भागातील मजुरांना त्या दोन-तीन महिन्याच्या कालावधीत सवलतीच्या दराने धान्य उपलब्ध व्हावे म्हणून ही फूड कूपनची कल्पना आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था राबवित असताना त्यामध्ये दोष निर्माण होतात, रेशनिंग कार्ड योग्य रितीने दिले जात नाही असे मा.सदस्यांनी सांगितले. परंतु असे प्रकार होऊ नयेत म्हणून वेळोवेळी ड्राईव्ह घेऊन तपासणी केलेली असून जेथे जेथे अवैध कार्ड निदर्शनास आली ती सर्व कार्डस् रद्द करण्याची कारवाई शासनाने केलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

आणि ज्यांच्या मार्फत एखाद्या कार्यालयाच्या मार्फत जी काही अधिकची रेशन कार्डे दिली गेली असतील त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्याच्या सूचना देण्याची व्यवस्था सरकारने केलेली आहे. राज्यात रॉकेलचा साठा पुरेपूर उपलब्ध करण्याच्या दृष्टीकोनातून भारत सरकारकडून जे नियतन प्राप्त होते. भारत सरकारकडून मिळणारे नियतन राज्यातील ग्रामीण व शहरी भागात सम प्रमाणात कशा पध्दतीने मिळेल याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न शासनाकडून केला गेला आहे. फ्री सेलचे रॉकेल उपलब्ध झाले पाहिजे. राज्यात छोटे मोठे उद्योगधंदे आहेत. त्यांना सुध्दा फ्री सेलचे रॉकेल उपलब्ध झाले पाहिजे आज सार्वजनिक वितरण व्यवस्थेची प्रचलित व्यवस्था आहे त्यामाध्यमातून छोटे,लहान उद्योगधंदे आहेत त्यांना सुध्दा फ्री सेलचे रॉकेल उपलब्ध होऊ शकेल यासंबंधीचा आमचा प्रयत्न आहे. लहान लहान उद्योग कमी खर्चात चालू शकतील यादृष्टीने सर्वंकष विचार करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत, काही तक्रारी केलेल्या आहेत याची योग्य ती नोंद घेऊन अशा प्रकारच्या तक्रारी राज्यात उदभवणार नाहीत याची निश्चितपणे राज्य सरकारकडून दक्षता घेण्यात येत आहे. राज्यातील सामान्य माणसाला दोन-तीन रुपये किलो या प्रमाणे धान्य दिले गेले पाहिजे, पाच- सहा रुपये किलो या प्रमाणे त्यांना धान्य उपलब्ध करुन दिले गेले पाहिजे. या पध्दतीमध्ये सुध्दा आम्ही सुधारणा प्रयत्न निश्चितपणे करीत आहोत. आज कुपोषित बालकांना मोफत अन्न देतो. त्या कुपोषित बालकांच्या कुटुंबियांना सुध्दा मोफत धान्य देण्याचा सरकार अत्यंत गांभीर्याने विचार करीत आहे. ग्रेड-3, ग्रेड-4 या मुलांना ज्यावेळी आम्ही कुपोषित बालके म्हणून समजतो. पुरेसे अन्न न मिळाल्यामुळे ही बालके कुपोषित होतात. त्यांना अन्न मिळत नसल्यामुळे त्या बालकांच्या शरीरयष्टीवर परिणाम होऊन ते मृत्यूच्या खायेत लोटले जातात. त्या बालकांचे संगोपन करणा-या कुटुंबियांना सुध्दा धान्य मोफत उपलब्ध करुन देऊ शकलो तर कुपोषित बालकांची संख्या कमी होण्यामध्ये महाराष्ट्राला हातभार लावता येईल. अशा सर्वंकष योजना या विभागाच्या मार्फत राबविण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जातो आहे. साखरेचे भाव वाढले त्यावेळेला रेशन दुकानांमध्ये साखर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून सरकारने पूर्णपणे पाऊले उचलली आहेत. भारत सरकारकडे जे नियतन राज्य सरकारने मागितले. सुदैवाने माननीय शरद पवार यांच्या सारखे नेतृत्व केंद्रात असल्यामुळे राज्य सरकारकडून जी नियतनाची

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

मागणी केली जाते. ते नियतन पूर्णपणे देण्याच्या बाबतीत केंद्र सरकारचे आपल्याला पूर्णपणे सहयोग आहे. या सर्व सहयोगाच्या माध्यमातून सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक मजबूत कशी करता येईल आणि ज्यांच्यासाठी आम्ही ही व्यवस्था निर्माण केलेली आहे, त्यांना हे धान्य वेळेवर व पूर्ण कसे मिळू शकेल याचा भविष्यात अधिक सखोल विचार केला जाईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याची पूर्णपणे राज्य सरकारने नोंद घेतलेली आहे. धान्य देण्याच्या बाबतीत "फूड फॉर वर्क" अशा प्रकारची योजना भारत सरकारने राबविलेली आहे. ती योजना राज्यातील 11 जिल्हयामध्ये या महिन्यापासून सुरु करण्याचे ठरविले आहे. सदस्यांच्या भावनांशी आम्ही सहमत असून सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न राज्य सरकार करीत आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी या ठरावाच्या निमित्ताने अतिशय चांगले विचार मांडले. या चांगल्या विषयावर त्यांनी या ठिकाणी चर्चा उपस्थित केली. त्यांच्या सूचनेची तसेच इतर सदस्यांनी केलेल्या सूचनेची मी नोंद घेतलेली आहे. मी आपल्या मार्फत सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांना विनंती करतो की, त्यांनी आपला अशासकीय ठराव मागे घेण्यात यावा.

श्रीमती संजीवनी रायकर : आपण "फूड फॉर वर्क " या योजनेचा उल्लेख केला. त्या योजनेच्या माध्यमातून धान्यच देण्यात येणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : होय. "फूड फॉर वर्क" ही धान्य देण्याचीच योजना आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांचा सर्वे व्यवस्थित झालेला नाही. दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांचा रिसर्वे करण्यात येईल काय ? तसेच दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांना जेवढे धान्य सध्या देण्यात येते त्यात वाढ करण्यात येणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांसाठी जी मर्यादा आहे ती वाढवून देण्याच्या दृष्टीकोनातून मी स्वत: केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांची भेट घेतली. हा विषय कृषी मंत्रालयाच्या अखत्यारित येत नाही. हा विषय भारत सरकारच्या नियोजन विभागाच्या अंतर्गत येतो. नियोजन विभागाला सुध्दा भारत सरकारचे कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी विनंती केलेली

2...



ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 16:35

श्री.सुनील तटकरे..

आहे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांची मर्यादा महाराष्ट्र राज्यापूरती वाढविता येणार नाही. संपूर्ण देशात ही मर्यादा वाढवावी लागेल. परंतु हा प्रस्ताव भारत सरकारच्या विचाराधीन आहे. त्याचा पाठपुरावा करण्याचा राज्य शासन पाठपुरावा करीत आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : काही गोष्टी सन्माननीय मंत्री महोदयांनी मान्य केलेल्या आहेत. व्हॅटच्या संदर्भात त्यांनी आपल्या भाषणात काहीच उल्लेख केला नाही...

यानंतर श्री. कानडे..

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, श्रीमती संजीवनी रायकर यांनी मत्स्यव्यवसायाच्या बाबतीत जी भावना व्यक्त केली त्या आपल्याही गांभीर्याच्या भावना आहेत याची जाणिव आम्हांला निश्चितपणाने आहे. म्हणूनच खालच्या सभागृहामध्ये याबाबतीत प्रश्न विचारण्यात आला त्यावेळी मंत्रीमहोदयांनी सांगितले की व्हॅटच्या या संबंध व्यवस्थेमध्ये डिझेलचा समावेश नाही. याबाबतीत सवलत देण्याच्या दृष्टिकोनातून राज्य शासन येत्या सोमवारी निश्चितपणाने निर्णय घेईल अशा प्रकारच्या भावना मंत्रीमहोदयांनी खालच्या सभागृहात मा.मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत केल्या आहेत. त्यामुळे मत्स्यव्यवसाय केल्या जाणा-या कोळी समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला जात असतानाच मत्स्य खाणा-यांसाठी सुध्दा पूर्णपणाने अन्न पुरवठा करण्याच्या बाबतीत हे सरकार प्रयत्नशील आहे. मी मा.सदस्यांना विनंती करतो की,त्यांनी आपला ठराव मागे घ्यावा.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 16:40

**पृ.शी.**: तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच इमारतीत असणे.

**मु.शी.**: तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच इमारतीत असण्याबाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांचा ठराव

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

" तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत,जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या गावक-यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंडही सोसावा लागू नये यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

सभापती महोदय, तालुक्यामध्ये पंचायत समिती कार्यालय,तहसील कार्यालय,वनक्षेत्रपाल कार्यालय,सामाजिक वनीकरण कार्यालय,बांधकाम कार्यालय,सहाय्यक निबंधक कार्यालय अशी जवळजवळ 14 कार्यालये असतात. या कार्यालयामध्ये 250 कर्मचारी आणि 25 अधिकारी आहेत. ही कार्यालये एकाच ठिकाणी असतील जर ग्रामीण भागातून येणा-या शेतक-यांना आणि सामान्य जनतेला दैनंदिन काम करणे सोईचे होऊ शकते. यासाठी शासनाने ही सर्व कार्यालये एकाच ठिकाणी असण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आज राज्यातील मुंबई वगळता 33 जिल्हयांमध्ये जवळजवळ 353 तालुके आहेत. 80 टक्के तालुक्यांचे आज शहरीकरण होत आहे. तालुक्याच्या ठिकाणी शासनाच्या मालकीची जमीन आहे. ही 14 कार्यालये बीओटी तत्वावर एकत्र आणली तर यातील जवळजवळ 90 टक्के कामे मोफत होऊ शकतात. ग्राम सचिवालयाचा प्रयोग यशस्वीपणे राबविला. ग्रामीण भागातील जनतेला एका ठिकाणी ग्राम सचिवालयाच्या मार्फत सर्व कामे करणे सोईचे झालेले आहे. माझी शासनाला विनंती आहे की ही सर्व कार्यालये एकत्र आणण्याच्या दृष्टीने एक जलद कार्यक्रम शासनाने राबवावा. अलिबाग जिल्हयातील कर्जत तालुक्यामध्ये तहसील कार्यालय 3 मैल आहे आणि बाकी कार्यालये एकीकडे आहेत. ही सगळी कार्यालये एकत्र आणण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने निर्णय घेतला पाहिजे यासाठी तरतूद केली पाहिजे. काही

...3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ...

कार्यालये भाडयाच्या इमारतीमध्ये आहेत. ही कार्यालये शासनाने बँकेकडून लोन घेऊन जरी एकत्र एका इमारतीत आणली तर सध्या देत असलेल्या भाडयाच्या रकमेतून लोनचे रिपेमेंट होऊ शकेल. याचे नियोजन केले पाहिजे. अलिबाग तालुक्यामध्ये कृषी कार्यालये एकत्र केलेली आहे. कृषी अधिकारी श्री. बनसोडे यांनी जवळजवळ 10 लाख रुपये शासनाचे वाचविले आहेत. आमच्या जिल्हयाचे पालकमंत्री हा विषय गांभीर्याने घेत नाहीत. भाडयाच्या इमारतीमध्ये जी कार्यालये आहेत ती एकत्र करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. गायकवाड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ..

शासनाने जर यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम तयार केला तर ग्रामीण भागातील जनतेला होणारा त्रास थांबविता येईल. त्याचबरोबर सध्या त्यांना जी काही पायपीट करावी लागत आहे ती सुध्दा थांबविता येईल असे मला वाटते. त्यासाठी मी या ठिकाणी अशासकीय ठराव मांडलेला आहे त्याचा शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आणि एकाच कार्यालयात असावीत जेणे करुन ग्रामीण भागातील लोकांना पायपीट करावी लागणार नाही तसेच त्यांना आर्थिक भुर्दन्डही सहन करावा लागणार आहे या सदर्भात या ठिकाणी एक अशासकीय ठराव मांडला आहे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एका चांगल्या विषयावरील अशासकीय ठराव मांडलेला आहे.त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात शासनाने काही सकारात्मक पावले उचलली आहेत.महाराष्ट्रातील जवळजवळ 29 तालुके आणि जुनी चार तालुके असे दोन्ही मिळून एकूण 33 तालुक्यात मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमध्ये कार्यालये असावीत यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे आणि जवळजवळ 27 कोटी रुपये त्यासाठी खर्च करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी प्रशासकीय इमारतीसाठी सुमारे 4 लक्ष चौरस मिटर्स इतक्या क्षेत्रफळाची आवश्यकता असून त्यासाठी 320 कोटी रुपयाचा खर्च अपेक्षित आहे. या प्रयोजनासाठी उर्वरित तालुक्यामध्ये नियोजनबध्द कार्यक्रम आखून महाराष्ट्रातील सर्व तालुका मुख्यालयामध्ये प्रशासकीय इमारती होण्याबाबत शासन कटिबध्द आहे.सभापती महोदय, उपरोक्त वस्तुस्थिती मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांच्या निदर्शनास आणून देतो व त्यांनी हा अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी विनंती करतो.

. श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, एक गोष्ट मला निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, हा अशासकीय ठराव मांडणारे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे रायगड जिल्हयातील आहेत. त्या ठरावाला उत्तर देणारे सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री श्री.रविशेठ पाटील हे रायगड जिल्हयातील आहेत आणि त्यांच्या बाजूला बसलेले माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे हे सुध्दा रायगड जिल्हयातील आहेत.सभापती महोदय, आपण सुध्दा रायगड जिल्हयातील आहात तेव्हा या संदर्भात सर्वांनी एकत्रित बसून निर्णय घ्यावा असे मला सुचवावयाचे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी खुलासा केल्यानंतर हा ठराव मी मागे घेत आहे परंतु पनवेलचे आमदार श्री.विवेक पाटील यांनी असा प्रस्ताव शासनाकडे दिलेला आहे आणि पनवेल तालुकयातील सगळी शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी करण्यासंबंधीचा प्रस्ताव गेल्या दोन वर्षापासून आयुक्तांकडे पडून आहे तेव्हा हे काम त्वरित होण्यासाठी माननीय मंत्रीमहोदय काही ठोस आश्वासन देतील काय ?

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री):सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी रायगड जिल्हयातील सर्व तालुक्यामधील शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी असावीत अशा प्रकारचा अशासकीय ठराव मांडला आहे. त्या संदर्भात राज्यमंत्र्यांनी समर्पक असे उत्तर दिलेले आहे.अलिबाग हे जिल्हयाचे ठिकाण असून त्यांनी कृषी विभागाच्या बाबतीत भावना व्यक्त केल्या आहेत आणि पनवेल मधील सर्व कार्यालये एकाच ठिकाणी असावीत असे सांगितलेले आहे. भविष्यामध्ये पनवेल हे मुंबईचे उपनगर होऊ शकेल इतक्या मोठया प्रमाणात त्या शहराची आज वाढ होत आहे. विधान सभेचे सन्माननीय सदस्य श्री.विवेक पाटील यांनी जो प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे तो प्रस्ताव आयुक्तांकडे प्रलंबित आहे. तेव्हा या जिल्हयाचा पालक मंत्री म्हणून माझ्याकडून निश्चितपणे त्यासबंधी पाठपुरावा केला जाईल आणि रायगड जिल्हयामध्ये शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीमध्ये आणण्याच्या दृष्टीने जो प्रस्ताव दिलेला आहे त्याला चालना देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.अनंत तरे)** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा अशासकीय ठराव चर्चेला घेण्यात येईल.

**महानंद डेअरीचे श्री.तळेकर यांना मिळालेल्या जामिनासंबंधात**
**शासनाकडून निवेदन होण्याबाबत औचित्याचा मुद्दा.**

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महाराज, महानंद डेअरीचे श्री.तळेकर यांचे संबंधात शासनाला आज निवेदन करावयास आपण सांगितले होते. परंतु अजून पर्यंत सदरहू निवेदन शासना कडून करण्यात आलेले नाही. आता कामकाजातील शेवटचा ठराव चर्चेला घेतला जाणार आहे आणि अजूनही शासनाकडून निवेदन होईल की नाही हे समजू शकत नाही. ...

**तालिका सभापती** : अशासकीय ठरावानंतर निवेदन .....

श्री. मधुकर चव्हाण : अध्यक्ष महाराज, हा शेवटचा ठराव आहे आणि तो झाल्यानंतर सभागृहापुढे कोणतेही कामकाज नाही त्यामुळे साहजिकच तेव्हा सभागृहाची बैठक आपल्याला दिवसभरासाठी स्थगित करावी लागणार आहे. तेव्हा आपण आताच सभागृहाची बैठक पाच दहा मिनिटांसाठी तहकूब करावी आणि तेवढ्या अवधीत मंत्री महोदयांना बोलावून घ्यावे. काल या ठिकाणी या प्रकरणी आज शासनाने निवेदन करण्यास आपल्या आसनावरून माननीय उपसभापतींनी निदेश दिलेले आहेत. तेव्हा आज हे निवेदन होणे आवश्यक आहे. तरी आपण काही काळ सभागृहाची बैठक तहकूब करावी. ...

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी पाच मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक 4.52 वाजता 5 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

( यानंतर श्री.जागडे .... 4बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**(सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री. अनंत तरे )**

**महानंद डेअरीचे श्री. तळेकर यांना मिळालेल्या जामिनासंबंधात शासनाकडून होणा-या निवेदनाबाबतचा औचित्याचा मुद्दा**

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या बाबतचे निवेदन शासनातर्फे सोमवारी करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही या बाबतची कालपासून मागणी करीत आहोत.

डॉ. दीपक सावंत : विधानसभेत जर हे निवेदन झाले असेल तर या ठिकाणी करण्यामध्ये कोणती अडचण आहे ?

श्री. मधुकर सरपोतदार : सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी या बाबतचे निवेदन सभागृहात होण्याची आवश्यकता आहे. नवी मुंबईमध्ये निवडणूक होत असल्यामुळे तेथील कायदा आणि सूव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या ठिकाणी जर त्या बाबतचे निवेदन झाले तर तेथील पोलीस याची नोंद घेतील व त्या ठिकाणी शांतता प्रस्थापित करतील.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी म्हटल्याप्रमाणे नवी मुंबईत निवडणूक होणार आहे. तसेच त्या ठिकाणी कायदा आणि सूव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

श्री. गुरुनाथ कुळकर्णी : काही अडचणी असल्यामुळेच याबाबतचे निवेदन माननीय मंत्रिमहोदयांना आज करता येणे शक्य नाही. तेव्हा सोमवारी निवेदन करण्यास माननीय मंत्रिमहोदयांना परवानगी द्यावी.

तालिका सभापती : माननीय मंत्रिमहोदय श्री. तटकरे यांनी सदरहू निवेदन सभागृहात होण्यासाठी प्रयत्न करावेत.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यक्तींवर फी आकारणीबाबत कोणत्याही प्रकारचे बंधन नसणे.

**मु.शी.**: राज्यात वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यक्तींवर फी आकारणीबाबत कोणत्याही प्रकारचे बंधन नसणे या विषयावरील डॉ. दीपक सावंत यांचा ठराव.

डॉ. दीपक सावंत ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

" राज्यात वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यक्तींवर फी आकारणीबाबत कोणत्याही प्रकारचे बंधन नसल्याने त्यांच्याकडून सर्वसामान्य जनतेची भरमसाठी फी आकारुन कण्यात येत असलेली लुबाडणूक, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी तसेच या संबंधात प्रभावी उपाययोजना सुचविण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नियुक्त करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

सभापती महोदय, सामाजिक दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचा हा ठराव आहे. यापूर्वी मेडिकल कौन्सिल ॲक्टमध्ये सुधारणा करण्यासाठी अशासकीय विधेयक सभागृहामध्ये आणण्यात आले होते. परंतु अशासकीय विधेयकाला नेहमी वाटाण्याच्या अक्षता लावण्यात येतात त्या प्रमाणे त्या विधेयकाचे झाले. त्यामुळे तो प्रश्न कित्येक वर्षापासून भिजत पडला आहे. पूर्वी वैद्यकीय व्यवसाय म्हणजे नोबेल प्रोफेशन म्हणून मानण्यात येत होतो. ज्याप्रमाणे काळ बदलत गेला. आणि कॉलेज ॲडमिशनसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांना लाखो रुपये मोजावे लागले. खाजगी महाविद्यालयाची संकल्पना ब्लेसिंग इन डिसगाईसमध्ये आली. तेव्हापासून याला आणखी ऊत आला आहे. ज्या बापांनी आपल्या मुलांसाठी लाखो रुपये खर्च करुन खाजगी महाविद्यालयामध्ये मेडिकल ॲडमिशन घेतले त्यांच्या मुलांनी लाखो रुपये कसे कमवायचे? त्याचे टारगेट असे झाले. तुमच्या आमच्या सारखा सामान्य कंझ्युमर त्यांच्याकडे जातो. त्यामुळे कालपरत्वे जस जसा काळ निघून गेला तसतशी वैद्यकीय क्षेत्रामधील डॉक्टर ही संज्ञा आहे त्या संज्ञेवरील लोकांचा विश्वास उडत गेला. लोकांना देखील असे वाटायला लागले की, हा एक विकत घेतलेला माणूस आहे. We are hiring the services of the doctors. आणि त्यामुळे वैद्यकीय संकल्पनेमध्ये डॉक्टर आणि पेंशंट हे नाते दिवसे ंदिवस अतिशय कमर्शिअलाईज व्हायला लागले. यातून या गोष्टीला सुरुवात झाली. मग आम्ही नवीन नवीन नर्सिंग होम टाकायला लागलो, नवीन नवीन अद्ययावत सुधारणा करावयास लागलो. आणि मग त्याचा भार रुग्णांवर पडत गेला. आज कोणत्याही प्रकारे कोणताही डॉक्टर किती फी आकारील हे कुणाला माहीत नाही. जोपर्यंत त्या डॉक्टरच्या केबिनचा दरवाजा उघडून आतमध्ये जाऊन पहात नाही, त्याची केबिन किती अद्ययावत आहे, किती ए.सी. मशीन लावल्या आहेत, रिसेप्शनिस्ट किती गोड आहे, किंवा त्याच्या केबिनमध्ये किती सुविधा आहेत या गोष्टी आपण जोपर्यंत पहात नाही तोपर्यंत त्याच्या फीची किती आकारणी असेल याची आपल्याला शाश्वती देता येत नाही. त्यामुळे मध्यमवर्गीय, गरीब कुटुंबातील माणूस, सामान्य रुग्ण असतो तो कन्सल्टिंग रुमचा दरवाजा ठोठावायचे डेअरींग करीत नाही. तसेच, जे मध्यमवर्गीय लोक त्याठिकाणी जातात ते देखील विचार करतात. सभापती महोदय, दुसरे असे की, डॉक्टरचा वापर रिएंम्बर्समेंटच्या बिलासाठी केला जातो. जे वैद्यकीय उपचार आपण घेतलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

नाहीत अशाप्रकारची बिले देणारे काही डॉक्टर आहेत. साधारणपणे कार्यालयामध्ये काम करणाऱ्या लोकांकडून हे काम करुन घेतले जाते व ते आपल्या कार्यालयामध्ये ती बिले प्रोडयूस करीत असतात. ती बिले तयार करतांना देखील भरमसाठ फी आकारली जाते. बिलाची जी काही मर्यादा असते त्या प्रमाणे त्यांना बिल तयार करुन दिले जाते. सभापती महोदय, दोन दिवसांपासून पंच तारांकित हॉस्पिटलसंबंधी चर्चा सुरु आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी लिलावती हॉस्पिटलच्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. या हॉस्पिटलमध्ये रुग्ण ज्यावेळी ॲडमिट होतो त्यावेळी त्याला जे बिल दिले जाते ते बिल पाहिल्यानंतर त्याला दुसरा हृदयविकाराचा झ
ाटका येण्याचा संभव असतो. बिलामध्ये अनेक प्रकारचे कर लावल्यामुळे तो आकडा फुगलेला असतो. कोणते कर लावलेले असतात हे त्याला माहीत नसते. ज्या प्रमाणे कन्सल्टिंग प्रॅक्टिस करणारे खाजगी डॉक्टर आहेत त्या प्रमाणे फॅमिली फिजिशियन ही संज्ञा जवळ जवळ अस्तित्वात नसल्यासारखी आहे, कालबाहय झाली आहे. आज काल सर्वांनाच कन्सल्टंटचे ओपिनियन पाहिजे असते कुणालाही डायग्नॉसिस करावयाचे नसते. सर्वांना वैद्यकीय चाचण्यांवर अवलंबून रहावयाचे असते. त्यांचा देखील काही दोष नाही. कंझ्युमर ॲक्टमध्ये जेव्हा एखादी केस जाते त्यावेळी त्यांना देखील विचारले जाते की, ही चाचणी कां केली नाही, ती चाचणी कां केली नाही? तुम्ही क्लिनिकल डायग्नॉसिसवर कसा भर दिला, कसे काय रोगाचे निदान केले? ही डॉक्टरांची बाजू बघितली तरी आज देखील ज्या चाचण्या केल्या जातात त्यामध्ये कोणत्या चाचणीची किती फी आकारावी याचे कुठेही मूल्यमापन होत नाही. आज सिटी स्कॅन एका क्लिनिकमध्ये केला तर तो 1200 रुपये, दुसरीकडे केला तर तो 1400 रुपये, तिसरीकडे केला तर तो 1600 रुपये आणि महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमधून जेव्हा जाणीवपूर्वक केस रेफर केली जाते त्याठिकाणी 800 रुपये घेतले जातात. या व्यवसायामध्ये सुध्दा कमिशन एजंटचा धंदा फोफावला गेला असल्यामुळे त्याला एक व्यापारी स्वरुप आले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

प्रत्येकाने पैसे कमवावेत, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. पण जेव्हा एखादा रुग्ण नडलेला असतो, पिडलेला असतो अशा वेळी त्याच्या वेदनेमध्ये भर घालण्याचा डॉक्टरांना आणि कमिशन एजंटनां कोणत्याही प्रकारचा हक्क नाही. आपण याबाबतीत सर्व विचार केला तर ही गोष्ट कठीण आहे आणि यापूर्वी या बिलाच्या बाबतीत उत्तर देताना तत्कालीन मंत्री महोदयांनी सांगितले होते की, तज्ज्ञांची समिती नियुक्त करणे कठीण आहे. आज मुंबईमध्ये किती डॉक्टर प्रॅक्टीस करतात, जे कन्सलटंन्ट आहेत ? किती डॉक्टर प्रॅक्टीस करतात, जे जनरल फिजीशिअन आहेत म्हणजे फॅमिली फिजिशिअन आहेत की, जे डिस्पेन्स करतात. दोन प्रकारच्या प्रॅक्टीसेस असतात. एक म्हणजे डिस्पेन्सिग प्रॅक्टीस आणि दुसरी कन्सलटींग प्रॅक्टीस. कन्सलटींग प्रॅक्टीस करणारे डॉक्टर आपल्याला कधी औषधे देत नाहीत. फारतर एखादे सॅम्पलचे औषध देतो. तिसरी गोष्ट म्हणजे लॅबोरेटरी इन्व्हेस्टीगेशन्स् असतात आणि प्रोसीजरल इन्व्हेस्टीगेशन्स्, ज्याच्यामध्ये सिटी स्कॅन येते, एम.आर.आय., एन्डोस्कोपिक निदान होते. अशा बाबतीत कुठेतरी दरपत्रक लावणे जरुरीचे आहे. कारण कोणी काहीही घेतो. एखादा डॉक्टर असे म्हणेल की, माझ्याकडे चार प्रकारच्या डिग्री आहेत आणि मी यातील स्पेशालिस्ट आहे आणि माझा याबाबतीतील अनुभव इतक्या वर्षाचा आहे. कारण डॉक्टरांच्या आणि वकिलांच्या व्यवसायामध्ये त्यांच्या अनुभवाप्रमाणे रेट वाढत असतात. आता येथे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीसाहेब उपस्थित नाहीत. जितका डॉक्टर अनुभवी, तितका त्याचा रेट जास्त. जो डॉक्टर अमेरिकेतून शिक्षण घेऊन आला असेल, त्याचा रेट आणखी जास्त असतो. तेव्हा याला कुठेतरी मर्यादा घालण्याची गरज आहे. कारण आज आपल्या देशातील लोकसंख्या पाहिली आणि त्यातील गरीबांचे प्रमाणे पाहिले, त्यातल्यात्यात दारिद्रयरेषेखालील लोकांचे प्रमाण पाहिले तर केवळ पैसे नसल्यामुळे अशा प्रकारचे रेट देऊन उपचार घेणे या लोकांना शक्य नाही आणि त्यामुळे एखाद्या रुग्णाने आपल्या उपचार घेण्याच्या मुलभूत हक्कापासून वंचित राहणे हे लोकशाहीला धरुन नाही आणि ते आपल्या घटनेला देखील धरुन नाही. सभापती महोदय, यासाठी युती शासनाने "जीवनदायी योजना" काढली. त्या योजनेमध्ये साधारणपणे या सर्व लोकांना अंतर्भूत करु असे वाटले होते. पण शासनाचे देखील त्याकडे लक्ष नाही. शासनाने पंचतारांकित हॉस्पीटल्स्मध्ये ही जी जीवनदायी योजना राबवावयाची आहे, त्याचे तीनतेरा वाजलेले आहेत. एकाही पंचतारांकित हॉस्पीटलमध्ये जीवनादायी योजनेचा एकही रुग्ण नाही. याबाबतीत

. . . .3 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

जर गेल्या वर्षीचा आढावा पाहिला तर जास्तीतजास्त ऑपरेशन्स् कोल्हापूर मध्ये झालेली आहेत. मी चुकीचे सांगत असेन, तर माननीय मंत्री महोदयांनी ते दुरुस्त करावे. कोल्हापूर येथे सगळयात जास्त ऑपरेशन्स् झालेली आहेत. ते कसे झाले ? काय झाले ? ते तत्कालीन मंत्र्यांना माहिती आहे. या सभागृहात देखील अनेक वेळा हा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यासाठी माझी आपल्यामार्फत शासनाला आणि माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपल्याला जर कायद्यात बदल करावयाचा नसेल तर तात्पुरती आपण एक तज्ज्ञांची समिती नेमावी. या तज्ज्ञांच्या समितीने आढावा घ्यावा की, साधारणपणे कन्सलटंन्टकडे जाणा-या माणसाचे आर्थिक मान काय आहे ? जनरल फिजीशिअनकडे जाणा-या माणसाचे आर्थिक मान काय आहे ? तसेच जी लोक खाजगी रुग्णालयात उपचार घेतात, त्यांचे आर्थिक मान काय आहे ? अशा प्रकारे लोकांचे आर्थिक मान काय आहे याची माहिती घ्यावी. त्याचप्रमाणे डॉक्टरांचे रेटस् काय आहेत ? समजा एखादा डॉक्टर कन्सलटींग फी 500 रुपये घेत असेल, तर तो जे 500 रुपये घेतो ते बरोबर आहे की चुक आहे हे आपण सांगत नाही. पण आपण याबाबतीत मर्यादा घालून देऊ शकतो. तो 500 रुपये घेईल, 200 रुपये घेईल किंवा एखाद्या पेशंटकडून काहीही घेणार देखील नाही. पण अमुक इतक्या रकमेच्याबाहेर फी नसावी म्हणजे 500 ते 1000 रुपयापर्यंत. असा तुम्ही याबाबतीत एक दंडक घालून द्यावा आणि यावर कायद्याने बंदी आणण्यापेक्षा आपण जास्तीतजास्त कौन्सिलींग करा . डॉक्टरांच्या जेवढया-जेवढया मेडिकल असोसिएशन आहेत, त्या सर्वांना कॉन्फीडन्स्मध्ये घ्यावे आणि आपल्याला याचे कदाचित ताबडतोब परिणाम दिसणार नाहीत पण याबाबतीत दूरगामी परिणाम निश्चित दिसतील.आणि लोकांमध्ये डॉक्टरांच्या बद्दल विश्वास निर्माण होईल. डॉक्टर म्हणजे केवळ पांढ-या सुटातील लूटारु नाहीत. याबाबतीत मी एकाचा लेख वाचला, त्यानंतर मला देखील खूप वाईट वाटले होते. त्याने म्हटले होते की, हे पांढ-या सुटातील लुटारु आहेत. तर याबाबतीत देखील आपण या संज्ञेला एक तडा जाईल अशी भूमिका बजावली जाईल आणि लोकांना डॉक्टर या जमातीविषयी अतिशय विश्वास वाटेल आणि ते दवाखान्यामध्ये विश्वासाने जातील आणि विश्वासानेच ट्रिटमेंट घेऊन, म्हणजे उद्याच्या बिलाची त्यांना जी चिंता असते, ती आज मोडलेली असेल. कारण त्यांना माहिती असेल की, या डॉक्टरकडे गेल्यानंतर मला किती पैसे द्यावे लागणार आहेत. या हॉस्पीटलमध्ये गेल्यानंतर किती बिल होईल. याचा साधारणपणे लोकांना अंदाज येईल.

. . . .3 ई-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्याची मी शासनाला शिफारस करतो. शासनाने याबाबतीत सर्वंकश विचार करणे आवश्यक आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

विशेषत: मी चाचण्यांबाबत सांगतो की, लॅबोरेटरि चार्जेस किती असावेत, सी.टी.स्कॅनचे चार्जेस किती असावेत, एम.आर.आयचे.चार्जेस किती असावेत, ई.सी.जी.घेण्याचे चार्जेस किती असावेत, ई.ई.जी.चे चार्जेस किती असावेत, यावर देखील शासनाने बंधन आणावे. त्यांना एक अत्युत्तम मर्यादा ठरवून द्यावी, की ज्याच्या बाहेर कोणाचेही चार्जेस नसतील. तसेच पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये आज सकाळी जसा मॉनिटरिंग सिस्टिमचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकरसाहेबांनी केला. तशा प्रकारची एक मॉनिटरिंग सिस्टिम या सर्व हॉस्पिटलमध्ये करावी. हॉस्पिटलमध्ये, विशेषत: पंचतारांकित हॉस्पिटलस्मध्ये, खाजगी रुग्णालयांत काय चालले आहे? याचा आढावा घेऊन रुग्णांना दिलासा द्यावा आणि आजारानंतर उद्भवणा-या समस्येनंतर म्हणजे जी पैशाची विवंचना उद्भवते त्यातून मुक्तता द्यावी, असे या ठरावाद्वारे मी मांडू इच्छितो.

ठराव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापति महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत ने बहुत ही महत्वपूर्ण विषय के बारे में अशासकीय ठराव पेश किया है. प्राइवेट प्रॅक्टिशनर्स के द्वारा पूरे महाराष्ट्र में जो सेवा उपलब्ध होती है, उसके बदले में उनकी जो कन्सलटेन्सी फीस होती है, हॉस्पीटल या लेबोरेटरी के जो चार्जस होते हैं, उनके ऊपर किस तरह से कंट्रोल किया जाए और किस तरह से उनकी सेवाओं को गरीबों तक पहुंचाने का प्रयत्न किया जाए, इस बारे में कुछ मुद्दे मा. सदस्य ने उपस्थित किए हैं. मा. सदस्य ने बहुत ही सटीक प्रश्न उपस्थित किया है और वे स्वंय भी एक डॉक्टर होने के नाते इस व्यवसाय से संबंध रखते हैं. उनको पता है कि आजकल मेडीकल प्रोफेशन में भी दूसरे सभी क्षेत्रों की तरह, चाहे वह कानून का क्षेत्र हो, चाहे वह इलेक्ट्रॉनिक्स का क्षेत्र हो, सभी क्षेत्रों में पिछले 10 साल में बहुत तेजी से प्रगति हुई है. 20-25 साल पहले डॉक्टर के पास जाने के बारे में सोचते थे तो हम फॅमिली डॉक्टर के पास जाते थे और जो भी बीमारी होती थी तो डॉक्टर अपने स्तर पर दवाई देता था और हम लोग डॉक्टर की लाल, पीली और सफेद गोली खाकर 2-3 दिन में ठीक हो जाते थे. अगर कुछ सीरियस बात होती थी तो वे बोलते थे कि सरकारी हॉस्पीटल में जाकर दिखा लो. फॅमिली डॉक्टर बहुत ही रेयर केसस में मरीज को सरकारी हॉस्पीटल के लिए रेफर करते थे.

सभापति महोदय, मा. सदस्य ने कन्ज्यूमर एक्ट की चर्चा की है. अब तो हर डॉक्टर यह सोचता है कि मेरे पास जो भी मरीज आया है तो उसका पेशाब, ब्लड इत्यादि का टॅस्ट किया जाए, उसका एक्स-रे किया जाए, उसकी सोनोग्राफी की जाए. मेडीकल साइंस बहुत एडवांस होता जा रहा है. अभी हम बोलते हैं कि ई.एन.टी. के लिए एक डॉक्टर है, आगे चलकर ई, एन और टी के लिए अलग अलग डॉक्टर हो जाएंगे और उससे भी आगे जाकर लेफ्ट ईयर के लिए अलग और राइट ईयर के लिए अलग डॉक्टर हो जाएंगे. डॉक्टर के पास जाकर पूछना पड़ेगा कि उसने किसमें स्पेशलाइजेशन किया है. मा. सदस्य से मैं यह भी कहना चाहता हूँ कि लोगों की अपेक्षाएं भी काफी बढ़ गई हैं. जब हम अपने विधान सभा क्षेत्र में काम करते हैं तो हमारे पास हॉर्ट, कॅसर, किडनी जैसी बीमारियों के गरीब मरीज आते हैं तो मैं उनसे विनंती करता हूँ

... 3G2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . .श्री. सुरेश शेट्टी

कि के.ई.एम. या जे.जे. हॉस्पीटल में ऑपरेशन करा लीजिए. ते म्हणतात की, साहेब, मला के.ई.एम.ला जावयाचे नाही. मला जे. जे. ला जावयाचे नाही. मला हिंदुजाला चिठ्ठी द्या, मला नानावटीला चिठ्ठी द्या. वे हमसे कहते हैं कि आप नानावटी हॉस्पीटल के लिए, हिंदुजा हॉस्पीटल के लिए चिठ्ठी दीजिए, हम अपना ऑपरेशन वहां पर कराएंगे. मरीज का प्रफरेंस प्राईवेट डॉक्टर्स की तरफ अधिक होता है. प्राईवेट डॉक्टर्स का चार्ज अनुभव के मुताबिक होता है, उसे जितना ज्यादा अनुभव होता है, उतना ज्यादा चार्ज वह लेता है, चाहे भले ही उसकी योग्यता का स्तर अधिक न हो. इस चार्ज में उसके क्लीनिक का रख-रखाव और ड्रेस भी शामिल है. जिस प्रकार से कुछ वकील और डॉक्टर्स बोगस होते हैं, उसी प्रकार से राजनीति में भी बोगस लोग आ गए है. सिर्फ डॉक्टर लोग बोगस हों, ऐसा नहीं है, राजनीति में भी हम बोगस लोगों को देखते हैं. आजकल हर प्रोफेशन में बोगस लोग हैं. जो डॉक्टर्स विदेश में जाकर पढ़कर आते हैं और यहां पर प्राईवेट प्रॅक्टिस करते हैं तो उनको खुद की जगह लेनी पड़ती है, खुद का स्टाफ रखना पड़ता है, ए.सी. की व्यवस्था करनी पड़ती है तो फिर वह उसके हिसाब से चार्ज करता है. मा. सदस्य ने लेबॉरेटरी के बारे में प्रश्न उपस्थित किया है कि एक नॉर्मल रेट फिक्स करनी चाहिए. अगर कोई अपनी लेबॉरेटरी के बारे में लेटेस्ट मशीन खरीदता है तो अगर एक मशीन सीमेन्स की 10 रुपए में आती है, फिलिप्स की 12 रुपए में आती है तो तोशिबा की 15 रुपए में आती है. अलग अलग कम्पनी के अलग अलग रेट होते हैं. उदाहरण के तौर पर एक शर्ट अगर हम फाउन्टेन में खरीदते हैं तो अलग रेट रहती है और वही शर्ट हम वार्डन रोड में खरीदते हैं तो दूसरी रेट रहती है. लेबॉरेटरी में इस्तेमाल की जाने वाली मशीनरी की कीमत कम्पनी के हिसाब से अलग अलग रहेगी. अगर वह 2 करोड़ रुपए इनवेस्ट करता है तो उसका हेतु यह होगा कि . . . . . .

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सिटीस्कॅन कंपनीचा विषय काढला म्हणून मी सांगतो. शासन सर्वात जास्त पैसे देऊन सिटीस्कॅन मशीन विकत घेते. शासनाचा रेट वेगळा असतो आणि खाजगीमध्ये वेगळा रेट असतो. त्यामध्ये काही लाख रुपयांचा फरक आहे. पाहिजे तर मी बिलासह सिध्द करण्यास तयार आहे. यामध्ये तो मुद्दा नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी असा मुद्दा मांडला की, अमूक कंपनीचा दर हा आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ 17:15 वा.

. . . . . .डॉ. दीपक सावंत

परंतु ज्यावेळी तुमचे शासकीय हॉस्पीटल सिटीस्कॅनसाठी रेफर करतात त्यावेळी ते 600 रुपयात करतात की नाही ? ज्यावेळी तुम्ही स्पेशल टेस्टसाठी प्रायव्हेटमध्ये पाठविता तेव्हा तुम्हाला ओब्लाईज करण्यासाठी 50 टक्केपेक्षा खालच्या किमतीत करतात की नाही ? तुम्हाला बेसलाईन माहीत आहे.

श्री. सुरेश शेट्टी : मी माझ्या भाषणाची ग्राऊंड प्रिपेअर करीत आहे. शासन के हॉस्पीटल्स में हम जितने कम पैसे में सुविधा देते हैं, उतने कम पैसे में प्राईवेट हॉस्पीटल्स सुविधा नही दे सकते. उदाहरण के तौर पर जे.जे. हॉस्पीटल में बिस्तर का चार्ज 10 रुपए है जो कि किसी भी प्राईवेट हॉस्पीटल में नहीं हो सकता. मा. सदस्य ने सीटी स्कॅन का मुद्दा पेश किया है तो सरकारी हॉस्पीटल में हम जो चार्ज करते हैं, वह सब्सिडाइज्ड होता है. प्राईवेट प्रॅक्टिशनर्स वही रेट नहीं ले सकते.

. . . नंतर खंदारे/तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : ज्यावेळी जे.जे.मधील आपली सी.टी.स्कॅनची मशीन बंद आहे म्हणून खाजगी प्रॅक्टीशनर्सकडे पाठवितात तेच प्रॅक्टीशनर्स 600 रुपयामध्ये स्कॅनिंग करतात की नाही ?

श्री सुरेश शेट्टी : आम्ही तपासून घेवू. This is a general discussion on the resolution.

Dr. Deepak Sawant : But this is a general practice.

Shri Suresh Shetty : You point out it. We will enquire.

सभापति महोदय, लबॉरटरी के बारे में चर्चा हुई है. लबॉरटरी के जो चार्जेस है, वे अलग अलग जगह पर अलग अलग है. इसी तरह से डॉक्टर के भी चार्जेस अलग अलग है. लेकिन एक बात निश्चित है कि, अगर कोई डॉक्टर 100 रुपये फीस लेता है और मरीज यह समझता है कि यह डॉक्टर ज्यादा फीस लेता है, तो मरीज उसके पास न जाए क्योंकि कोई डॉक्टर यह नहीं कहता कि मेरे पास आओ. जो डॉक्टर प्रेक्टिस करता है, it is up to him to decide as to how much he will charge. But, it is up to the patient to decide whether to go to that doctor or not. मेरे पास ताकत (आर्थिक क्षमता ) है तो मैं मंहगी फीस वाले डॉक्टर के पास जाऊंगा, अच्छी लबॉरटरी में जाऊंगा, फाईव स्टार हॉस्पिटल में जाऊंगा. मैं यह नहीं कहता कि फाईव स्टार हॉस्पिटल में ही अच्छा इलाज होगा, हमारे शासकीय अस्पतालों में भी अच्छा इलाज होता है. यह सही है कि हमारे शासकीय अस्पतालों में फाईव स्टार हॉस्पिटल की तरह ॲट्मस्फिअर नहीं होता है. जे.जे. हॉस्पिटल, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल इत्यादि शासकीय अस्पतालों में एक दिन में करीब एक हजार रोगी आते हैं, जबकि लीलावती हॉस्पिटल, हिन्दूजा हॉस्पिटल, ब्रीच कॅन्डी हॉस्पिटल इत्यादि नीजि अस्पतालों में एक दिन में केवल 100 रोगी आते हैं और वे भी अपाइंटमेंट लेकर आते हैं. इन दो प्रकार के अस्पतालों में यह फर्क है. मुंबई के बाहर के मरीज व्ही. टी. स्टेशन पर उतरने के बाद सीधे हमारे शासकीय अस्पताल में भरती हो जाते हैं और इलाज पूरा हो जाने के बाद भी जाना नहीं चाहते हैं, क्योंकि वहां उन्हें 10 रुपये में ब्रेक फास्ट, लंच और डिनर मिल जाता है. इस तरह की सुविधाएं शासकीय अस्पतालों में दी जाती है, इसी कारण मरीज वहां ज्यादा संख्या में आते हैं. कल ही पुणे स्थित ससून हॉस्पिटल के बारे में चर्चा हो रही थी, वहां एक दिन में 150 मरीज आते हैं. मगर लीलावती हॉस्पिटल में एक





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सुरेश शेट्टी.....

दिन में 5-6 मरीज आते हैं. क्योंकि वे कहते हैं, ज्यादा संख्या में मरीजों को भरती करना हमसे नहीं होगा, हम 5-6 मरीज ही लेंगे. इसलिए मैं कहना चाहता हूं कि शासकीय अस्पताल में जो सुविधा उपलब्ध की जाती हैं वह सब्सिडाइझ् है और हम गरीब जनता को यह सुविधा देते हैं. फाईव स्टार हॉस्पिटल में जाने वाले लोग अलग है, वे गरीब लोग नहीं है. यहां पर रीइम्बर्समेंट की बात की गई है. बीमा कंपनियां स्वास्थ्य का बीमा करती है, रीइम्बर्समेंट करती है. लेकिन बीमा कंपनियां भी छानबीन करने के बाद ही रीइम्बर्समेंट करती है. प्राईवेट कंपनियों के भी रीइम्बर्समेंट के संबंध में कुछ नार्म्स होते हैं. मैं इसके बारे में विस्तार से चर्चा करना नहीं चाहता. लेकिन एक बात यह बताना चाहता हूं कि, practicing is one's own constitutional right. It is given under Article 19 (1)(g) of the Constitution of India. यह मूलभूत अधिकार डॉक्टरों को प्राप्त है और किसी भी सरकार को इस संबंध में कानून बनाने का या हस्तक्षेप करने का अधिकार नहीं है. हाँ, एक बात जरुर है कि हम एक्स्प्लाइटेशन के बारे में सोच सकते हैं, हॉस्पिटल की फंक्शनिंग के बारे में, डॉक्टर की इफिशन्सि के बारे में, नेग्लिजन्स के बारे में बात कर सकते हैं, चर्चा कर सकते हें और नियम भी बना सकते हैं.

यानंतर श्री शर्मा...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री सुरेश शेट्टी

हम लोग नर्सिंग होम के बारे में कानून बनाने की सोच रहे हैं, ताकि महाराष्ट्र के सारे प्राईवेट हॉस्पीटल्स के बारे में मॉनीटरिंग कर सकें. अगर किसी मरीज को कुछ हो गया या प्राईवेट हॉस्पीटल में उसकी मृत्यु हो गयी और वह प्रश्न जब सभागृह में आता है तो हम लोग कहते हैं कि प्राईवेट हॉस्पीटल के बारे में हमें कुछ पता नहीं कि वहां पर क्या चल रहा है. वहां पर जाकर पुलिस जांच करती है या फिर हम डायरेक्टर के ऑफिस से लोगों को भेजते हैं. प्राइवेट हॉस्पीटल्स के ऊपर नियंत्रण लाने के लिए सरकार कानून बनाने वाली है. इस विषय के ऊपर चर्चा होनी चाहिए. आने वाले दिनों में एक अच्छा कानून इस सदन में आएगा. हम चाहते हैं कि प्राईवेट प्रॅक्टिशनर्स के ऊपर कुछ नियंत्रण हो, उनके ऊपर कुछ जिम्मेदारी हो. मैं आज न्यूजपेपर में हाईकोर्ट के जजमेंट के बारे में पढ़ रहा था. उसमें लिखा था "Social obligation of the people is absolutely necessary." हम लोगों में अवेयरनेस लाकर डॉक्टर्स से अपील कर सकते हैं कि अगर आप 10 पेड पेशेंट को देखते हो तो एक फ्री पेशेंट भी आपको देखना चाहिए. इस प्रकार का अवेयरनेस प्रोग्राम हम और डॉ. दीपक सावंत मिलकर लॉंच कर सकते हैं. डॉ. दीपक सावंत ने जो भावना यहां पर रखी है, शासन उस भावना की कद्र करता है कि गरीब लोगों और लोअर मिडिल क्लास के लोगों को अच्छा ट्रीटमेंट मिलना चाहिए और उनको भी अच्छे डॉक्टर्स का लाभ मिलना चाहिए. इस भावना के साथ डॉ. दीपक सावंत ने यहां पर ठराव पेश किया है, मैं उनका अभिनन्दन करता हूँ और शासन उनकी भावना से सहमत है, इसलिए मैं उनसे विनंती करता हूँ कि वे इस ठराव का वापस ले लें.

3I-3J-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांच्या एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, यासंदर्भात कायदा बनविण्यासाठी मी हा ठराव मांडलेला नाही. कायदा बनणार देखील नाही. परंतु अशा प्रकारे जी प्रक्टीस चाललेली आहे तिचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नियुक्त करावी आणि त्या समितीकडून फीडबॅक घ्यावा अशी शिफारस मी माझ्या ठरावाद्वारे केलेली आहे. माझ्या भाषणाच्या सुरुवातीलाच मी सांगितले आहे की, अशा विषयाचे एक अशासकीय विधेयक सभागृहामध्ये आले होते आणि नेहमीच्या प्रथेप्रमाणे ते मागे घ्यायला लावले होते. आपण जर याबाबतीत समिती नेमली तर निदान अशा प्रकारच्या प्रॅक्टीसवर काही तरी कंट्रोल आहे हे तरी सर्वसामान्य जनतेला कळू शकेल, हीच हा ठराव आणण्याच्या पाठीमागील माझी भावना आहे. वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यक्तींकडून जनतेचे जे एक्स्प्लायटेशन होते ते कमी व्हावे हा उद्देश आहे. हे एक्प्लॉयटेशन आपण थांबवू शकणार नाही याचीही मला कल्पना आहे.

श्री. सुरेश शेट्टी : याबाबतीत कायद्यामध्ये तरतूद नाही त्यामुळे कमिटी नेमून आपण काय करणार ? परंतु माननीय सदस्यांना जी जी काही माहिती हवी असेल ती माहिती आपण डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्येकेशनच्या माध्यमातून गोळा करु आणि त्यासंदर्भात आपण बसून चर्चा करु.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

--

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री याठिकाणी निवेदन करण्यासाठी आलेले आसहे. इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्राच्या कॉलम आठमध्ये एक शासकीय अधिकारी श्री. विनय मोहन लाल यांना शंकरन समितीने प्लॉट स्कॅण्डलबद्दल दोषी धरल्याची बातमी प्रसिध्द झाली होती. त्यासंदर्भात मा. मुख्यमंत्र्यांनी वक्तव्य केलेले आहे. यासंदर्भात निवेदन करण्याबाबत शासनाला सांगितलेले होते. या गोष्टीला तीन दिवस होऊन गेले. हे निवेदन झाले तर बाहेर जी काही चर्चा होते ती चर्चा होणार नाही. तेव्हा याबाबतीत लवकरात लवकर निवेदन व्हावे.

श्री. आर.आर.पाटील : लवकरात लवकर निवेदन करण्यात येईल. सभापती महोद, आज या सभागृहामध्ये निवेदन करावे अशा प्रकारचे निर्देश आपण दिलेले होते. या सदनामध्ये योग्य माहिती दिली पाहिजे आणि त्यासाठी तेवढा तरी कालावधी असला पाहिजे अशी माझी विनंती आहे. मी खालच्या सभागृहातील कामामध्ये व्यस्त असल्यामुळे या सभागृहामध्ये निवेदन करण्यासाठी मला थोडा वेळ लागला त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: श्री. शिवाजी तळेकर याची जामिनावर झालेली सुटका

**मु.शी.**: श्री. शिवाजी तळेकर याची जामिनावर झालेली सुटका यासंबंधी मा.सदस्य श्री. दिवाकर रावते व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंबंधी मा. उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व इतर सन्माननीय सदस्यांनी श्री. शिवाजी तळेकर, तत्कालीन कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित (महानंद) यांच्याविरुध्द विहित कालावधीत दोषारोपपत्र दाखल न झाल्याने त्यांची जामिनावर झालेल्या सुटकेबाबत जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता त्यासंदर्भात आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढील प्रमाणे निवेदन करीत आहे :-

**निवेदन**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मा.उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी निवेदन वाचले.)

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ...

सभापती महोदय,तरी सुध्दा या गोष्टीचे विशेष महत्व लक्षात घेऊन उरलेल्या तीन महिन्यांमध्ये खास अधिकारी नेमून हे चार्जशीट कोर्टापुढे सादर करावे अशा प्रकारच्या सूचना गृहखात्याने दिलेल्या आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मागणी केल्यानंतर आज निवेदन आले. पण मा.उपमुख्यमंत्र्यांचे त्या दिवसाच्या भाषणाचे रेकॉर्ड तपासून पाहिले तर 60 दिवसापर्यंत त्यांना आरोपपत्र मिळू नये म्हणजे Is it not a lapse on the part of the Govt ? खरे म्हणजे माहिती इतकी उपलब्ध आहे की त्याच्या आधारावर चार्जशीट दाखल करु शकले असते. ॲडिशनल चार्जशीट कोर्टाला नंतर सादर करता आले असते. हे न करण्यामध्ये उद्देश काय ? म्हणजे कुणीतरी या अधिका-याला वाचविण्याचा निश्चित प्रयत्न करीत आहे असा अर्थ त्यातून निघतो. त्यामुळे या सगळया गोष्टींमुळे त्यांची आपोआप सुटका होणार आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आधी प्राथमिक चार्जशीट नंतर ॲडिशनल चार्जशीट असे करण्याची या केसमध्ये आवश्यकता नाही. तो आरोपी काही येथे नव्हता. पोलिसांच्या ताब्यात नव्हता. न्यायालयीन कोठडीत आर्थर रोड जेलमध्ये होता. पोलिसांना तो तपासासाठी उपलब्ध होता अशातला भाग नाही. आज जो तपास करावयाचा आहे तो केवळ कागदपत्रांच्या आधारे करावयाचा आहे. 1984 सालापासूनचे कागदपत्र तपासावयाचे आहेत. काही ठिकाणी ऑडिट करुन घ्यावयाचे आहे त्यामुळे कालावधी लागत आहे. अन्यथा तो कुठे अडथळा करणार आहे असे नाही. संपूर्ण कागदपत्र ॲसीबी ला प्राप्त झालेले आहेत. त्यांना आज कुणी वाचवील असा अर्थ जर कुणी काढत असेल शंका उपस्थित करीत असेल तर त्याला कोण वाचवू शकलेले नाही म्हणून इतक्या वर्षांनी ही धडाडीची कारवाई झालेली आहे. ज्या यंत्रणा प्रामाणिकपणाने काम करीत आहेत त्या नाउमेद होतील असे वक्तव्य होता उपयोगी नाही. एका बाजूने एवढया वरिष्ठ अधिका-यावरील कारवाई महाराष्ट्रामध्ये खूप वर्षांनी केलेली आहे. करणा-याला शाबासकी देण्याऐवजी दोष देण्याचा प्रयत्न कुणीही करता उपयोगाचा नाही. मी सदनाला विश्वास देतो की याला कुणीही ....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी दोष देत नाही. परंतु वस्तुस्थिती जी समोर दिसते आहे ती मांडण्यामध्ये दोष आहे अशातला भाग नाही.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, याला कुणीही वाचवू शकणार नाही. जे कागदपत्र आणि अपसंपदा मिळालेली आहे ती उघडच झालेली आहे. तिच्यासंबंधी पुरावे गोळा केले जातील आणि चार्जशीटच्या माध्यमातून सादर केले जातील. आणखी काही माहिती येत आहे. एमपीएससीच्या केसनंतर महाराष्ट्रात अेसीबीला 15 दिवस सलग आरोपी आपल्या ताब्यात मिळाला ही नं. 2 ची केस आहे. एमपीएससीच्या केसनंतर इतक्या कालावधीसाठी अेसीबीच्या ताब्यात राहणे पोलीस कस्टडी इतके दिवस मिळणे ही पहिली केस आहे. पोलीस चुकलेले आहेत,अेसीबी चुकलेले आहेत अशी परिस्थिती घडलेली नाही. पण मा.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत की असे लोक सुटू नयेत त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. सर्वांगीण हे लोक उघडे पडले पाहिजेत त्याबाबतीत पूर्णपणे लक्ष दिले जाईल. कालबध्द कार्यक्रम देऊन चार्जशीट तयार केले जाईल ज्या आणखी गंभीर मोठया तक्रारी यासंदर्भात आलेल्या आहेत ती सुध्दा चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय .सदस्य श्री.सरपोतदार यांनी ठिकाणी जो विषय मांडला आहे . त्या संदर्भात कोणाचेही मनोबल खच्ची करावे असे त्यांना म्हणावयाचे नाही.किंवा आमचा तसा प्रयत्नही नाही.. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यानी या सबंधी अत्यंत धडाडीने निर्णय घेता आहे . त्याला ताकद मिळावी हा आमचा त्या मागचा उद्देश आहे. तळेकर प्रकरणात कशा कशा प्रकारे, काय काय होत गेले, हे आपल्यालाही माहीत आहे. इकडे माहीत आहे, वरती माहीत आहे, सगळयांना माहीत आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे या विषयामध्ये जे योग्य करतात त्यांचे हात बळकट करण्याचा आमचा प्रयत्न आहे. तळेकर यांनी 12 ते 5 या वेळेत एकदा हजेरी दिली आणि जर ते मोकळे सुटले तर काय होईल ? त्यांनी आतापर्यन्त काय केले यापेक्षा पुढे ते काय करु शकतात हेही आपल्याला माहीत आहे. त्यामुळे यासंबधी आम्ही आमची काही मते मांडली असतील तर त्यावर कृपया आपण शंका व्यक्त करू नका असे मला सांगावयाचे आहे. आम्ही आपल्या मतांच्या बाबतीत जशी शंका व्यक्त करीत नाही तशी आपणही आमच्या मतांच्या बाबतीत शंका व्यक्त करू नका. अशा प्रकारे जर कोणी धडाडीने निर्णय घेत असेल तर त्यांचे हात बळकट करण्याचा आमचा उद्देश आहे. त्यामुळे लॅप्सेसच्या संबंधाने म्हणणे मांडत असतांना माननीय सदस्यांनी सांगितले, त्याप्रमाणे अधिक कडक काही करता आले तर करावे. उदा. पोलीस कस्टडीतून मॅजिस्ट्रेट कस्टडीमध्ये जातांना काही झाले असेल. त्यामुळे ते चौकशीसाठी आपल्याला उपलब्ध होत नाहीत. तेव्हा केवळ ते चौकशीला उपलब्ध होत नाहीत एवढा मुद्दा नाही,` बाहेर आल्यानंतर अनेक ठिकाणी ते प्रभाव टाकू शकतात, याची देखील स्वाभाविकपणे काळजी घ्यावी लागेल. तेव्हा या संदर्भात अधिक काळजी घेतली जावी, याच उद्देशाने त्यांनी आपले म्हणणे मांडलेले आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय,त्याकडे पूर्णपणे लक्ष ठेवले जाईल. पुरावा नष्ट करणे, तपास कामात हस्तक्षेप करणे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे असा प्रकार करतांना जर ते सापडले तर त्यांची जामीन प्रक्रिया रद्द करण्याची प्रोसेस सुरू केली जाईल. वेगवेगळया यंत्रणेमार्फत या सगळया बाबीवर लक्ष ठेवले जाईल. त्यांच्याकडे जी अपसंपदा सापडलेली आहे, त्यापेक्षा सुध्दा आणखी काही मालमत्ते संबंधीचे पुरावे लोक आणून देत आहेत, त्याचीदेखील छाननी केली जाईल. सभापती महोदय, अशाप्रकारच्या गुन्हेगारांना सोडण्याची शासनाची निश्चित भूमिका नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री..अनंत तरे)** :सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. महानंदचे अधिकारी श्री.राजीवजी यांच्याकडे गुंड पाठविणे, त्यांना धमकीचे फोन येणे असे प्रकार होत असल्याची मला माहिती मिळालेली आहे., श्री.राजीव यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही परिस्थिती खरी आहे तेव्हा या सबंधीची माहिती जाणून घेऊन त्यांना संरक्षण द्यावे.अशी माझी विनंती आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : महानंदच्या व्यवस्थापकीय संचालकांना काही धमक्या दिल्या जातात याची माहिती आम्हालाही मिळालेली आहे. ज्यांच्यावर आरोप आहेत, ते आता बाहेर आहेत. ते सर्व कामाच्या बाबातीत तसे कुशल आहेत. ते बाहेर मोकळे झाल्यानंतर वजनदार तर आहेतच.. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एकंदरीत जी माहिती दिली, त्यामुळे त्यांचे थोडे वजन कमी झाले असेल असे मला वाटते. पण उर्वरित वजन वापरून देखील ते अनेक प्रकार करू शकतात. या दृष्टीकोनातून आताचे जे व्यवस्थापकीय संचालक आहेत, त्यांना कोणापासून कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेण्याची खूप आवश्यकता आहे. व्यवस्थापकीय संचालक म्हणून आल्यापासून त्यांनी महानंद डेअरीच्या कारभारावर लक्ष देण्यास सुरुवात केली आहे.त्यामुळेच हे प्रकरण पुढे उघडकीस आले आहे. त्यांनी लक्ष घातले नसते तर हे सगळे प्रकरण उघकीस आले नसते. आता पर्यन्तच्या सगळया लोकांना त्यांनी मॅनेज केले, पण श्री.राजीव मॅनेज होऊ शकले नाहीत, त्याचा परिणाम म्हणून श्री.तळेकर हे तुमच्या ताब्यात आहेत अन्यथा तुमच्या ताब्यात ते आले नसते. या प्रकरणी श्री. राजीव यांना धमक्या येत आहेत तेव्हा त्यांना संरक्षण देण्याची व त्यांची काळजी घेण्याची खूप आवश्यकता आहे.

श्री.आर.आर.पाटील : एका दुसऱ्या बैठकीच्या संबंधाने श्री.राजीव यांची आणि माझी कालच भेट झाली होती. त्यांना धोका असल्याचे सांगितले नाही किंवा त्यांनी तशा प्रकारच्या संरक्षणाची मागणीही केलेली नाही. या संदर्भात मी स्वत: सी.पीं.यांना माहिती घ्यावयाला सांगेन. त्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता असेल तर त्यांना संरक्षणही दिले जाईल. श्री.काझी नावाच्या अधिकाऱ्यांना धमक्या येतात, त्यांना फोन केले जातात असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्याचीही चौकशी करण्यात येईल.

**तालिका सभापती ( श्री.अंनत तरे )** यानंतर दुसरे निवेदन करण्यात येईल

---

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : नवी मुंबई महापालिकेची निवडणूक शांततेच्या वातावरणात होण्याबाबत.

**मु.शी.** : नवी मुंबई महापालिकेची निवडणूक शांततेच्या वातावरणात होण्याबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांचे निवेदन.

----

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, नवी मुंबईच्या बाबतीत, तेथे होत असलेल्या निवडणुका आणि तेथील गुन्हेगारी संबंधात आज या सदनामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. तीन दिवसापूर्वी देखील या सदनाच्या लोकप्रतिनिधींनी माझ्याकडे हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे त्या संबंधात तेथील आयुक्तांकडून मी पूर्णपणे माहिती घेण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि त्या अनुषंगानेच मी आपल्यापुढे त्यासंबंधात निवेदन करणार आहे.

माननीय सभापती महोदय, नवी मुंबईतील निवडणुका शांततेच्या वातावरणात व्हाव्यात यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ तेथे उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. अन्य ठिकाणांहून म्हणजे पुणे, रायगड येथून देखील त्यासाठी पोलीस बळ मागविण्यात आलेले आहे. त्याचबरोबर तेथे एसआरपी देखील ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे तेथील निवडणुका शांततेच्या वातावरणात पार पडतील असा मला विश्वास आहे. माननीय सभापती महोदय, राज्यामध्ये औरंगाबाद आणि नवी मुंबई या दोन ठिकाणी निवडणुका होत आहेत. निवडणुकीच्या दरम्यान आरोप-प्रत्यारोप नेहमीच केले जातात आणि दोन्ही बाजुंनी पोलिसांना उद्युक्त केले जाते. आज प्रामुख्याने या दोन्ही ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष आहे. त्या परिसरामध्ये निवडणुका होत आहेत आणि तेथे परस्परांबद्दल तक्रारी देखील केल्या जात आहेत. परंतु जे गुन्हे करतात, दमदाटी करण्याचा प्रयत्न करीत आहेत ते कोठल्या पक्षाचे आहेत हे न पाहता, कोणाचाही मुलाहिजा न ठेवता कारवाई करण्याचे आणि चोख बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना दोन्ही ठिकाणच्या पोलिसांना देण्यात आलेल्या आहेत. अध्यक्ष महाराज, औरंगाबाद येथील श्री.म्हात्रे नावाच्या शाखा प्रमुखावर झालेल्या हल्ल्याचा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आलेला होता. त्याबाबतची माहिती देखील मी घेतलेली आहे. 307 कलम लावले आहे पण आरोपी फरारी आहेत आणि लौकरच ते सापडतील असा प्रयत्न पोलीस करीत आहेत. दरम्यान तेथे दोन्ही बाजूंनी शिस्त राखण्याची

...... 3एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

आवश्यकता आहे. रात्री 3.00 वाजता मते मागण्यास जाण्याचा प्रकार कोठे असू शकतो का ? पण तेथे रात्री 3.00 वाजता घरी जाऊन मते मागण्याचा प्रकार झाला. तेव्हा ज्यांचेवर हल्ला झाला त्यांनीही रात्री 3.00 वाजता मते मागण्यासाठी दुसऱ्याच्या घरी जाण्याचे कारण नव्हते. सरकारने यासाठी दिलेली वेळ पाळली गेली असती तर कोणताही प्रश्न उद्‌भवला नसता आणि सरकारचीही नामुष्की झाली नसती. म्हणून या बाबतीत वेळेची मर्यादा पाळण्याची दोन्ही बाजूंनी आवश्यकता आहे. सगळ्यांनी नियमांचे पालन केले तर काही प्रश्नच उद्‌भवणार नाहीत. रात्री 3.00 वाजता मते मागण्याचा, घरी जाऊन प्रचार करण्याचा प्रकार हा निश्चितच शंकास्पद आहे आणि त्यामध्येही संशय निर्माण करणारा आहे. आज तेथील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणाखली आहे, शांतता सर्वत्र आहे. दोन्ही बाजूचे नेते मंडळी तेथे जाहीरपणे शांततेचे आवाहन करीत आहेत, प्रचारही करीत आहेत. इतकेच नव्हे तर तेथे रात्री-बेरात्री वा दिवसा उजेडीही घरावर थाप मारण्याचे प्रकार पूर्णपणे बंद झालेले आहेत आणि कोठल्याही तणावाचा प्रकार तेथे आज नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महाराज, आता या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री आलेले आहेत म्हणून मी त्यांच्या समोर एक प्रश्न उपस्थित करू इच्छितो. 307 चा गुन्हा झ ालेला असताना त्या माणसाला, आरोपीला अटक होत नाही आणि तो माणूस तेथे ओपनली फिरत आहे. असा गुन्हा घडत असेल आणि रात्री 3.00 वाजता मते मागण्यास गेले व म्हणून त्याचेवर हल्ला केला तर ते समर्थनीय ठरू नये. म्हणूनच कायदा आणि सुव्यवस्था राखत असताना कोण कोठल्या पक्षाचा आहे हे पाहून कार्यवाही केली जावी असे आमचे बिलकूल मत नाही. सोलापूर मध्ये देखील अशीच घटना घडली आहे. तेथे पंडित देशमुख यांचेवर दिवसा ढवळ्या हल्ला करून त्यांची हत्या झालेली आहे आणि त्यामध्ये स्थानिक आमदारांचा मुलगा आहे असे समजले तरीही त्याला पकडले जात नाही. असे प्रकार होत असतील तर संबंधित माणसे निश्चित फरार होऊ शकतात. अध्यक्ष महाराज, ही घटना 4 तारखेला घडलेली आहे आणि त्यानंतरही आजपर्यंत 307 कलमाखालील आरोपी पोलिसांना मिळू शकत नाहीत. ते नवी मुंबईचे रहिवासी आहेत. आपल्यालाही माहिती आहे की, अशा वेळी पोलीस कसे वागतात. एखादी व्यक्ती, आरोपी मिळाला नाही तर त्याच्या घरच्या माणसांना पोलीस ठाण्यावर नेले जाते, बोलावून आणले जाते. त्या

..... 3एम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

पध्दतीने प्रयत्न त्या ठिकाणी पोलिसांनी केला असता तर मला वाटते आतापर्यंत आरोपीना पोलीस पकडू शकले असते. हे आरोपी कोठल्या पक्षाचे आहेत हे पाहण्यापेक्षा आपल्या पोलिसांनी, माननीय गृहमंत्री महोदय, कायद्याने जे काही करणे आवश्यक आहे ते करण्याची अपेक्षा आम्हाला आहे.

श्री. आर.आर.पाटील : माननीय सभापती महोदय, कायद्याने जे करणे आवश्यक आहे ते नि:पक्षपातीपणे केले जाईल. आता सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार ते आरोपी तेथे फिरत आहेत पण माझ्या माहितीनुसार ते फरारी आहेत. तरीही मी वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत तपास करण्यास सांगेन आणि जे फरारी आहेत त्यांना लौकरात लौकर पकडण्यात येईल.

**तालिका सभापती (श्री.अनंत तरे)** : सभागृहापुढील आजचे दिवसाचे कामकाज संपले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 11 एप्रिल, 2005 रोजी दुपारी 2.00 वाजता पुन्हा भरेल.

**( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 49 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 11 एप्रिल, 2005 रोजीच्या दुपारी 2.00 वाजेपर्यात स्थगित झाली. )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही